सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. २३ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# ‘दंगलखोरांकडून नुकसान भरपाई वसूल करणार’



नागपूर : महाल आणि हंसापुरी भागात १७ मार्च रोजी झालेल्या दंगली प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पोलीस आयुक्त, पालकमंत्री आणि जिल्हाधिकारी यांची बैठक घेतली. यानंतर दंगलखोरांकडून नुकसानीची भरपाई म्हणून पैसे वसूल केले जातील, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. जर आरोपी पैसे देऊ शकले नाहीत तर त्यांची मालमत्ता विकून नुकसान भरुन काढले जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. हिंसाचारात ज्यांच्या मालमत्तेचे नुकसान झाले त्यांना भरपाई दिली जाईल, मात्र ही रक्कम दंगलखोरांकडून वसूल केली जाईल. त्यांनी पैसे न भरल्यास त्यांची मालमत्ता जप्त करुन लिलाव केला जाईल; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

नागपुरात जे काही घडले ते पूर्णपणे पूर्वनियोजित होते. ही अचानक घडलेली घटना नव्हती. सरकार यावर कठोर कारवाई करणार आहे. दंगलीत ज्यांची वाहने, दुकाने, घरे आणि इतर मालमत्तेचे नुकसान झाले त्यांना राज्य सरकार भरपाई देणार आहे. हे पैसे सरकार दंगलखोरांकडून वसूल करेल; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

नागपूर दंगल प्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत ९२ जणांना अटक केल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. यातील १२ आरोपी अल्पवयीन असून, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई सुरू आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फूटेज,मोबाईल व्हिडिओ आणि पत्रकारांनी दिलेल्या रेकॉर्डिंगच्या मदतीने १०४ संशयितांची ओळख पटवली आहे. व्हिडीओ फूटेज आणि डिजिटल पुरावे यांच्या आधारे दंगलखोरांची ओळख पटवण्याचे काम अद्याप सुरू आहे. दंगलीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असलेल्या सर्वांवर कारवाई होणार आहे. सोशल मीडियाद्वारे चिथावणी देणाऱ्यांवरही कारवाई होणार आहे; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

नागपूरमध्ये दंगल भडकवण्यासाठी सोशल मीडियाचाही वापर झाला. आतापर्यंत दंगलीकरिता चिथावणी देणाऱ्या ६८ पोस्ट ओळखण्याचे काम पूर्ण झाले आहे. इतर अनेक पोस्टची पडताळणी सुरू आहे. ज्यांनी वातावरण बिघडवले, अफवा पसरवली आणि चिथावणी देण्यासाठी सोशल मीडियाचा वापर केला त्यांनाही नागपूर दंगल प्रकरणात सहआरोपी केले जाईल. समाजात तेढ पसरवून शांतता भंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल; असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले. दंगल करणाऱ्यांकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल. तसेच त्यांना न्यायालयात हजर करुन त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल. दंगल करणाऱ्यांनी भरपाईसाठी पैसे दिले नाही तर त्यांची मालमत्ता जप्त करुन दंडाची वसुली करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले.

राज्य शासनाचा भर महाराष्ट्रात कायदा - सुव्यवस्था राखण्यावर आहे. पण भविष्यात राज्यात कुठेही दंगल झाली तर भरपाईसाठी नागपूर पॅटर्न राबवणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# मालमत्ता कर थकल्याप्रकरणी बाजार समितीला महापालिकेने ठोकले सील

## आकारलेला कर चुकीचा : सभापती पठाडे

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

नवीन जाधववाडीतील कृषी उत्पन्न बाजार समितीकडे तब्बल ६ कोटी ६२ लाख मालमत्ता कर थकीत असल्याने शनिवारी, २२ मार्च रोजी महापालिकेच्या विशेष पथकाने कार्यालयासह सचिवांचे दालनाला सील ठोकले आहे. मोकळ्या जागेवर लावलेला हा कर चुकीचा असल्याचे सभापती राधाकिसन पठाडे म्हणाले.

याबाबत बाजार समितीचे सभापती राधाकिसन पठाडे यांनी शनिवारी तातडीने पत्रपरिषदे घेवून आपली बाजू स्पष्ट केली. पठाडे यांनी म्हटले आहे, शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील तरतुदीनुसार बाजार समितीची स्थापना झाली आहे. शासनामार्फत जमीन संपादन होवून बाजार समिती आवारात शेतमालाच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार केला जातो. यामधून शासनास मोठ्या प्रमाणात शासकीय सुपरव्हीजन फीस प्राप्त होते. महापालिकेतर्फे बाजार समित्यांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा पुरविल्या जात नाहीत.

### १० एकर जागेवर अतिक्रमण

**महापालिकेने बाजार समितीच्या १० एकर जागेवर अतिक्रमण केले आहे, असा आरोपही सभापती पठाडे यांनी केला आहे. कार्यालया इमारत, शेजारील इमारत, शेतकरी भवन, शेतकरी निवास आदींचा मालमत्ता कराचा भरणा आम्ही नियमित करतो. मात्र, बाजार समिती सेल हॉलमधील कॉमन शेडचा मालमत्ता कर आम्ही भरू शकत नाही. महापालिकेने हा कर चुकीचा लावला आहे. याबाबत आम्ही मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री, पण मंत्र्यांना निवेदन देणार असल्याचे पठाडे म्हणाले.**

पठाडे म्हणाले, महापालिकेने २०१९ मध्ये मोकळ्या जागेवर २ कोटी ५९ लाख कर लावला होता. शुक्रवारी, २१ रोजी ६ कोटी ६२ लाख रुपये कर आकारून भरण्याची नोटीस बजावण्यात आली. बाजार समितीने सार्वजनिक उपक्रमांतर्गत शेतमालाचे उन, वारा, पावसापासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने सेल हॉल क्र. १ ते ५ मधील दुकानांसमोर पत्राचे कुंपण केले आहे. या बदल्यात बाजार समिती शेतकऱ्यांकडून कोणताही कर आकारत नाही. मात्र, महापालिकेने सेल हॉल क्र. १ ते ५ मधील कॉमन शेडवर ३ कोटी ६९ लाख ९१ हजार ३५ रुपये आकारलेला कर माफ करण्याची मागणी पठाडे यांनी केली आहे.

बाजार समितीच्या वतीने मुख्य आवारात साफसफाई, स्ट्रीट लाईट, पाणी इ. सुविधा पुरविण्यात येतात. महापालिकेकडून आम्हाला कोणत्याही सुविधा मिळत नसल्यामुळे लावण्यात आलेला कर आम्हाला माफ करण्याची मागणी पठाडे यांनी केली आहे. महापालिकेने शुक्रवारी, २१ रोजी नोटीस दिली आणि दुसऱ्याच दिवशी कार्यालयाला सील ठोकल्यामुळे शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होण्याची शक्यता असल्याचे पठाडे म्हणाले. मोकळ्या जागेवर आकारलेला कर महापालिकेने रद्द करण्याची आग्रही मागणी सभापती पठाडे यांनी केली आहे. पत्रपरिषदेला सचिव विजय शिरसाट, संचालक कन्हैयालाल जैस्वाल, श्रीराम शेळके, देवीदास कीर्तीशाही उपस्थित होते.

# एम्स ही गीतेतील कर्मयोगाची चालती बोलती प्रयोगशाळा - राष्ट्रपती

नवी दिल्ली : एम्स नवी दिल्ली ही एक अशी संस्था आहे जिने आरोग्यसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि जीवन विज्ञान संशोधनात उत्कृष्टता कायम राखत जगभरात प्रतिष्ठा मिळवली आहे. दूरवरून उपचारासाठी येणाऱ्या लाखो रुग्णांसाठी ही संस्था आशेचे प्रतीक आहे. निम-वैद्यकीय आणि बिगर वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या मदतीने येथील डॉक्टर्स वंचित आणि श्रीमंत वर्गातील रुग्णांवर तितक्याच समर्पित वृत्तीने आणि सहानुभूतीने उपचार करतात. एम्स ही गीतेतील कर्मयोगाची चालती बोलती प्रयोगशाळा आहे असे म्हणता येईल, असे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. नवी दिल्ली येथील अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेच्या (एम्स) शुक्रवारी आयोजित दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या.



या प्रसंगी बोलताना राष्ट्रपती म्हणाल्या की, एम्सने केवळ राष्ट्रीय स्तरावरच नव्हे तर जागतिक स्तरावर देखील आरोग्यसेवेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ही एक अभिमानास्पद मेड-इन-इंडिया यशोगाथा आहे आणि देशभरात अनुकरणीय आहे.

एम्सने सुशासन सुनिश्चित करण्यासाठी, आपल्या सर्व प्रयत्नांमध्ये पारदर्शकता, कार्यक्षमता आणि दायित्व वाढविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांबद्दल राष्ट्रपतींनी आनंद व्यक्त केला. कोणत्याही संस्थेच्या निकोप वाढीसाठी सुशासन आवश्यक आहे आणि एम्स त्याला अपवाद नाही असे त्या म्हणाल्या. त्यांची जबाबदारी आरोग्यसेवा, शिक्षण आणि संशोधन क्षेत्राच्या पलीकडे आहे. प्रत्येक हितधारकाचे म्हणणे ऐकून घेतले जाईल, संसाधनांचा विवेकी वापर केला जाईल आणि उत्कृष्टता हा निकष असेल असे वातावरण निर्माण करणे हे या संस्थेचे उद्दिष्ट आहे.

भावनिक आरोग्याच्या मुद्द्याबद्दल बोलताना राष्ट्रपती म्हणाल्या की, आजच्या जगात हे एक गंभीर आव्हान आहे. कोणालाही, विशेषतः तरुण पिढीला निराश होण्याचे कारण नाही. जीवनातील प्रत्येक नुकसान भरून काढता येते मात्र मौल्यवान आयुष्य नाही असे त्या म्हणाल्या. त्यांनी एम्सच्या प्राध्यापकांना मानसिक आरोग्याच्या समस्येबाबत जागरूकता मोहीम सुरू करण्याचे आवाहन केले जेणेकरून या छुप्या आजाराची जाणीव सर्वांना होईल.

पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांना संबोधित करताना राष्ट्रपती म्हणाल्या की, त्यांना आता त्यांच्या शिक्षणाचा उपयोग करण्यासाठी एक उज्ज्वल करिअर घडवायचे आहे. वंचितांना मदत करण्याच्या कोणत्याही संधीकडे कधीही दुर्लक्ष करू नका असे आवाहन त्यांनी केले. देशातील अनेक भागांमध्ये पुरेशा संख्येने डॉक्टर्स नाहीत असे त्यांनी नमूद केले. म्हणूनच वर्षातील काही काळ ते अशा प्रदेशातील लोकांची सेवा करण्याचा विचार करतील, असा विश्वास राष्ट्रपतींनी व्यक्त केला.

# औरंगजेब कबरीच्या वादामुळे पर्यटन ठप्प!

छत्रपती संभाजीनगर : औरंगजेब एक जुलमी बादशहा होता. त्याची कबर महाराष्ट्रात नको, अशी राजकीय मागणी होऊ लागली आहे.

ही मागणी सुरू झाल्यापासून औरंगजेबाच्या खुलताबादमधील कबरी भोवती पोलिसांनी बंदोबस्त वाढवला आहे. या घडामोडींचा छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पर्यटनावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

अजिंठा आणि वेरुळ लेणी, दौलताबाद किल्ला तसेच मुघलकालीन वास्तू बघण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत घट झाली आहे, असे स्थानिक सांगत आहेत. शाळा महाविद्यालयांच्या परीक्षांमुळेही पर्यटनात घट झाल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.






सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# गौण खनिज संदर्भात उपविभागीय अधिकाऱ्याचे वाहन जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मार्च**

गिट्टी आणि खडी हे गौण खनिज वर्गात मोडत नसल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल हसूल अधिनियमानुसार उपविभागीय अधिकाऱ्यांना वाहन जप्त करण्याचे व दंड लावण्याचे अधिकार नसल्याचा निवाडा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नुकताच दिला. उपविभागीय अधिकारी यांनी संबंधितास लावलेला दंड रद्द करून जप्त केलेले वाहन मालकास ताब्यात देण्याचे आदेश मा.न्यायमुर्ती. के. सी.संत साहेब यांनी दिले आहेत. गिट्टी आणि खडी हे गौण खनिज नसल्यामुळे त्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमामधील तरतुदी लागू होत नाहीत, असा निवाडा सुनावणीअंती खंडपीठाने दिला.

लातूर येथील गणेश जाधव यांनी टिप्परमधून गौण खनिजाची वाहतूक केली म्हणून ४ डिसेंबर २०२४ रोजी तहसीलदार यांनी कारवाई केली होती. त्यांनी टिप्पर जप्त केला होता. उपविभागीय अधिकारी उस्मानाबाद यांनी सदर वाहनावर कारवाई करीत कारणे दाखवा नोटीस बजावली होती. वाहनातून गौण खनिजाची अनधिकृत वाहतूक केली म्हणून त्यास २ लाख ३२ हजार ५५० इतका दंड आकारण्यात आला होता. याकारवाईला गणेश जाधव यांनी ड राहुल चेबळे यांच्यामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात आव्हान दिले होते. सुनावणीप्रसंगी सिनीयर ड.शैलेंद्र गंगाखेडकर व ड. राहुल चेबळे व ड. ज्ञानोबा सुर्यवंशी यांनी सहकार्य करूण निदर्शनास आणून दिले की, गिट्टी आणि खडी हे गौणखनिज होऊ शकत नाही. गिट्टी हे मोठ्या दगडावर प्रक्रिया करून तयार केलेले उत्पादक आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम ४८ (७) अन्वये वाहन जप्तीचे व दंड लावण्याचे अधिकार तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांना प्राप्त होत नाहीत. गिट्टी आणि खडीची वाहतूक करणाऱ्या वाहनावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियममधील तरतुदी लागू होत नाहीत. त्यामुळे याचिका कर्त्याचे वाहन तहसीलदार यांनी जप्त करणे आणि उपविभागीय अधिकारी यांनी त्यास दंड लावणे ही पूर्णतः बेकायदेशीर बाब आहे. खंडपीठानेही गिट्टी आणि खडी हे गौणखनिज नसल्यामुळे त्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमामधील तरतुदी लागू होत नाहीत. जप्त केलेले वाहन त्वरित सोडण्याचे आदेश खंडपीठाने दिले. दंडाचे आदेशही रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## लव्हुरी येथे ए आर टी संस्थेने साजरा केला जागतिक जल दिवस

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२२ मार्च**



आज दि २२ मार्च जागतिक जल दिनाचे आवचित्य साधून ए आर टी संस्था यवतमाळ आणि क्सिस बँक लिमिटेड यांच्या संस्युक विद्यमाने सुरू करण्यात आलेल्या टँकर मुक्त गाव आणि जल संवर्धन करण्याच्या दृष्टीने हे उपक्रम कोठी, धर्माला, साबळा आणि आता आज लव्हूरी येथे नाला खोलीकरण आणि जल संवर्धन आणि संस्थे चे विशेष पाऊसाचे पाणी जमिनीत जास्तीत जास्त प्रमाणात मिळविण्याचे काम करण्याच्या कार्यास सुरुवात केली गेली या कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रकल्प व्यवस्थापक वली तांबोळी यांनी सर्व गावकरी यांना जल दिवसाच्या शुभेच्छा दिल्या आणि प्रकल्प रूपरेषा सांगितली आणि हे काम आपल्या नव्हे तर गावची जबाबदारी आहे आणि पाणी कसं अडवून गावची भूजल पातळी कशी वाढवावी या विषयी माहिती दिली तसेच सर्व सहकार्याने गाव टँकर मुक्त करण्याचा निर्धार करण्यात आला तसेच सहाय्यक ज्योती सांबरे यांनी नाले वरच्या शेतकरी याचे सहकार्य पाणी उपसा न करणे आणि परिसरात कामाला अडथळा न आणणे अशा विषयी संबोधन केले. याच बरोबर कामाचे उद्घाटक श्री सखाराम महाराज , शरद अण्णा चाळक दत्ता अप्पा चाळक डॉ दत्ता चाळक, अण्णासाहेब चाळक कैलास चाळक सिद्धार्थ शिनगारे यांनी केले या कार्यक्रमांचे आयोजन ग्राम पंचायत लव्हूरी यांचे मार्फत प्रमुख म्हणून मुन्ना चाळक सरपंच, विजय चाळक, दत्ता चाळक , भीमराव चाळक इत्यादी यांनी सहभागी होऊन यशस्वी झाले.

# तर बीडचे मणिपूर होईल खा. रजनी पाटील यांचा सरकारवर हल्लाबोल

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२२ मार्च**

राज्यसभेत काँग्रेस नेत्या रजनी पाटील यांनी बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येवरून राज्य आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला. त्यांनी काश्मीरमधील स्थिति विषयी आणि गृह मंत्रालयाच्या असमाधानकारक कामगिरीवर देखील तीव्र शब्दात टीका केली व सरकारला धारेवर धरले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येने राज्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचे अपयश पुन्हा उघड झाले. वेळीच आरोपींवर कारवाई झाली नाही, तर बीड जिल्हा आणि महाराष्ट्राचे मणिपूर होण्यास वेळ लागणार नाही, असे एका स्थानिक शेतकऱ्याने काँग्रेसच्या सद्भावना यात्रेवेळी सांगितले,' असा अनुभव सांगताना काँग्रेस नेत्या रजनी पाटील यांनी शुक्रवारी केंद्र व राज्य सरकारवर हल्लाबोल केला. राज्यसभेत मराठीतून केलेल्या १० मिनिटांच्या भाषणात पाटील यांनी विविध मुद्द्यांवरून केंद्रावर टीकास्त्र सोडले. जम्मू आणि काश्मीरमधील परिस्थिती सामान्य होत असल्याचे केंद्र सरकार वारंवार सांगत आहे. मग काश्मीरमधील सुरक्षेसाठी यंदाच्या ४१ हजार कोटी रुपयांची मोठी तरतूद का करावी लागली? मोदी सरकारने काश्मिरी पंडितांचा वापर केवळ राजकीय शस्त्र म्हणून केला आहे. त्यांना मदत न करता त्यांच्यावर चित्रपट बनवण्याचे आणि त्याबद्दल फक्त बोलण्याचे काम त्यांनी केले आहे,' असे टीकास्त्र रजनी पाटील यांनी सोडले.



'२०२५-२६ च्या अर्थसंकल्पात गृह मंत्रालयासाठी २ लाख ३३ हजार २११ कोटींची तरतूद करूनही या मंत्रालयाची कामगिरी असमाधानकारक आहे. निमलष्करी दलांत मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे आत्महत्या, मानसिक ताण, निवृत्तीआधीच राजीनामा देण्याचे प्रमाण वाढत आहे. सीआरपीएफमध्ये नऊ टक्के कमी मनुष्यबळ आहे. या दलांच्या आधुनिकीकरणासाठी ४,०६९ कोटींची तरतूद केली आहे. परंतु गेल्या काही वर्षांत ९० टक्के अनुदानवाटप झालेले नाही. नारी शक्ती वंदन चा गवगवा करणाऱ्या या सरकारच्या काळात निमलष्करी दलांमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे प्रमाण फक्त चार टक्के आहे,' असे रजनी पाटील म्हणाल्या. काँग्रेसकडून पाटील यांना २० मिनिटांचा वेळ बोलण्यासाठी देण्यात आला होता. मात्र आधीच्या वक्त्यांचे भाषण लांबल्याने पाटील यांना फक्त सात ते आठ मिनिटे मिळाली. भाषण घाईघाईने वाचताना पाटील यांना खोकल्याची जबरदस्त उबळ आली. ते पाहून ज्येष्ठ सदस्या सुधा मूर्ती या भाजपच्या बाकावरून पुढे आल्या आणि त्यांना पाण्याची बाटली दिली. घरी जाताना पाटील यांनी आभार मानल्यावर मूर्ती यांनी, 'पक्षाचा इथे काय संबंध?' अडचणीत आपणच मदत करायची असते,' असे सांगितले.


# परळीत महिलांसाठी स्कुटी प्रशिक्षण

## आरोही स्टाईल स्टुडीयोच्या वतीने महिलांना स्मार्ट लेडी बनण्याची संधी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ मार्च**

परळी शहर परिसरातील महिलांसाठी स्कुटी शिकण्याची सुवर्णसंधी आरोही स्टाईल स्टुडिओच्या माध्यमातून उपलब्ध झाली असुन या संधीचा महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन आरोही स्टाईल स्टुडिओच्या संचालिका सौ.श्रध्दा हालगे- फुलारी व सौ.शिवानी सातपुते-फुलारी यांनी केले आहे.

सध्या महिलांना दुचाकी चालवता येणे काळाची गरज बनली आहे.अनेक महिलांपुढे स्कुटी कुठे शिकावी,कोण शिकवणार,काही अडचणी येणार का असे अनेक प्रश्न आहेत.अरोही स्टाईल स्टुडिओच्या संचालिका सौ.श्रध्दा हालगे-फुलारी व सौ.शिवानी सातपुते-फुलारी यांनी परळी व परिसरातील महिलांची ही गरज ओळखुन खास उन्हाळी सुट्यांमध्ये महिला व मुलींसाठी अल्प दरात स्कुटी शिकण्याची संधी उपलब्ध केली आहे.या स्मार्ट लेडी स्कुटी प्रशिक्षणात महिला प्रशिक्षक स्कुटी चालवण्याचे प्रशिक्षण देणार आहे.याबरोबरच वाहतुकीचे नियम काय आहेत हे शिकविण्यात येणार आहे.स्कुटी शिकण्याचा कालावधी एक महिना असणार आहे.यासाठी प्रवेश निश्चित करणे आवश्यक असुन यासाठी आरोही स्टाईल स्टुडीयो वैद्यनाथ मंदिर रोड, देशमुखपार परळी,व ९६०४३३५८२२ आणि ७०५७३४५१९० या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन सौ.श्रध्दा हालगे-फुलारी,सौ.शिवानी सातपुते यांनी केले आहे.



# सारडगाव येथील दत्तधाम गोपाळपुरा येथे प्रवचन; भगवान दत्तात्रेय हे दिशादर्शक-डॉ.तुळशीराम गुट्टे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ मार्च**

भगवान दत्तात्रेय हे दिशादर्शक असून सर्वांच्या जीवनाचे कल्याण करणारे आहेत असे विचार संत साहित्याचे अभ्यासक आणि सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनचे अध्यक्ष डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी येथे आपल्या प्रवचनात मांडले.

. परळी तालुक्यातील सारडगाव येथील दत्तधाम गोपाळपुरा (परळी-धर्मापुरी रोड) येथे भंडारा (महाप्रसाद) व प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. फाल्गुन पौर्णिमेच्या निमित्ताने संत साहित्याचे अभ्यासक आणि सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनचे अध्यक्ष डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी प्रवचन करताना या दत्तधामाचे महत्त्व विशद केले. यावेळी परळी येथील दत्तप्रसाद तोतला , वैद्यनाथ सहकारी साखर कारखान्याचे संचालक संजय आघाव, सारडगावचे उपसरपंच संदीप तांदळे, पंचायत समितीचे अधिकारी नीलकंठ दराडे आणि वैद्यनाथ बँकेचे अधिकारी विठ्ठल आघाव यांसह अनेक भाविक या प्रसंगी उपस्थित होते. महाप्रसादाचे आयोजन केशव आघाव यांच्या वतीने करण्यात आले दत्तधामाचे महत्त्व डॉ. तुळशीराम गुट्टे महाराज यांनी प्रवचन करताना सांगितले की.श्रीक्षेत्र सारडगाव येथील दत्तधाम गोपाळपुरा, परळी -धर्मापुरी रोड वरती हे तीर्थक्षेत्र असून श्रीक्षेत्र दत्तधाम हे बद्रीनाथ ज्योतिर्मठाचे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज १००८ यांनी प्रतीकाशीचा दर्जा दिलेले तीर्थक्षेत्र आहे. भगवान दत्तात्रेय हे दिशादर्शक असून सर्वांच्या जीवनाचे कल्याण करणारे आहेत. या ठिकाणी गोमाता, औदुंबर वृक्ष आणि अखंड धुनी आहे. दत्तात्रेयांचे दर्शन घेण्यापूर्वी या सर्वांचे दर्शन घेणे श्रेयस्कर मानले जाते. हे पवित्र तीर्थक्षेत्र तालुक्यात नावारूपाला येत असून अनेक भक्तांच्या भावना आणि नवस येथे पूर्ण होतात. भगवान दत्तात्रेय हे जीवनात चैतन्य ऊर्जा देणारे दैवत मानले जातात. परळी वैजनाथच्या पूर्वेस साधारणतः नऊ किलोमीटर अंतरावर हे दत्तधाम वसले आहे.असे ही गुट्टे महाराजांनी सांगितले.



# अहिल्याबाईंच्या विचारांची गूंज : अभ्यास, सन्मान आणि नेतृत्व निवडीचा संगम

## - देवगिरी प्रांताच्या राज्यस्तरीय चर्चासत्र व सर्वसाधारण सभेत वैचारिक समृद्धीचा उत्सव

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मार्च**

अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली संलग्न इतिहास संकलन संस्था, महाराष्ट्र - देवगिरी प्रांत आणि राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंती निमित्त आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्र आणि प्रांतीय सर्वसाधारण सभा अभ्यासपूर्ण विचारांची मेजवानी ठरली.

कार्यक्रमाच्या उद्घाटन सत्रात डॉ.राधाकृष्ण जोशी पश्चिम क्षेत्रीय संघटन सचिव, अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, नवी दिल्ली यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.एस.एस.मुंढे यांनी भूषवले.

उद्घाटन सत्रात डॉ. गीताजली बोराडे यांचा इतिहास विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या पदावर निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन संस्थेच्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला.

याच वेळी छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष म्हणून डॉ. बोराडे यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली. त्यांच्या शैक्षणिक योगदानाचा गौरव करत, जिल्ह्यातील इतिहास संशोधन आणि कार्यरत अभ्यासकांसाठी त्यांचे नेतृत्व प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास संस्थेने व्यक्त केला.



तसेच डॉ. मोहीनी उपासणी यांची देवगिरी प्रांताच्या सह-महिला प्रमुखपदी निवड करण्यात आली. त्यांच्या अभ्यास, महिला सहभाग व संघटनात्मक कौशल्यांच्या आधारे त्यांच्याकडे ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली.

यानंतर पार पडलेल्या परिसंवाद सत्रात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कालातीत कार्य या विषयावर सखोल विचारमंथन झाले. बीजभाषण डॉ. पुष्कर शास्त्री यांनी सादर केले. सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. डिंगाबर सोनवणे, प्रमुख, इतिहास विभाग, ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा होते. सूत्रसंचालन डॉ. रवी सातभाई यांनी केले.

परिसंवादात डॉ. शांता जाधवर गीते यांनी संस्कृतीची पुनर्बाधणी, डॉ. नम्रता भोसले यांनी महिला सबलीकरण आणि डॉ. गीताजली बोराडे यांनी कालातीत अहिल्यादेवी या विषयावर मांडणी करताना इतिहास, समाज आणि महिला सक्षमीकरणाच्या दृष्टिकोनातून विचार मांडले.

दुपारी पार पडलेल्या प्रांतीय सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान डॉ. मुकुंद देवर्षी यांनी भूषवले. या सभेत मागील वर्षातील इतिवृत्त सादर करून मंजूर करण्यात आले. इतिहास दर्पण प्रकाशन, कार्यशाळा, परिसंवाद व शोधनिबंध लेखन यांचा आढावा घेण्यात आला.

संघ शताब्दी वर्षानिमित्त जिल्हास्तरावर लघु शोध प्रबंधासाठी प्रस्ताव मागवण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. त्यासाठी निधी संकलन, मार्गदर्शन कार्यशाळा व आर्थिक तरतुदीच्या योजना मांडण्यात आल्या.

महत्त्वाचा निर्णय म्हणजे, सध्या कार्यरत असलेल्या प्रांत कार्यकारिणीला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. अध्यक्ष डॉ. मुकुंद देवर्षी, सचिव प्रा. धनंजय जवळेकर, संघटन सचिव डॉ. रवी सुभाषराव सातभाई यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांच्या कार्याचा सभेत गौरव करण्यात आला आणि त्यांच्या नेतृत्वात संस्थेचे कार्य अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाचे संयोजन प्रा. मनोज देवकर, प्रमुख, इतिहास विभाग, राजीव गांधी महाविद्यालय, करमाड यांनी उत्कृष्टपणे केले. सर्व सत्रांचे आयोजन, तांत्रिक समन्वय आणि वेळेचे भान ठेवून पार पाडले गेले.

या अभ्यासपूर्ण दिवसभरातील कार्यक्रमातून इतिहासप्रेम, संशोधनवृत्ती आणि नेतृत्व घडवण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. अहिल्याबाई होळकर यांचे विचार आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहचवण्याचे सामर्थ्य या चर्चासत्राने दाखवून दिले.

# पाण्याच्या बचतीसाठी धोरणात्मक निर्णयांची गरज-प्रा.डॉ.संतोष रणखांब



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ मार्च**

वर्तमान तसेच भविष्यातील गंभीर पाणी प्रश्न निर्माण होऊ नये तसेच मानवी दैनंदिन जीवनासाठी पाण्याच्या बचतीचे महत्व लक्षात घेऊन वैयक्तिक व शासकीय स्तरावर धोरणात्मक निर्णयाची गरज असल्याचे प्रतिपादन प्रा.डॉ. संतोष रणखांब यांनी केले. ते जागतिक जलदिना निमित्त परळी येथे व्याख्यान देतांना बोलत होते.

परळी येथील वैद्यनाथ महाविद्यालयात जागतिक जलदिनानिमित्त सोनपेठ येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयाचे प्रा डॉ. संतोष रणखांब यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अर्चना चव्हाण या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्रा. डॉ.बी.के.आंधळे ,प्रा. व्ही.बी.गायकवाड, प्रा.पी. एल. कराड , प्रा. टी.ए.गिते तसेच कार्यालयीन अधीक्षक अशोक रोडे उपस्थित होते. यावेळी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी पाण्याचे महत्व विशद करणारे भित्तिपत्रके तयार केली होती. त्याचे प्रकाशन करण्यात आले.

पुढे बोलताना प्राध्यापक डॉ .संतोष रणखांब म्हणाले की पाणी हेच मानवाचे जीवन आहे.आणि प्रत्येक मानवाला स्वच्छ पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे .परंतु जागतिक स्तरावर विचार केला तर पाण्याचे प्रदूषण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. तापमानात वाढते कार्बन डायऑक्साइड चे प्रमाण, वाढत्या औद्योगिकीकरणामुळे ग्लोबल वॉर्मिंगचा जगापुढे धोका निर्माण झाला आहे. यावर्षी युनोने जागतिक जल दिनानिमित्त हिमनद्या व त्यांचे संवर्धन या विषयावर सर्वत्र चर्चा व्हावी या उद्देशाने जगात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेले आहे. तापमान वाढले आणि मोठ्या प्रमाणात हिमनद्या वितळल्या तर जगापुढे धोका निर्माण होऊ शकतो.पाणी बचतीची सवय ही स्वतःपासून सुरू केली पाहिजे. समाजात पाण्याचा होणारा अपव्यय टाळण्यासाठी आवश्यकता नसतानाही गाडी धुणे, नळाला मोडक्या तुट्या असणे, पाणी भरणे झाल्यानंतरही नळाचे पाणी नाली मध्ये सोडून देणे त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते हे प्रत्येकाला रोखता येऊ शकते. जुन्या काळी बारा महिने पाणी असणारे बारव आज एकतर कोरडे पडले आहेत किंवा त्याचा वापर कचराकुंडी म्हणून होताना दिसत आहे हे धोक्याची बाब आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागाचे प्राध्यापक संजय रणखांबे यांनी केले सूत्रसंचालन प्रा.सोमनाथ किरवले यांनी तर आभार प्राध्यापक डॉ.रामेश्वर चाटे सर यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भारतीय तत्त्वज्ञान मानवी जीवनाला दिशादर्शक-प्राचार्य डॉ.विश्वास कंदारे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मार्च**



भारतीय ज्ञान परंपरेचा मोठा इतिहास आहे. भारतीय तत्त्वज्ञान अखिल मानवी जीवनाला दिशादर्शक आहे असे प्रतिपादन कालिका देवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कंदारे यांनी केले. येथील स्वा.सावरकर महाविद्यालय बीड आणि भारतीय दर्शनीक अनुसंधान परिषद शिक्षा मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय व्याख्यानमालेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे यांची उपस्थिती होती. 'भारतीय ज्ञान परंपरा' या विषयावर बोलताना प्राचार्य कंदारे म्हणाले की भारतीय ज्ञान प्रणालीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. भारतातील विचारवंतांनी जे तत्वज्ञानान मांडले ते अखिल विश्वाला दिशा देणारे आहे. आजही अनेक देशांमध्ये भारतीय तत्वज्ञान आवर्जून अभ्यासले जात आहे. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मोराळे म्हणाले की, भारतीय ज्ञान परंपरेचा अभ्यास करणे गरजेचे आहे. आपल्या ह्या ज्ञानपरंपरा मानवी जीवनाला समृद्ध करणाऱ्या आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक प्रा. राम गव्हाणे यांनी केले. त्यांनी भारतीय ज्ञान परंपरेचा गौरवशाली इतिहास मांडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. श्रीधर आघाव यांनी केले. आभार प्रा.डॉ. छत्रपती पांगारकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## जय महाराष्ट्र प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंती सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२२ मार्च**

हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ इतिहासापुरते सीमित न राहता प्रत्येक पिढीच्या मनामनांत प्रेरणादायी आदर्श बनले आहेत. त्यांचा शौर्य, धैर्य आणि प्रजाहितदक्ष नेतृत्वाचा वारसा जतन करण्यासाठी जय महाराष्ट्र शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने भव्य शिवजयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन शिवशाहीर अरविंद घोगरे यांनी केले.

सोमवार, १७ मार्च रोजी संध्याकाळी ६:३५ वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती, मोंढा मैदान येथे शिवजयंती उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, आई तुळजाभवानी, माँसाहेब जिजाऊ , छत्रपती संभाजी महाराज व विश्वहिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन आणि भगव्या ध्वजारोहण भाजपाचे जिल्हा सरचिटणीस दत्ताप्पा ईटके, रा.काँ. तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, रा.काँ.श . प. ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, उत्तम माने,शहराध्यक्ष ड.जीवन देशमुख, भा.ज.यु.मो प्रदेश उपाध्यक्ष ड.अरुण पाठक,शिवसेना (शिंदे) तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे शहर प्रमुख वैजनाथ माने उपस्थित होते.

# अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली अमोल कोरडे यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२२ मार्च**

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसनेच्या दमदार अशा कार्यपद्धतीस प्रभावित होऊन अमोल कोरडे मा.अध्यक्ष एसटी कामगार सेना बीड यांनी काल रोजी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली उबाठा गटातून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. शिवसेना मराठावाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन यांनी अमोल कोरडे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत शिवसेनेत स्वागत केले. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर याबरोबरच शिवसेना महिला आघाडी युवसेना शेतकरीसेना आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, तथा शिवसैनिकांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शहरात पी१,पी२ चा फज्जा; रस्त्यावर सर्रासपणे वाहनांची पार्किंग




तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२२ मार्च :- शहरात मुख्य रस्त्यावर सम विषम तारखेनुसार पी१,पी२,पार्किंगची व्यवस्था शहरात करण्यात आली होती.

सद्यस्थितीमध्ये या पार्किंग नियोजनाचा पुरता फज्जा उडालेल्या असल्याचे चित्र शहरात पाहायला मिळत आहे,शहरातील जुना राष्ट्रीय महामार्ग २११ चाळीसगाव रोड, या प्रमुख रस्त्यावर सम, विषम तारखेनुसार वाहनांची पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती,आणि जे वाहने बेशिस्त पद्धतीने लावण्यात आली आहे त्या वाहनधारकांवर पोलिसांनी कारवाई केली होती त्यामुळे काही काळ शहरातील वाहतूक कोंडी सुटली होती पण सद्या या पी१,पी२ पार्किंगचा विसर पडल्याने आता वाहनचालक निर्दास्तपणे वाटेल तिथे वाहने उभे करत आहेत त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या उद्भवली आहे

मुख्यतः शहरातील तहसिल रोड,चाळीसगाव रोडवर दुचाकी सह चारचाकी रस्त्यावर उभी करून हे चालक निघून जातात,तहसिल रोडवर शासकीय कार्यालय असून याच रस्त्याने तहसिल,शहर पोलिस, नगरपालिका,भूमिअभिलेख कार्यालय,आदी कार्यालयांचे अधिकारी, कर्मचारी दररोज ये जा करत असतात तरी सुद्धा या बेशिस्त वाहनधारकांना धाक राहिलेला नाही,त्यामुळे या वाहतूक कोंडीचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत चाललेला आहे,शहर पोलिस,वाहतूक पोलिस या बेशिस्त वाहनधारकांवर कारवाई करून वाहतूक कोंडी सोडवतील का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे

वाहतूक कोंडी न होण्यासाठी बेशिस्त वाहनधारकांवर पोलिसांनी कारवाई करणे गरजेचे आहे,शहरात वाहतूक कोंडीची समस्या वाढत आहे

– दिपक शिरसाठ सामाजिक कार्यकर्ते

बेशिस्त वाहनधारकांना वर कारवाई करण्यात येत आहे,वाहनधारकांनी पार्किंगची शिस्त पाळत वाहनाचे कादगपत्रे सोबत बाळगावी,चलनाची रक्कम दुप्पट चौपट झाली आहे त्यामुळे खबरदारी बाळगावी

– विजयकुमार ठाकूरवाड

तहसिल रोडवरून माळीवाडा इथे जात असताना नेहमी वाहतूक कोंडी होती वाहने रस्त्यावर उभे असतात कोणाला काही बोलायला गेल्यास किरकोळ वाद होतात

– किशोर डोळस नागरिक

शासकीय कामकाजासाठी तहसिल कार्यालय नगरपालिका येथे जाणे येणे करावे लागते पण याठिकाणी जात असताना वाहतूक कोंडीची समस्या मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे पोलिस प्रशासनाने यावर उपाययोजना करणे गरजेचे आहे

– अक्षय काळे नागरिक

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (७२) समर्पण

श्री गुरुजींचे जीवन श्रेष्ठ समर्पणाचे एक उज्वल उदाहरण आहे. ध्येयका ध्यान ना भुले कार्य मे रत हो सदा हा संदेश श्री गुरुजींमध्ये संस्कारगत होता. ध्येयासाठी आपले दैनंदिन आयुष्य त्यांनी अक्षरशः वेचले. संकल्प शक्ती व कष्ट सहन करण्याची शक्ती त्यांनी ध्येय सिद्धीसाठी पणाला लावली. गुरुजी हजारो लोकांच्या मध्ये सतत वावरत असत आणि त्यांच्यामध्ये समाज बोध व राष्ट्रभक्ती जागवत असत. त्यांनी जीवनभर एकच व्यक्तित्व स्वीकारलं ते म्हणजे स्वयंसेवकत्व. त्यांची एकच आकांक्षा होती- पूर्ण स्वयंसेवक म्हणूनच जगायचं. त्यासाठी विश्राम आणि विराम ला त्यांनी आग्रहाने दूर सारले होते. गुरुजी स्वतःच सांगतात-मी एक दिवस गृहत्याग करून अध्यात्म मार्गावरून चालू लागलो, हिमालयात हिंडता हिंडता 'सारगाछी' आश्रमात स्थिर झालो. त्यांचे गुरु होते स्वामी अखंडानंदजी. स्वामीजी रामकृष्ण परमहंस यांच्या ११ पट शिष्यातील ते एक होते. एकदा स्वामी अखंडानंदजी गुरुजींच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाले होते-माधव तेरे सिरके बाल, तेरी दाढी-तेरे व्यक्तित्व को निखार रही है। हे तू सदैव असेच राहू दे. गुरुच्या भावनेचा आदर त्यांनी जीवनभर केला. आणि म्हणूनच त्यांच्या व्यक्तित्वावर अध्यात्मिकतेची छाप कायम होती.

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## एमजीएमचे प्रा.डॉ.राम गायकवाड यांची तिफण संपादक मंडळावर निवड



छत्रपती संभाजीनगर, दि.२२ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या भारतीय तसेच विदेशी भाषा संस्थेतील मराठी भाषा विभागात कार्यरत असलेले सहाय्यक प्राध्यापक प्रा.डॉ.राम मच्छिंद्र गायकवाड यांची कन्नड सारख्या ग्रामीण व दुर्गम भागातून प्रसिद्ध होणारे,भाषा, साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले यूजीसी केअर लिस्टेड त्रैमासिक तिफण दैनिकांत संपादकीय मंडळावर निवड करण्यात आली आहे.

तिफणने सोळाव्या वर्षात पदार्पण केले आहे. तिफणचे आजपर्यंत अनेक महत्वाचे विशेषांक प्रसिद्ध झालेले आहेत. तिफणच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. दर दोन ते तीन वर्षात तिफण संपादक मंडळाची पुनर्रचना करण्यात येते. आजपर्यंत अनेकांना संपादक मंडळावर संधी मिळाली आहे. २०२५ - २०२७ या दोन वर्षासाठी तिफण संपादक मंडळावर सदस्य म्हणून दैनिक लोकमत, दिव्य मराठी, पुण्यनगरी, देशदूत , एकमत आदी दैनिकांत संपादकीय मुद्रितशोधक पदावर प्रदीर्घ काळ योगदान दिलेले डॉ. गायकवाड यांची निवड झाल्यामुळे सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

प्रा.गायकवाड हे विविध नियतकालिकातून सातत्याने भाषा, साहित्य या अनुषंगाने लेखन करतात. साहित्य, समाज, संस्कृती, लेखनकौशल्ये, उपयोजित मराठी मुद्रितशोधन हा त्यांच्या संशोधनाचा व चिंतनाचा विषय आहे. मराठी भाषा आणि संशोधन क्षेत्रात त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. गत अनेक वर्षांपासून मराठी भाषेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख अभ्यासक्रम शिकवणे आणि विद्यार्थ्यांना विविध व्यावसायिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. एमजीएम विद्यापीठाच्यावतीने प्रा.गायकवाड यांचे एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके , भारतीय तथा विदेशी भाषा संस्थेचे संचालक डॉ.के.पी.सिंग आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# कालाष्टमी दहीहंडीने नाथषष्टी यात्रेची सांगता



तभा वृत्तसेवा

पैठण दि २२ :- दिनांक २० मार्च पासून सुरू झालेल्या नाथषष्ठी यात्रेची शनिवार दिनांक २२ मार्च रोजी सायंकाळी सूर्यास्त समयी श्री संत एकनाथ महाराज समाधी मंदिर तसेच बाहेरील डोम मध्ये स्वतंत्र दोन कालाष्टमी दहीहंडी ज्यात मंदिरातील दहीहंडी नाथवंशज रावसाहेब महाराज गोसावी तसेच बाहेरील डोम मधील दहीहंडी वारकरी सखाराम नागू घोंगडे शिंगुरी तालुका शेवगाव यांच्या हस्ते फोडून नाथषष्ठी यात्रा २०२५ ची सांगता करण्यात आली. यावेळी नाथनगरीत जमलेल्या लाखो भाविकांनी मोठया जड अंतःकरणाने आपला परतीचा प्रवास धरला.

खासदार संदीपान भुमरे, खासदार कल्याण काळे,आमदार विलास बाप्पू भुमरे, तहसीलदार दत्ता भारस्कर,उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे,मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे, हभप सखाराम महाराज अमळनेरकर, मुंबई दूध संघाचे नंदलाल काळे,पोलीस निरीक्षक संजय देशमुख,नायब तहसीलदार राहुल बनसोड, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे,उपमुख्याधिकारी सोमनाथ गर्जे,गणेश मडके,महेश जोशी,काँग्रेसचे प्रदेश सचिव रवींद्र काळे, दत्ता गोर्डे,तालुकाध्यक्ष अण्णासाहेब लबडे,दारूबंदी अधिकारी जयंत पाटील, तालुकाध्यक्ष विनोद तांबे,शहराध्यक्ष सिद्धार्थ परदेशी,शहराध्यक्ष जितू परदेशीउमेश पांडुरे,,जितू पांडे, पवन लोहिया,अश्विन गोजरे, नवनाथ जगधने, शहादेव लोहारे,प्रशांत जगदाळे, संभाजी काटे,गोपनीय शाखेचे मनोज वैद, गणेश शर्मा,विष्णू मिटकर,मनीष औटे,अतिष गायकवाड, रघुनाथ ईच्छय्या,गणेश पवार,वैभव पोहेकर,जितेंद्र अटक, श्याम जगताप सह हजारोंच्या संख्येने दोन्ही काला दहीहंडीला नाथभक्त उपस्थित होते.

## सोयगाव लोक अदालतमध्ये ४४ प्रकरणात तडजोड



सोयगाव,दि.२२ मार्च : दिवाणी न्यायालय,कनिष्ठ स्तर,सोयगाव येथे शनिवारी रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.सदरच्या लोक अदालत मध्ये न्यायाधीश रोहित पाठक हे पॅनल प्रमुख म्हणून तर पॅनल पंच म्हणून ड.शुभम आगे,सोयगाव हे उपस्थित होते.या लोक अदालत मध्ये वादपूर्व १३ प्रकरणे निकाली निघाली ज्यामध्ये ७ लाख २२ हजार रुपये एवढी वसुली झाली तसेच सोयगाव न्यायालयातील प्रलंबित असणारे ३१ प्रकरणे निकाली काढण्यात आले. ज्यामध्ये रक्कम रुपये ९,३५,३५९ /- एवढी वसुली झाली.सदरची लोक अदालत यशस्वी करण्यासाठी न्यायालयीन कर्मचारी तान्हीराम शेळके (सहायक अधीक्षक),एस.एल.पैठणकर (नाझर),दादामिया पठाण,योगेश माळी,रोहित ढेपले,संदीप तोंगल,कृष्णा मोरे, उदयभान काशीदे हे हजर होते.तसेच सदरच्या लोक अदालत मध्ये सोयगाव न्यायालयातील ड.राजेश गिरी,ड.योगेश जावळे,ड.सचिन गिरी,ड.सतीश सूर्यवंशी,ड.आर.एस.महाजन,ड.अंबादास जाधव,ड. शशी महाजन,सह सर्व वकील व पक्षकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जनरल झेड चीफ गेमिंग ऑफिसर पदासाठी 10 लाख देणार

नवी दिल्ली, : आइकू, एक उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड, २०२५ साठी त्यांच्या चीफ गेमिंग ऑफिसर शोधत आहे, जो स्मार्टफोन स्पेसची सह-निर्मिती करण्यासाठी, ब्रँडच्या ईस्पोर्ट्स व्हिजनचे नेतृत्व करण्यासाठी आणि भारतातील शीर्ष ईस्पोर्ट्स गेमर्सशी सक्रियपणे सहभागी होण्यासाठी जबाबदार असेल. ही संधी १८ ते २५ वयोगटातील तरुण गेमिंग उत्साहींना त्यांच्या आवडीचे यशस्वी आणि फायदेशीर करिअरमध्ये रूपांतर करण्याची संधी देते.

## बिडकीन येथील ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटेन प्री इंग्लिश स्कुल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २२ मार्च : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल व ब्लु माउंटेन प्री इंग्लिश मध्ये ६ वा वार्षिक स्नेहसंमेलन उत्सव सोहळा शुक्रवार दि. २१ मार्च २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी म्हणुन छत्रपती संभाजीनगरचे उप कामगार आयुक्त युवराज पडियाल आणि ग्रामीण कथाकार, सहशिक्षक राजेंद्र गहाळ यांची उपस्थीती होती. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला व शाळेच्या मुख्यध्यापीका सविता तोतला यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांचा शाल आणि श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. सुरुवातील मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पुजन व दीप प्रज्वलन करुन कार्यक्रमास सुरुवात झाली. विविध स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना अध्यक्षांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पारितोषिक वितरण करण्यात आले. शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक वर्षा चव्हाण, काजल देशमुख, अनिता धर्मे, भारती जाधव, सोनाली खोंड, अवनी चव्हाण, मनिषा जाधव, प्रतिक्षा पोटे, रेखा चव्हाण, नंदीनी चव्हाण, ज्योती राठोड, नीता तायडे, प्रमोद शिंदे, नवनाथ बांगर, पवन घुगे, रमेश सर, प्रकाश करोडीवाल, कृष्णा भालेराव, हर्षद देविदास, तसेच शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी विशेष परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शाळेतील शिक्षकांनी व शालेय विद्यार्थी समितीने केले तर आभार प्रदर्शन शाळेच्या शिक्षिका काजल देशमुख यांनी केले. राष्ट्रगिताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# तालुक्यातील तलाव होणार गाळमुक्त; लोक चळवळ उभा राहण्याची गरज : संतोष गोरड

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.२१ मार्च- तालुक्यातील मध्यम प्रकल्प, लघु प्रकल्प गाळमुक्त करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून लोकचळवळ उभा राहण्याची गरज असल्याचे उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी आवाहन केले आहे,

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे कुशल मार्गदर्शना खाली व उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांच्या प्रयत्नातून कन्नड तालुक्यात प्रत्येक गावामध्ये तलावातील गाळ काढण्यासाठी मोठी चळवळ उभी करण्यात येत आहे. यासाठी गाळ मुक्त धरण गाळ युक्त शिवार अंतर्गत जलसंधारण विभाग ,कृषी विभाग, महसूल विभाग, जिल्हा परिषद सिंचन, ग्राम पंचायत व पंचायत समिती आदी विभाग हे सर्व विभाग कामाला लागले असून सेवाभावी संस्थांचा सुद्धा सहभाग मोठ्या प्रमाणावर होत आहे.

यानुसार तालुक्यामधील १. मृद व जल संधारण विभाग - मेहगाव, देवपुल, निंभोरा, वासडी (प्रेरणा फाऊंडेशन) विटा, साकेगाव, अंधानेर, जैतापूर, हतनूर (ज्योती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था) २. जि.प.ल.पा. विभाग - मुंडवाडी (ज्योती बहुउद्देशीय सेवा भावी संस्था) ३. जल संपदा विभाग लघु पाटबंधारे विभाग क्र. १ - शिवना टाकळी, खारी, कोळवाडी, आठेगाव, खेड़ा (मराठवाडा ग्रामीण विकास संस्था) ४. औरंगाबाद पाटबंधारे विभाग - माठेगाव, औराळा, पळशी, मूगसापूर, ढेकू (मराठवाडा ग्रामीण विकास संस्था) नेवपूर, वाघदरा, गणेशपूर, निंभोरा, आंबाडी, आंबा (प्रेरणा फाऊंडेशन) या सेवाभावी संस्था काम करणार असून उर्वरित सर्व गावांमध्ये ग्रामपंचायतच्या माध्यमातून हे काम केले जाणार आहेत.

याकरिता गावागावात दवंडी देण्यात आले आहे व ग्रामपंचायत मध्ये सेवाभावी संस्था किंवा ग्रामपंचायत अधिकारी यांचे कडे ज्यांना शेतीमध्ये गाळ पाहिजे आहे. त्यांनी तात्काळ मंगळवार पर्यंत नोंदणी करायची आहे व त्या अनुषंगाने शासनाकडून सुद्धा अनुदानाचा लाभ होणार आहे. मंगळवारी सर्व ग्रामपंचायत ठराव घेऊन प्रस्ताव मृद व जलसंधारण अधिकारी मार्फत जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले जातील. याकरिता जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभाग घ्यावा व जास्तीत जास्त ग्रामपंचायतींनी पुढाकार घ्यावा. असे आवाहन तहसीलदार विद्याचरण कडवकर, गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे, उप विभागीय जलसंधारण अधिकारी यतिन कोठावळे तसेच जिल्हा परिषद सिंचन विभागाचे उप अभियंता विजय कांबळे, जलसंपदा विभागाचे उप अभियंता एस. टी. कुमावत, अशपाक शेख, अंकुर दांडगे यांनी केले आहे.

## जाहीर प्रगटन

पोलीस ठाणे फर्दापुर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण

विनंती की, वरिल विषयात नमुद केले प्रामणे पोलीस ठाणे फर्दापुर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथे एकुण (०१) मोटार सायकल मागील दोन वर्षापासुन पोलीस ठाणे आवारात पडून आहे. सदर वाहनाचे मुळ मालकाचा शोध घेतला असता मुळ मालक मिळुन येत नसल्याने सदरचे वाहन हे बेवारस पडून असल्याने ते पावसाने भिजुन नाश पावत आहेत तरि सदर जाबिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्याच येते की खालील दिलेल्या यादी प्रामणे ज्याची वाहने असतील त्यांनी सदरचे वाहनांचे कागदपत्र व वाहनाची ओळख पटवुन जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन (१५ दिवसाचे आत) आपले वाहन घेवुन जावे, अन्यथा वाहन शासन जमा करून ती लिलावाद्वारे विक्री केले जाईल व सदरिल रक्कम शासन जमा होईल याची नोंद घ्यावी वाहनाची यादी पुढील प्रमाणे.

पोलीस ठाणे फर्दापुर छत्रपती संभाजीनगर ग्रामीण येथिल बेवारस वाहन यादी

| अक्रं | बेवारस जप्ती क्रं | मुद्देमाल-क्रं | वाहनाचे वर्णन | इंजिन नं | चेसिस क्रं |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०१/२०२३ | ०१ | एम.एच.१९. एडी. ४९७९. | DUMBLG42280 | DUMBLG54591 |

स्वाक्षरित/-
सहाय्यक पोलीस निरिक्षक
पोलीस ठाणे फर्दापुर

## सेन्सोडाईन ने स्थापन केला गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड 2025 वर्ल्ड ओरल हेल्थ डे अभियान सुरु करणार

छत्रपती संभाजीनगर- हेलेऑन (पूर्वीची ग्लॅक्सोस्मिथक्लाईन कन्झ्युमर हेल्थकेअर) यांचा आघाडीचा मौखिक देखभाल ब्रँड असलेल्या सेन्सोडाईनने २४ तासांत सर्वाधिक ऑनलाइन डेन्टल स्क्रीनिंग टेस्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न करून यशस्वीरित्या एक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' स्थापन केला आहे. हा विक्रमी उपक्रम महा कुंभ २०२५ येथे राबविण्यात आला. या उपक्रमात २७,००० पेक्षा जास्त लोकांनी दातांची तपासणी करवून घेतली. भारतीयांना सक्रिय मौखिक देखभालीचे महत्त्व समजावून देण्याच्या बाबतीतील हे एक लक्षणीय पाऊल ठरले. या व्यतिरिक्त, आपल्या निष्ठेला अनुसरून सेन्सोडाईन ने आपल्या अलीकडेच लॉन्च झालेल्या २० रु. च्या छोट्या टुथपेस्ट पॅक्सचे वितरण केले. दातांच्या संवेदनशीलतेपासून संरक्षण मिळवणे अधिक किफायतशीर आणि सहजप्राप्य बनवण्यासाठी खास तयार केलेले हे पॅक आहेत.या विक्रमापासून सेन्सोडाईन च्या वर्ल्ड ओरल हेल्थ डे अभियानाची सुरुवात देखील झाली आहे. या अभियानाचा उद्देश लोकांना अधिक चांगल्या मौखिक आरोग्याच्या दिशेने पहिले पाऊल उचलण्यासाठी प्रोत्साहित करण्याचा आहे. एक दशकापेक्षा अधिक काळापासून सेन्सोडाईन ने लोकांना दातांमधील संवेदनशीलता प्रारंभिक टप्प्यात ओळखून त्यावर उपाययोजना करण्यासाठी सक्षम बनवले आहे आणि देशभरात 'चिल टेस्ट्स' आयोजित केल्या आहेत. या उपक्रमामुळे लक्षावधी लोकांना त्यांच्या दातांच्या आरोग्याची स्थिती ओळखण्यास, वेळेवर डॉक्टरी सल्ला घेण्यास तसेच आपल्या आवडत्या खाद्य पदार्थांचा आस्वाद घेण्यासाठी सुदृढ होण्यात व आपले एकंदरित जीवनमान सुधारण्यात मदत झाली आहे.

# सकल जैन समाज छत्रपती संभाजीनगर ची भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समिती - २०२५ ची कार्यकारणी जाहीर



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी २६२४व्या श्री.भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव छत्रपती संभाजीनगर येथे सकल जैन समाजाच्या माध्यमातुन साजरा करण्यात येणार असुन या महोत्सवाची नविन कार्यकारणीची निवड करण्यासाठी सकल जैन समाजाचे अध्यक्ष श्री.राजेंद्रबाबुजी दर्डा यांच्या उपस्थितीत सकल जैन समाजाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महासचिव महावीरजी पाटणी,कोषाध्यक्ष जी.एम.बोथरा,मिठालाल कांकरिया,खंडेलवाल दिंगबर जैन पंचायतचे अध्यक्ष महावीर पाटणी,वर्धमान स्थानकवासी श्रावक संघाचे अध्यक्ष झुंबरलाल पगारिया, जैन श्वेतांबर मुर्तीपुजक संघाचे अध्यक्ष अनिलकुमार सचेती, तेरापंथ समाजाचे अध्यक्ष कौशीक सुराणा, अग्रवाल दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष मुकेशे साहुजी, सैतवाल दिगंबर समाजाचे अध्यक्ष दिगंबर क्षिरसागर, यांच्या सानिध्यात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीत जन्मकल्याणक महोत्सव समिती २०२५ ची कार्यकारणी ची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी श्वेतांबर जैन स्थानकवासी श्रावक संघाचे स्वप्नील पारख, कार्याध्यक्ष पदी अग्रवाल दिगंबर जैन समाजाचे प्रतिक साहुजी, महिला कार्याध्यक्ष श्वेतांबर मुर्तीपुजक जैन संघाच्या संगीता संचेती, महासचिव पदी श्वेतांबर मुर्तीपुजक संघ निलेश जैन, कोषाध्यक्ष सैतवाल दिगंबर जैन समाजा बाहुबली वायकोस, कार्यकम सयोंजक जैन श्वेतांबर तेरापंथ संघाचे पंकज साकला, सचिव खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत चे प्रमोद पाटणी आदींची निवड करण्यात आली. गेल्या वर्षाचे अध्यक्ष निलेश पहाडे यांनी २०२४ चा लेखा जोखा बैठकीत मांडला. त्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. सभेचे प्रास्ताविक महासचिव महावीर पाटणी यांनी केले. तसेच अध्यक्ष राजेंद्रबाबुजी दर्डा यांनी सभेते मार्गदर्शन केले. यावेळी सकल जैन समाजाचे उपाध्यक्ष प्रशांत देसरडा,संजय संचेती, विलास साहुजी, रवि मुगदिया, प्रकाश झांबड, मिठालाल कांकरिया, निलेश पहाडे, प्रकाश अजमेरा, इंदरचंद संचेती, निलेश सावलकर, विनोद बोकडीया, राजेश मुथा भारती बागरेचा , डिंपल पगारीया, मंजु पाटणी, मिना पापडीवाल, सुनिता छल्लानी, वंदना कटारीया, भारती बाकलीवाल, सुधाकर क्षिरसागर, रवि लोढा, अविनाश गवळी, हर्षल साहुजी, रैपराज सुराणा, गजानन .व्यवहारे प्रमोद डेरे विजय सुगधी अमोल सूगधी आदीची उपस्थिती होती.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.२०६/२०२५

अर्जदार : १) हरीभाऊ देविदास शेळके, वय ६४ वर्षे, धंदा शेती रा भोयगाव ता. गंगापुर ह. मु. शेळके निवास, पंढरपुर ता. जि. छत्रपती संभाजीनगर २) गौतम देविदास शेळके वय ४९ वर्षे, धंदा शेती रा भोयगाव ता. गंगापुर बॉर्ड नं.१, पंढरपुर ता जि. छत्रपती संभाजीनगर ३) रामदास देविदास शेळके, वय ५४ वर्षे, धंदा शेती रा भोयगाव ता. गंगापुर ह.मु. पंढरपुर ता जि. छत्रपती संभाजीनगर ४) बाबासाहेव देविदास शेळके, वय ५२ वर्षे धंदा शेती रा भोयगाव ता. गंगापुर ह.मु. शेळके निवास, पंढरपुर ता. जि. छत्रपती संभाजीनगर ५) लता भ्र. गौतम रोडगे, वय ४६ वर्षे धंदा घरकाम रा. पंढरपुर ता. जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.वी. पदार यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ५ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व वहिण असुन ते वरील नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे वडील नामे देविदास आप्पाजी शेळके हे मुळचे मोजे भोयगाव ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते कामानिमीत्त पंढरपुर ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे गेले व ते तेथेच दिनांक १९/१०/२०२० रोजी मयत झाले आहे व तसेच अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई नामे मालनबाई देविदास शेळके ह्या दिनांक ०५/०८/२०२१ रोजी मयत झालेल्या आहे. मयत देविदास आप्पाजी शेळके व मयत मालनवाई देविदास शेळके अर्जदार क्र.१ ते ५ हेच कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दतीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २०/०३/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय गंगापुर

## अग्रलेख...

# सुधारणेतून सुरक्षिततेची हमी!

जन्माला येणाऱ्या प्रत्येकास माणूस म्हणून ओळख मिळते. ते नैसर्गिकही आहे. पण नागरिक म्हणून किंवा कोणत्याही एका देश, प्रदेशातील समूहातील व्यक्ती म्हणून ओळख मिळण्यासाठी त्याच्या माणूसपणालाही नागरिकत्वाच्या कायदेशीर बाबींचे कवच असणे गरजेचे असते. ते तसे नसेल तर माणसाच्या नागरिकत्वाची ओळख पुसली जाते आणि नागरिकत्व नसलेल्या माणसास त्याच्या वास्तव्याच्या ठिकाणी असलेल्या कायदेशीर हक्कांपासून वंचित राहावे लागते. म्हणूनच जन्माला आल्यानंतर होणारी पहिली कायदेशीर सरकारी नोंद म्हणजेच, जन्माचा दाखला हा माणसाच्या नागरिकत्वाचा पहिला पुरावा ठरतो आणि अशी नोंद असणे हा जन्माला येणाऱ्या बाळाचा नागरिक म्हणून पहिला हक्क असतो. पण या हक्काला भ्रष्टाचाराचे ग्रहण लागले. जेथे कायदे असतात तेथे त्यापासून बचाव करण्याच्या पळवाटाही असतात. बनावटगिरी करणाऱ्या टोळ्या जागोजागी उगवत गेल्या आणि ज्यांना कायदेशीरपणे हा हक्क मिळविता येत नाही त्यांच्याकरिता बनावट जन्मदाखले देऊन त्याद्वारे पैसा कमावण्याचा भ्रष्ट मार्ग उदयास आला. हा भ्रष्टाचार आजचा नाही. गेल्या अनेक वर्षांपासून त्याची पाळेमुळे जागोजागी रुजत गेली. अशा घुसखोरांना आश्रय देण्यासाठी बनावटगिरीचा भ्रष्ट मार्ग अवलंबिणे हा खरे तर देशद्रोह आणि अधिकृत नागरिकांच्या हक्कावरील घाला ठरतो. पण केवळ कोणत्याही मार्गाने पैसा कमावण्याची हावरट वृत्ती वाढत गेली की, भ्रष्टाचाराची लाज वाटणे बंद होते आणि भ्रष्टाचारात बुडालेल्या निर्ढावलेल्या मनाला देशद्रोहाच्या जाणिवा किंवा अन्यांच्या कायदेशीर हक्कांची पायमल्ली केल्याचे दुःखदेखील जाणवत नाही. असा निर्ढावलेपणा अनेकदा सरकारी कर्मचाऱ्यांत उघडकीस आला आहे. खरे तर सर्वसामान्य समाजास भ्रष्टाचाराचे वावडेच असते. भ्रष्ट मार्गाने कोणतीही सवलती, लाभ प्राप्त करून घेणे किंवा व्यक्तिगत कामे करून घेणे कोणासही फारसे रुचणारे नसते. पण भ्रष्टाचाराची एक साखळी असल्याने, अशा साखळीत जखडल्या जाणाऱ्या व्यक्तीस अनिच्छेनेदेखील भ्रष्ट मार्गांचा अवलंब करावा लागतो. आपण कधीच कोणताही भ्रष्टाचार केला नाही किंवा भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून कोणतेही गैरफायदे उकळले नाहीत, असे छातीठोकपणे सांगणारी माणसे आज समाजात अभावानेच आढळतील, हे वास्तव असल्याने भ्रष्टाचार हाच शिष्टाचार समजणाऱ्या प्रवृत्ती उजळ माथ्याने वावरत असतात. म्हणूनच पहिल्या हक्कावर घाला घालणारा हा भ्रष्टाचार देशात बोकाळत गेला आणि नागरिकत्वाचे मूलभूत हक्क बहाल करणाऱ्या या सरकारी कागदास बनावटगिरीचा बेमालूम मुलामा देऊन तो विकण्याचा धंदा झाला. गेल्या वर्षीच्या ऑगस्टमध्ये अशाच धंद्याचा एक अड्डा उत्तर प्रदेशात रायबरेली जिल्ह्यातील सलोन या गावात उघडकीस आला होता. देशभरातील कोणत्याही राज्याच्या कोणत्याही गावात जन्म झाल्याचा पुरावा म्हणून जन्माचे दाखले देणाऱ्या या टोळीने जवळपास दीड वर्षांहून अधिक काळापासून अवैधपणे राहणाऱ्या अनेकांना जन्माचा दाखला देऊन जन्मतः मिळणारा पहिला हक्क बनावटगिरीने बहाल केला. उत्तर प्रदेशातील ४७ जिल्ह्यातील नागरिकांचे जन्मदाखले याच गावातील या टोळीने तयार केल्याची धक्कादायक बातमीही त्यावेळी उजेडात आली. सरकारी यंत्रणा सजग झाल्या आणि हाथरसमधील एका गावात व्हिडीओद्वारे बनावट ओळखपत्र तयार करून दाखले देणाऱ्या टोळ्यांचाही छडा लागला. या टोळ्यांनी बिहारबरोबरच हरयाणा, झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेशातील नागरिकांनाही जन्माचे बनावट दाखले विकल्याचे स्पष्ट झाले.

देशभरातील अनेक ठिकाणी चालणारा हा धंदा अद्याप बंद झालेला नाही. महाराष्ट्रात मालेगाव, अमरावती, लातूर यांसारख्या शहरांत बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बनावट जन्मदाखले मिळविल्याचे काही धागेदोरे सरकारच्या हाती लागले आहेत. त्यामुळे केवळ माणूस असण्याचा गैरफायदा घेऊन घुसखोरांना नागरिकत्वाचा कायदेशीर हक्क मिळवून देणाऱ्या या प्रकाराची सध्या महाराष्ट्रात चर्चा सुरू आहे. यापैकी काही उघडकीस आलेल्या प्रकरणांची चौकशी सुरू आहेच; पण तेवढी बाब पुरेशी नाही, हे ओळखून राज्य सरकारने आता कायद्याच्या चौकटी अधिक काटेकोर राहण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या आठवड्यात राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधिमंडळात याची घोषणा केली आणि जन्म-मृत्यूच्या बनावट दाखल्यांचा धंदा रोखण्यासाठी १९६९ च्या संबंधित कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी कार्यपद्धती आखून देणारा निर्णयही जाहीर केला. आता त्याचा शासकीय आदेश जारी झाला असल्याने महाराष्ट्रात अवैधपणे घुसखोरी करून नागरिकत्वाचे लाभ मिळवत बेकायदा धंद्यांना खतपाणी घालणाऱ्या परकीय व्यक्तींच्या व बनावट दाखले तयार करून देणाऱ्या टोळ्यांच्या मुसक्या आवळण्याचा मार्ग सोपा झाला आहे. दीर्घकाळापासून या धंद्याची कुणकुण सरकारी यंत्रणांना लागली होती. अशी काही प्रकरणे आसपास असल्याची कुजबूजही कुठे ना कुठे कानावर येत होती, पण त्याचा बीमोड करण्याची इच्छाशक्ती मात्र महायुती सरकारने दाखविली, याबद्दल फडणवीस सरकारचे आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन केलेच पाहिजे. भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांनी या प्रकरणाचा पुरेपूर पाठपुरावा करून काही प्रकरणांची पाळेमुळे खणून काढली. एका राष्ट्रीय हक्काच्या लढ्यातील त्यांचा हा सहभाग अभिनंदनीय ठरतो.

केवळ नागरिकत्वाचे हक्क बेकायदेशीरपणे उकळणे एवढाच या धंद्यातून निर्माण झालेला धोका नाही. बेकायदेशीरपणे देशात घुसखोरी करून असे दाखले मिळवत राजरोसपणे नागरिक म्हणून वावरणाऱ्या बांगलादेशी किंवा रोहिंग्यांमुळे देशाच्या सुरक्षिततेसही गंभीर धोका संभवत असल्याने, घुसखोरी रोखण्याचे आव्हान स्वीकारण्याचे पहिले पाऊल म्हणून महायुती सरकारच्या या निर्णयाकडे पाहावयास हवे. बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरांना बनावट दाखले सहज प्राप्त करता येऊ नयेत आणि भारतीयांच्या नागरिकत्वाच्या हक्क प्रक्रियेत पारदर्शकता यावी यासाठी संबंधित बदल करण्यात आल्याची माहिती महसूलमंत्री बावनकुळे यांनी विधिमंडळात दिली. बनावट जन्मदाखले हा केवळ कागदोपत्री फेरफार करून होणारा भ्रष्टाचार नाही, तर त्यामागे घुसखोरी करून देश अस्थिर करणाऱ्या कारवाया करण्याचे एक मोठे षडयंत्रदेखील आहे. दहशतवादी कारवायांना पोषक वातावरण निर्माण करण्याच्या हालचाली व समाजात भीतीचे वातावरण पसरविणाऱ्या कारवायांमागे अशाच शक्तींचा हात असल्याचा संशय व्यक्त होत असतो. अवैधपणे घुसखोरी करून बनावट दाखल्यांच्या आधारे सरकारी योजनांचा लाभ मिळविल्याची काही प्रकरणे लाडकी बहीण योजनेच्या पडताळणीतही उघड झाली होती. त्यामुळे राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय एक मोठे षडयंत्र उद्ध्वस्त करणारा ठरू शकेल. अर्थात, सरकारी यंत्रणेतील लोभीपणातून भ्रष्ट मार्गाचा अवलंब करणारे झारीतील शुक्राचार्य ही या धंद्याची बीजे आहेत. सरकारी कार्यपद्धतीमधील या त्रुटी दूर करण्यासाठी असे प्रकार झाल्याचे सिद्ध होताच संबंधितावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याचा निर्णयही सरकारने जाहीर केला असून त्याची कार्यवाही करण्याची इच्छाशक्ती दाखविण्याचे आव्हानही आता शासनास पेलावे लागणार आहे. महाराष्ट्राच्या मालेगावसारख्या शहरात हजारो खोटे दाखले देण्यात आल्याच्या तक्रारी सुरू होताच सुमारे तीन हजार दाखले रद्द करण्यात आल्याने सरकारी यंत्रणेतील त्रुटींवर नेमके बोट ठेवले गेले आहे. याच दाखल्यांचा आधार घेऊन अनेक बांगलादेशी घुसखोरांनी भारतीय नागरिक असल्याचा पहिला हक्क प्राप्त केला होता, असेही स्पष्ट झाले आहे. या भ्रष्टाचारात हात असल्याच्या आरोपावरून दोघा सरकारी अधिकाऱ्यांना निलंबित करून राज्य सरकारने आपल्या इच्छाशक्तीचा पुरावा दिला आहेच; पण प्रशासनातील पारदर्शकता आणि जबाबदारीच्या जाणिवेची हमीदेखील दिली आहे. त्यामुळे कायद्यात केलेल्या या सुधारणा म्हणजे केवळ प्रशासकीय सुधारणा नाहीत, तर देशाच्या सुरक्षिततेशी संबंधित असलेली एक यशस्वी रणनीती ठरली आहे. नागरिकत्वाचा हक्क मिळण्याची प्रक्रिया विश्वासार्ह अशीच असली पाहिजे. त्याची हमी आता प्रामाणिक नागरिकांना मिळेल, यासाठी सरकारच्या नव्या नीतीचे स्वागत करायलाच हवे! ▮

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१५)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

श्री समर्थ रामदास स्वामी म्हणतात, जग हे धकाधकीचा मामला आहे. संघर्ष, स्पर्धा, ईर्ष्या, प्रभुत्वाची आवड हे मानवी स्वभावाचे मानसशास्त्र आहे. मूलभूत प्रवृत्ती आहे. त्या प्रवृत्तीला अनुसरून विविध साधनांचा उपयोग करून वरील वृत्तीला तृप्त करण्याचा प्रयत्न सतत चालत असतो. त्यातूनच व्यक्तिगत स्तरापासून तो जागतिक स्तरापर्यंतच्या विविध स्पर्धायुक्त संघर्षाच्या ठिणग्या अखंडपणे उडत असतात. त्याच ठिणगीचा वणवा होऊन त्यातून 'महायुद्धे' निर्माण होतात. महाभारतातील कुरुक्षेत्रापासूनचा प्रारंभ झालेला हा प्रवास अद्यापही थांबलेला नाही. त्याचे साद-पडसाद जगातील अनेक भागात आजही उमटताना दिसतात. त्याचमुळे प्रत्येक राष्ट्राला सर्वप्रकारच्या अस्त्र सामर्थ्याने 'नित्यसिद्ध' राहणे, ही काळाची गरज आहे. महाभारताचा अधिकृत वारसदार असलेल्या आधुनिक भारताला तर आहेच आहे. महर्षी व्यासांचा आदेशही तोच आहे, संदेशही तोच आहे की, ''लक्षात ठेवा की, 'शस्त्रेण रक्षिते राष्ट्र.' त्यासाठी 'पार्था अस्त्रसिद्ध' हो.'' या आदेशाने जसे पांडव संघर्ष सिद्ध झाले त्याप्रमाणे देश, धर्म, समाज आणि संस्कृतीच्या संरक्षणार्थ आणि त्याचा विनाश करण्याचे स्वप्न जोपासणाऱ्या आधुनिक 'धृतराष्ट्री' मनोवृत्तीशी दोन हात करण्यासाठी चक्रवर्ती भरताचे वारसदार असलेल्या प्रत्येक भारतीयाला तयारच राहावे लागेल, ही काळाची चेतावणी आहे. आधुनिक भारताची अस्त्रसिद्धतेकडे त्या दृष्टीने वाटचाल चालू आहे. विविध प्रकारची अत्याधुनिक क्षेपणास्त्रे आणि मिसाईल्स आपल्या 'डी.आर.डी.ओ' आणि 'इस्रो'सारख्या संस्थांद्वारा संशोधित होताहेत; त्यांचे यशस्वी प्रक्षेपण होत आहे, हे भारताच्या भविष्यकालीन होणाऱ्या वाटचालीची हमी देणाऱ्या आणि स्वामी विवेकानंदांनी शंभर वर्षांपूर्वी 'आता केंद्र भारत वर्ष' या केलेल्या भविष्यवाणीची पूर्ततेकडे होणाऱ्या फलनिष्पत्तीचे दर्शक आहे, असे समजायला हरकत नाही.

अत्याधुनिक समजले जाणारे अणुविज्ञान आणि त्यावर आधारित असलेली विविध अस्त्र संपदा या गोष्टी भारतीय ज्ञानपरंपरेला नवीन नाहीत. प्राचीन काळापासून रामायण, महाभारत या महाकाव्यात त्याचे स्पष्ट उल्लेख सापडतात. महज विश्वामित्र हे विविध अस्त्रांचे ज्ञाते म्हणून आजच्या परिभाषेत संशोधक म्हणून प्रसिद्ध होते. त्यांनी यज्ञ रक्षणासाठी राम आणि लक्ष्मण यांना सोबत घेतले. त्या प्रवासात त्यांनी एका मुक्कामात त्या दोघांना गायत्री मंत्रावर अधिष्ठित सुमारे ३०० महाअस्त्रांचे विधिवत दान केले. त्यांचे प्रयोग, प्रकटीकरण, स्तंभन, प्रक्षेपण, उपसंहार या विविध प्रक्रियांचे तंत्र (टेक्निक) त्यांना सांगितले. त्याचा उपयोग राम-लक्ष्मणांनी यज्ञ संरक्षणाच्या वेळी स्वर, दुषण, मारीच यांच्याशी झालेल्या युद्धात १६ हजार बलाढ्य राक्षसांचा विनाश करण्यात यशस्वीपणे केला. पुढे रावणाशी झालेल्या सर्वंकष युद्धातही त्यांना त्याचा उपयोग झाला, हे आपल्याला विदित आहेच.

अणुविज्ञानावर आधारित, मंत्र सामर्थ्यावर अधिष्ठित ही अस्त्र-परंपरा महाभारतात अतिशय विकसित स्वरूपात, बहुआयामी आणि अतिशय सूक्ष्म स्वरूपात (इन सटल फॉर्म) विद्यमान असलेली आढळते. आधुनिक अस्त्र निर्मितीमुळे त्यासंबंधात प्राप्त झालेल्या ज्ञानामुळे आता रामायण-महाभारतात वर्णन केलेल्या या गोष्टी वा युद्धाची वर्णने ही आधुनिक न्युक्लिअर सायंटिस्टला कविकल्पना वा 'पुराणातील वांगी' वाटत नाहीये तर त्यांना त्यात 'सम ग्लिमसेस ऑफ न्यूक्लिअर फ्युझन अँड कॉम्बिनेशन्स' जाणवत आहेत. (एक रशियन संशोधक). त्यामुळे ते भारताच्या प्राचीन युद्ध विज्ञान व त्यातील अस्त्र संपदेकडे आकर्षित झाले आहेत. त्याचे काही उल्लेख आपण मागील दोन लेखांमध्ये पाहिलेच आहे. भारतीय ज्ञान परंपरेतील अणुविज्ञानाची शास्त्रशुद्ध परंपरा ही प्राचीन असली, तरी तिचे शास्त्रीय स्वरूप महर्षी कणाद यांच्या वैशेषिक दर्शनात आबद्ध असलेले आपल्याला दिसते. अणू-परमाणूच्या मूलभूत शास्त्रीय व्याख्या (डेफिनेशन्स) शिवपुराण, वायुपुराण यात आढळून येतात. या क्षेत्राशी संबंधितांनी मुळातून त्यांचा शोध घ्यावा. श्री समर्थांनी उपासनेसाठी रचलेले भीमरूपी स्तोत्रात 'अणुपासोनि ब्रह्मांडा एवढा होत जातसे...' त्याच्या पुढे 'मेरुमांदारही धाकुटे' वाटू लागतात. अशा अणूच्या सर्वव्यापी स्वरूपाचे व इतर पदार्थांशी असलेली त्याची सापेक्षता (रिलेटिव्हिटी) स्पष्ट केली आहे. अशा अनेक वैज्ञानिक संकल्पना आपल्या उपासना शास्त्रात दिसून येतात. त्या दृष्टीने आपण उपासना करीत असू तर! कोणत्याही ज्ञान परंपरेचा, शास्त्र परंपरेचा अधिकृत पुरावा हा त्या विषयाशी संबंधित ग्रंथसंपदा असते. भारतात नालंदा आणि तक्षशिला येथे या विविध शास्त्रांशी संबंधित सहस्रावधी ग्रंथाचा संग्रह होता. मानवतेचे, सुसंस्कृतीचे, विविध ज्ञानशाखांचे नष्टचर्य हेच ज्यांच्या धर्मांधतेचे एकमेव लक्षण असलेल्या बख्त्यार खिलजीने विश्वविद्यालयात शिकविणाऱ्या १६०० प्राध्यापकांची कत्तल आणि ६० हजार ग्रंथांना आग लावून भस्म करण्याचे नृशंस कृत्य केल्याची नोंद इतिहासाने केली आहे. त्यातून फार थोडे ग्रंथ परदेशी प्रवाशांनी त्यांच्या देशात नेले. बौद्ध भिक्षूंनी तिबेटमध्ये नेलेत. त्यावरूनही अणुविज्ञान, अस्त्रविज्ञान किती पराकोटीला गेले होते, याची कल्पना येऊ शकते. त्यातील काही प्रमुख ग्रंथांची नावे अशी-

१) **शक्ती तंत्र** : महर्षी अगस्ती- मूळ प्रकृतीपासून निर्माण होणाऱ्या ३२ विविध एनर्जीचे विश्लेषण.

२) **अंशुबोधिनी** : महर्षी भारद्वाज- अणू-परमाणू, त्यांची स्पंदने, गती त्यांचे संघनन (ॲसिमिलेशन), विघटन (अणूचे विच्छेदन) याचे तंत्र सूर्यकिरणातील विविध शक्तीचे मापन यांच्या साह्याने अस्त्रांचा वापर महाभारतातील द्रोणाचार्य हे भारद्वाज कुलोत्पन्न होते.

३) **सौदामिनी कला** : महर्षी मातंग- यात प्रकाशलहरी व नादलहरी यांच्या संशोधनातून अनेक अद्भुत प्रयोगांची क्षमता असणारी अस्त्रसंपदा निर्माण करणे.

४) **यंत्र सर्वस्व** : भारद्वाज- संकल्पानुसार टारगेट-ओरिएंटेड मिसाईल युक्त अनेक यंत्रांची, विमानांची निर्मिती कशी करायची, याचे समग्र विवेचन करणारा ग्रंथ. (स्वर्गदर्शन ग्रंथामधून १९५९)

या प्रकारच्या अनेक ग्रंथांची निर्मिती ऋषिमुनींनी केली होती. त्यावर आमचे युद्ध विज्ञान आधारित होते. उग्र तपस्येमुळे 'शापदग्ध' करण्याच्या मंत्रशक्तीचे मनोबल आमचे होते तर त्याच धारावरील अस्त्रविद्येने आम्ही युद्धात अजिंक्य असे होतो. 'शापादपि शरादपीचे' सामर्थ्य असलेल्या असंख्य अशा नरसिंहाचा हा भारत होता. त्याचमुळे 'कृण्वन्तो विश्वमार्यम्?' ही त्याची गर्वोन्नत मानेनी, आत्मविश्वास संपन्नतेची घोषणा होती. आव्हान होते.

...आज ते 'आव्हान' आम्ही देऊ शकू का? ▮

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# पोलिस दादा असे काय करता?

समाजात शांतता आणि सौहार्द राखणे, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना नियंत्रित करणे, वेळप्रसंगी त्यांना अटकही करण्याचे कर्तव्य पोलिसांना पार पाडावे लागते. 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' म्हणजे चांगल्यांचे रक्षण करणे आणि वाईटांचा नाश करणे हे ब्रीद घेऊन पोलिस तुमच्या आमच्या सेवेत '२४ बाय ७' असतात. त्यांना उन्हाळा, पावसाळा, हिवाळ्याची चिंता नसते. फक्त कायदा व सुव्यवस्था कायम राखणे हीच त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका. महाराष्ट्र पोलिस भारतातील सर्वात मोठ्या पोलिस दलांपैकी एक आहे. महाराष्ट्र पोलिस दल २ जानेवारी १९६१ रोजी स्थापन झाले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी महाराष्ट्र पोलिस दलाला ध्वज प्रदान केला; तोच पोलिस दलाचा स्थापना दिन समजला जातो. महाराष्ट्र पोलिस दलात १२ पोलिस आयुक्तालये व ३४ पोलिस अधीक्षक कार्यालयं आहेत. गंभीर परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि अतिरेकी कारवायांना तोंड देण्यासाठी राज्य राखीव पोलिस दल, गुन्ह्यांच्या तपासासाठी गुन्हे शाखा, वाहतूक व्यवस्थापन आणि रस्ते सुरक्षेसाठी वाहतूक शाखा, सायबर गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी सायबर गुन्हे शाखा, दहशतवादी कारवायांना आळा घालण्यासाठी दहशतवादविरोधी पथक तयार करण्यात आले आहे. सामान्य नागरिकांना थेट संपर्क करता यावा यासाठी पोलिस नियंत्रण कक्ष १००, महिला हेल्पलाईन १०३, ज्येष्ठ नागरिक हेल्पलाईन १०९०, सायबर हेल्पलाईन १९३० या क्रमांकावर डायल केल्यास पोलिस अवघ्या काही मिनिटांत म्हणजे शक्य होईल तेवढ्या कमी वेळात घटनास्थळी पोहोचतात, असा दावा केला जातो. पोलिस कर्मचाऱ्यांची नोकरी फारच जिकरीची आहे. दोन दिवसांपूर्वी नागपुरात झालेल्या दंग्यात पोलिसांवर दगडफेक झाली तर वरिष्ठ पोलिस अधिकारी कुऱ्हाडीचा घाव झेलत जखमी झाले. कमी वेतन असलेले पोलिस असे काहीसे चित्र आता पूर्णपणे बदलले आहे. पूर्वी पोलिसांना पगारच काय मिळतो म्हणून ते चिरीमिरीच्या मागे लागतात, असे बोलले जात होते. आता मात्र त्यांची ती परिस्थिती राहिलेली नाही. (कोणत्याही पदावर, कोणत्याही शासकीय विभागात आणि वेतन कितीही रग्गड असले ते खिसा गरम करीत नाही, असे नाही. त्यामुळे त्यातून पोलिस तरी कसे सुटावे). पण, पोलिस प्रशासन हे सामान्य नागरिकांसोबत थेट संपर्कात येते. त्यामुळे त्यांनी दुःखी-कष्टी सामान्य नागरिकांच्या भावना समजून घेतल्या पाहिजे. झाले असे की, वर्धा जिल्ह्यातील वडनेर येथील मूळ रहिवासी असलेल्या दर्शन मुंगळे या २५ वर्षांच्या तरुणाचा जालना जिल्ह्यातील देऊळगाव राजानजिक रस्त्यावर अपघात झाला. पोलिसांच्या नजरेत तो अपघात तर त्या मुलाच्या पालकाच्या भावनांतून तो घातपात! दोघांचेही आपआपल्या ठिकाणी सत्य असल्याचे आपण एकदा समजून घेऊ. पण, ज्यांच्याकडे समाजाचे रक्षण करण्याची जबाबदारी दिली त्यांनी आपल्या पदाला न्याय देत आलेल्यांचे समाधान केलेच पाहिजे ना! त्याच कर्तव्याचे वेतन शासन आपल्या बँक खात्यात जमा करते, हे विसरता कामा नये! पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. त्यावेळी त्या युवकाचे वडील घटनास्थळावर नव्हते. तरीही पंचनाम्यामध्ये चक्क घटनास्थळ मृतकाच्या वडिलांनी दाखवल्याचे लिहून मोकळे झाले. मृतकाचे शवविच्छेदन अहवाल पोलिसांनी आणणे अपेक्षित असताना जालना पोलिसांनी मृतकाच्या वडिलांना अहवाल आणण्याचा सल्ला दिला. आता सांगा, तो अहवाल वर्धेतून जालन्यात गेलेल्या मृतकाच्या पालकांना कसा दिला जाईल! विशेष म्हणजे ज्या मुलाला अपघात झाला त्या मुलाच्या मोबाईलचा सायबर विभागाकडून सीडीआर दिलाच गेला नाही. तरुण मुलगा गेल्यानंतर त्या बापाच्या वेदना समजू नये? आमचा अजूनही खाकीवर विश्वास आहे. तरीही पोलिस दादा तुम्ही असे का वागू शकता. हो, आहे तुमच्यावर कामांचा ताण. तुम्हाला अधिकार आहेत म्हणून काय, तुम्ही आलेल्यांना हेलपाटेच मारायला लावणार? काल-परवा वर्धा पोलिसातील एका सहायक पोलिस निरीक्षकाने वन विभागाच्या अधिकाऱ्याला पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला. हा मुद्दा आर्वीचे आ. सुमित वानखेडे यांनी अधिवेशनात उपस्थित केला. पोलिसावर निलंबनाची कारवाई झाली. म्हणून गावागावांत आ. वानखेडे थोडीच उभे होणार आहेत. याचा अर्थ पोलिस खातेच वाईट आहे असेही नाही. काही पोलिस कर्मचारी, अधिकारी अपवादही आहेत. पण, आपल्याकडे चांगल्यापेक्षा वांगल्याचीच चर्चा जास्त होते. विविध पुस्तके, चित्रपट, टीव्ही मालिकांमधून देशातील पोलिस दलाचे बरेवाईट चित्रणही झाले. फ. मुं. शिंदे यांची 'पोलिस नावाचा माणूस' ही बोलकी कविता आहे. त्यात पोलिसांची व्यथा त्यांनी मांडली असली, तरी सामान्यांच्या व्यथा पोलिस दादांनी समजून घेतल्या पाहिजे तेव्हाच खाकीवरचा विश्वास अजून दृढ होईल पोलिस दादा! ▮

९८८१९०३७६५


## दखल

# धर्मयोद्धा देवेंद्र फडणवीस

**मोरेश्वर बडगे**

बऱ्याच वर्षांनंतर नागपूरने भयंकर दंगल अनुभवली. नागपूर शहर तसे पाहिले तर दंगलीचे गाव नाही. इथे साऱ्या जाती-धर्मांचे लोक सलोख्याने राहत आले आहेत. नितीन गडकरी आणि देवेंद्र फडणवीस या दोन नेत्यांच्या गावात दंगल होते, जाळपोळ होते, लोकांपेक्षा पोलिस जास्त जखमी होतात हा प्रकार चिंतेचा विषय नक्कीच होतो. प्रभू श्रीरामाच्या शोभायात्रेवर फुले उधळणारा समाज अचानक असा का बिथरला? या दंगलीमागे सुनियोजित कट आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. दंगेखोरांचे चेहरे चौकशीत फाटतील, पण गृहमंत्री या नात्याने फडणवीसांनी दंगल पसरू दिली नाही हे महत्त्वाचे. दुसरा एखादा असता तर बावचळून नको ते आदेश दिले असते. परिस्थिती चिघळली असती. गोळीबारात मेलेल्यांना दंगलखोरांनी 'हुतात्मा' म्हणून मिरवले असते. देशभर दंगे भडकले असते. फडणवीसांनी त्यांना ती संधी दिली नाही. पोलिसांनी दगड अंगावर झेलले. ३३ पोलिस रक्तबंबाळ झाले. पण एकही गोळी सुटली नाही. एका पोलिस उपायुक्तांच्या पायावर कुऱ्हाड चालली. त्याच्या कंबरेला पिस्तूल होती. तो पिस्तूल झाडू शकला असता. फडणवीसांची रणनीती हिट झाली. एकाच दंग्यात लाखो पोलिसांचे 'हिंदुत्व सेने'त रूपांतर झाले. फडणवीस एका अर्थाने 'धर्मयोद्धा' ठरले आहेत.

फडणवीस यांच्याकडे साईबाबाने सांगितलेले श्रद्धा आणि सबुरी हे दोन्ही गुण आहेत. औरंगजेबाच्या कबरीच्या बंदोबस्ताला ते आपले पोलिस देतात तेवढ्याच खंबीरपणे कबरीचे महिमामंडन होऊ देणार नाही हेही सांगतात. गुणांचा हा संगम बाळगणारे असे नेते अलिकडे दुर्मिळ झाले आहेत. म्हणूनच फडणवीसांचे वेगळेपण ठळकपणे नजरेत भरते. हिंदू धर्म संकटात आहे असे ज्यांना ज्यांना वाटते त्या त्या सर्वांनी फडणवीस यांचे अभिनंदन केले पाहिजे. सध्या सणासुदीचे दिवस आहेत. गुढीपाडव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपुरात येत आहेत. दंगलीचे वातावरण टिकले असते तर मोदींचा दौरा रद्द होण्याची शक्यता होती. फडणवीसांच्या प्रयत्नाने मोठी विदेशी गुंतवणूक राज्यात येऊ घातली आहे. तिला ब्रेक लागायचीही भीती होती. दंग्याच्या गावात कुठला उद्योगपती कशाला पैसे लावणार? तरीपण नागपुरात दंगल होते हा विषय सर्वांनाच चिंतन करायला भाग पाडणारा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा जन्म जिथे झाला त्या नागपुरातच हिंदू मार खात असतील तर जगातल्या हिंदूंनी कोणाकडे आशेने पाहायचे, असा प्रश्न सर्वसाधारण हिंदूंना पडणे स्वाभाविक आहे. पण म्हणून डोक्यात राख घालून चालणार नाही. कायद्यानेच चालावे लागेल. फडणवीस शांत डोक्याने तेच करीत आहेत. काट्याने काटा. सामान्य मुसलमान शांतताप्रिय आहे. या दंगलीमागे धर्मांध माणसं आहेत. त्यांना कसे हाताळायचे ते फडणवीस यांना छान ठाऊक आहे. नरेंद्र मोदींचा 'गुजरात पॅटर्न' फडणवीस चालवतील. सध्या रात्री वैऱ्याच्या आहेत. समाज ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. साध्या साध्या गोष्टीही हवा पेटवू शकतात. त्यासाठी बुलडोझर घेऊन फिरण्याची गरज नाही. कडक प्रशासन दिले तर दंगेखोरांची हिंमत होणार नाही. फडणवीस यांचा हाच फॉर्म्युला आहे. खऱ्या अर्थाने फडणवीस हे धर्मयोद्धा आहेत.



तरीही नागपुरातच दंगल का व्हावी हा प्रश्न छळतो. औरंगजेबाची कबर तिकडे मराठवाड्यात आहे. तिकडे काही होत नाही आणि इकडेच मूठभर मुसलमान दंगा करतात, याचे कोडे अनेकांना सुटत नाही. सोपे आहे. नागपुरात संघाचे मुख्यालय आहे. दुसरे म्हणजे सध्या राज्यातल्या हिंदूंचा चेहरा देवेंद्र फडणवीस नागपूरचा आहे. त्यामुळे त्यांचे टार्गेट नागपूर झाले. विरोधकांच्या निशाण्यावरही फडणवीसच आहेत. गेल्या पाच वर्षांत फडणवीसांनी विरोधी पक्षांना अस्वस्थ करून सोडले आहे. त्यांनी उद्धव ठाकरेंची शिवसेना फोडली. शरद पवार राष्ट्रवादी पक्ष फोडला. छळकपटाने आलेले उद्धव ठाकरेंचे महाविकास आघाडीचे सरकार पाडले. फोडाफोडी करून आलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार भाजपाच्या सरकारसोबत आहेत तर उद्धव ठाकरे आणि शरद पवार रस्त्यावर आहेत. जळफळाट आहे तो हा. कसेही करून देवेंद्र फडणवीस यांना बदनाम करायची संधी विरोधी पक्ष शोधत आहेत. त्यांच्या हाती काही लागत नव्हते. औरंग्या नावाचा फटाका त्यांनी फोडून पाहिला. पण तो चक्क लवंगी फटका निघाला. विरोधकांची फजिती सुरू आहे. फडणवीसांना कसे रोखावे हेच त्यांना कळेनासे झाले आहे. नाना पटोले यांच्या जागी राहुलबाबाने पाठवलेले हर्षवर्धन सपकाळ तर नमुना निघाले. सपकाळांनी फडणवीस यांची तुलना औरंगजेबाशी केली. मुख्यमंत्री फडणवीस हे औरंगजेबापेक्षाही क्रूर प्रशासक आहेत, असे बोलून सपकाळांनी काँग्रेसचीच गोची केली. पुढे त्यांनी सारवासारव केली तो भाग वेगळा. नाना पटोले काँग्रेस बुडवायला निघाले म्हणून त्यांना बदलायचे ठरले. पण आणायचे कोणाला? काँग्रेसकडे लायक माणसं कुठे आहेत? जी येतात तो मोठी व्हायला येतात. काँग्रेस मात्र बुटकी होत जाते. शेवटी राहुलबाबाने चिठ्ठी काढली असणार. पहिल्या चिठ्ठीत हे सपकाळ काँग्रेसच्या पदरी आले. आतापर्यंत काँग्रेस हा मुस्लिमांचा पक्ष अशी प्रतिमा होती. सपकाळांनी काँग्रेसला हिंदुविरोधी पक्ष बनवून टाकले. म्हणजे घाट्यात घाटा. एक लक्षात घ्या. सामान्य मतदार आता हुशार झाला आहे. हिंदुविरोधी भूमिका घेऊन यापुढे कोणी सत्तेत येऊ शकत नाही. औरंगजेबाच्या कबरीच्या काय व्हायचे ते होईल. मात्र इकडे काँग्रेसचे नेतेच काँग्रेसची कबर खोदायला निघाले आहेत. तुम्ही लिहून घ्या. पुढची निवडणूक काँग्रेस पाहत नाही. पाच वर्षांपूर्वी काँग्रेसचे ४४ आमदार निवडून आले होते. यावर्षी काँग्रेस पाचव्या नंबरला आहे. फक्त १६ आमदार. शिवसेना फुटली तरीही उद्धव ठाकरेंनी २० आमदार आणून चौथा नंबर पटकावला. मात्र, काँग्रेससारख्या राष्ट्रीय पक्षाच्या तब्बल २८ जागा कमी होतात, या तब्येतीला काय म्हणायचे?

आता तर कहर झाला. विधान परिषदेची निवडणूकही काँग्रेस लढवू शकत नाही. केविलवाणी स्थिती आहे. काँग्रेस काय, उबाठा आणि शरद पवारांची राष्ट्रवादीही लढवू शकत नाही. कारण महाआघाडी म्हणूनही पुरेसे संख्याबळ नाही. विधान परिषदेच्या पाच आमदारांची विधानसभेवर निवड झाल्याने रिकाम्या झालेल्या या जागांसाठी पोटनिवडणूक लागली आहे. महायुतीचे २३७ आमदार आहेत. एवढे प्रचंड बहुमत असल्याने पाचही जागी महायुतीचे आमदार अविरोध निवडून येतील. तीन जागी भाजपा आणि एकेक जागेवर शिंदे सेना आणि अजितदादांचा माणूस निवडून येणार आहे. भाजपाच्या उमेदवारांना अवघ्या १४ महिन्यांची आमदारकी मिळणार आहे. या १४ महिन्यांसाठीही भाजपामध्ये उड्या होत्या. नागपुरात प्रवीण दटके यांच्या जागी कोणाला संधी मिळते, याची उत्सुकता होती. यावेळी तिकिटं देताना भाजपाने मूळ कार्यकर्त्यांना संधी दिली हे विशेष. त्यातला एक चक्क ब्राह्मण आहे. सध्याच्या तिकिटाच्या गणितात अशक्यप्राय वाटणारी गोष्ट झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांचे लंगोटीमित्र नागपूरचे माजी महापौर संदीप जोशी यांना लॉटरी लागली. संदीप जोशी यांना या आधीही भाजपाने पदवीधर मतदारसंघातून संधी दिली होती. तेव्हा तर फडणवीस मुख्यमंत्री होते. काँग्रेसचे अभिजित वंजारी यांनी त्यांना तेव्हा मात दिली होती. तो वार फडणवीसांच्या जिव्हारी लागला असावा. सामाजिक तसेच क्रीडा क्षेत्रात जीव झोकून काम करणाऱ्या एका मूळ कार्यकर्त्याच्या पाठीवर भाजपाने हात ठेवला आहे. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### अद्भुत, अचाट, अविश्वसनीय...

आपण काही वेळाकरिता लिफ्टमध्ये अडकतो, तर आपल्या अंगाला घामाच्या धारा लागतात, भीतीने अर्धमेले होतो, तरी बरं लिफ्टच्या बाहेरचे लोकं धीर देत असतात. काही मिनिटात लिफ्टचा लाईट लागतो, जणू जीवनात नवा प्रकाश आला, फॅन सुरू होतो, वाऱ्याची झुळूक अंगात गेलेले प्राण आणते, शेवटी लिफ्ट योग्य मजल्यावर थांबते आणि हुश्श...

आता विचार करा नऊ दिवसांसाठी गेलेल्या सुनीता विलियम्स एक नाही, दोन नाही तब्बल नऊ महिने अंतराळातील स्पेस क्राफ्टमध्ये अडकतात. काय असेल आतली परिस्थिती, गुरुत्वाकर्षण नाही, आपल्यासकट सगळं तरंगतंय. अवकाशात समाधीच घ्यावी लागणार असे वाटते आहे. पण स्वतःचा आत्मविश्वास, मनोबल, शारीरिक बळ कायम ठेवायचं, केवढं अचाट, अद्भुत, अविश्वसनीय. या भयावह, धोकादायक, असह्य, तणावपूर्ण, आधारहीन अवस्थेत सुनीता आणि तिचा सहकर्मी पृथ्वीला ४५७६ प्रदक्षिणा घालतात. हे अंतर मोजले तर एकूण १२ कोटीपेक्षा जास्त मैल प्रवास करतात. यानंतर कितीतरी शास्त्रज्ञ आपले ज्ञान पणाला लावतात, असफल होतात, पण प्रयत्न सोडत नाही. धरतीवर हे तमाम शास्त्रज्ञ आणि अंतराळात सुनीता आणि विल्मर बूच प्रयत्नांची शिकस्त करतात. अखेर त्यांचा पृथ्वीवर वापस येण्याचा, सुटकेचा मार्ग शोधला जातो. पृथ्वीवर परत यायला जवळपास १९५ दशलक्ष किलोमीटर प्रवास करायचा असतो. (आधीचे पृथ्वी प्रदक्षिणेचे १२ कोटींपेक्षा जास्त आणि हे १९५ दशलक्ष किलोमीटर व जातानाचे १९५ दशलक्ष किलोमीटर, गणित कर्णमाने ज.ज.) ६२ तास ६ मिनिटे विक्रमी स्काय वॉक करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. केवळ अद्भुत, अचाट, अविश्वसनीय...

**रवी वाघमारे**/नागपूर

●● ●●

### औरंग्याची कबर उखडून फेका

क्रूरकर्मा, मोगल शासक औरंगजेबाची कबर महाराष्ट्रात आहे, ही आपल्याकरिता दुर्दैवी बाब आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे अनन्वित हाल करून मारणारा, क्रूरकर्मा, दुष्ट राक्षस औरंग्याचे थडगे संभाजीनगरमधून उखडून फेकणे हे अतिशय आवश्यक झाले आहे. संभाजीनगर शहरात औरंग्याची कबर छत्रपती संभाजी महाराजांच्या अपमानाच्या वेदनेची सल बोचणारी आहे. छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहासातील पराक्रम व बलिदान हे देव, देश आणि धर्मासाठी अर्पण केलेले ओजस्वी पुष्प आहे. औरंग्या, अफजल्यासारख्या राक्षसावर प्रेम करणारे, अभिमान बाळगणारे जहरी हिरव्या सापांची पिलावळ या कबरीमधून बाहेर येत आहे. देशविघातक जंत रोज निर्माण होत आहे. त्यातूनच जेहादी समस्या आपल्या देशापुढे तोंड फाडून उभ्या आहेत. अशा जेहादी जंतांना ठेचण्याची हीच वेळ आहे. छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात औरंग्याचा उदो उदो कसा होतो. क्रूरकर्म्याचे महिमामंडन कसे केले जाते. थडग्याचे त्या पर्यटन कसे केले जाते. अफजल्याच्या थडग्याभोवती मोठे बांधकाम करण्यात आले होते. काही राजकीय नेत्यांना मतपेटी काळजीपोटी राजकीय पोळी शेकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे आजच्या घडीला ही कबर बुलडोझरने उद्ध्वस्त करणे आवश्यक झाले आहे. औरंग्याच्या औलादींनी हिंदुस्थानातला भारतीय विचार नेस्तनाबूत करण्यासाठी, सनातन प्राचीन मंदिरे उद्ध्वस्त करून मशिदी उभारण्यासाठी, देशातील निरपराध नागरिकांना ठार मारणे ही क्रूर वर्तने कित्येक शतकांपासून सुरू आहे. या जेहादी वृत्तीला गाडण्यासाठी औरंग्याला गाडलेली कबर उखडून फेकण्यासाठी सज्ज झाले पाहिजे. हीच वर्तमानातील छत्रपती शिवरायांना अभिप्रेत असलेली स्वराज्य रक्षणाची वीरवृत्ती आहे. छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराज सकल भारतीय समाजाचे मानबिंदू आहे. पवित्र मानबिंदूचे रक्षण करणे सकल भारतीयांचे आद्यकर्तव्य आहे. नागपुरात जेहादी हिंसाचाराचा सैतानी भेकड आगडोंब हा पद्धत काही नवीन नाही. ही तीच पद्धत मोगलांची होती. जाळपोळ, दगडफेक हिंदूंच्या घरांना आगी लावणे, महिलांवर अत्याचार करणे या जेहादी हिंसाचारात औरंग्याची पिलावळ वळवळत होती. हिंदू समाज निद्रिस्त झाला तर जेहादी मानसिकतेची बांडगुळे सळसळतात. तेव्हा हिंदू समाजाने आपली संघटित शक्ती जागृत केली पाहिजे. संघटित शक्तीने औरंग्याची कबर नेस्तनाबूत करावी लागेल. जेहादी दंगेखोर ज्या ज्या बिळात लपलेले असेल त्यांना शोधून ठेचले पाहिजे.

**अमोल तपासे**/९९६०६७३७८९

●● ●●

### फूटपाथवरील अतिक्रमण

नरेंद्रनगर चौकात महानगर पालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी दुकानांसमोर फूटपाथ बांधले आहेत. लोकांना या मार्गावरून ये-जा करता येते. मात्र सद्यस्थितीत श्रीनगर परिसरात येणाऱ्या रिंगरोडवरील दुकानांसमोर अनेक फुटकळ दुकानदारांनी आपली दुकानदारी उघडली असून नागरिकांना आणि विशेषतः एम्प्रेस मिलच्या फ्लॅटधारकांना अडचण निर्माण होत आहे. महापालिकेने दखल घ्यावी, ही विनंती. ▮

**हरीश चौधरी**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## विश्व

# मुस्लिम निर्वासितांच्या लोंढ्यांमुळे जर्मनी त्रस्त

निसर्गाचा हा नियमच आहे की, आपण जे पेरतो तेच उगवते. 'पेराल तेच उगवेल' अशी आपल्याकडे एक म्हणच प्रचलित आहे. जसे की गहू पेरला तर गहूच उगवणार. गहू पेरले आणि तांदूळ उगवले असे कधी होत नाही, होणारही नाही. 'जैसी करनी वैसी भरनी' हे संत कबीर यांचे वचन तर आपल्याला माहीत आहेच. मग प्रश्न असा शिल्लक राहतो की, आपण नेमके काय पेरतो? अनेकदा आपण काय पेरतोय् आणि त्याचे भविष्यात काय परिणाम होतील याची आपल्याला पुसटशी कल्पना देखील नसते. आपण त्याचा विचार केलेला नसतो. हीच गोष्ट एखाद्या देशाला किंवा त्या देशातील धोरणकर्त्यांना लागू होते. त्यामुळेच 'पेराल तेच उगवेल' ही म्हण सामान्य अर्थाने समजून घेण्याचा प्रयत्न केल्यास आपल्या कर्मानुसार फळ मिळते, असे लक्षात येईल. अलीकडच्या काळात युरोपमध्ये निर्वासितांची, विशेषत: मुसलमान निर्वासितांची संख्या झपाट्याने वाढली आहे. याचा परिणाम असा झाला की, गुन्ह्यांमध्येही झपाट्याने वाढ झाली आहे. युरोपियन देश जर्मनीने मुस्लिम निर्वासितांना आपल्या देशात प्रवेश करण्यास परवानगी दिली. पण आता हा देश निर्वासितांच्या समस्येशी झगडत आहे. आपल्या तथाकथित उदारमतवादी धोरणांमुळे, जर्मनीने जगभरातील लक्षावधी मुस्लिम निर्वासितांना आपल्या देशात आश्रय दिला. यामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या सीरियन निर्वासितांची आहे. २०१५ मध्ये, जर्मनीच्या माजी चान्सलर अँजेला मर्केल यांनी सीरिया, अफगाणिस्तान आणि इराकसह अनेक देशांसाठी आपल्या देशाचे दरवाजे उघडले होते. याचा परिणाम असा झाला की तेथील लोकसंख्येचे असंतुलन लक्षणीय रीत्या वाढले आहे.

जर्मनीत जिथे जिथे मुस्लिमांची लोकसंख्या वाढली तिथे तिथे गुन्हेगारीही वाढली, असे एका व्यापक सर्वेक्षणात आढळून आले आहे. आज तर परिस्थिती अशी आहे की जर्मनीत अशी अनेक क्षेत्रे आहेत जिथे जर्मन नागरिक तर सोडाच पण पोलिसांही तेथे जाण्याची परवानगी नाही. गेल्या वर्षी डिसेंबर २०२४ ची गोष्ट आहे. सीरियातील बशर अल-असद सरकार कोसळल्यानंतर जर्मनीत ८ डिसेंबर रोजी अनेक शहरात सीरियन निर्वासित बाहेर आले



आणि त्यांनी प्रचंड जल्लोष साजरा केला. पण, एक प्रश्न पुन्हा उपस्थित झाला की हे सर्व शरणार्थी जर्मनीतच का ठाण मांडून बसले आहेत? सीरियातील जुलमी असद सरकार पडले असेल तर या निर्वासितांनी परत आपल्या मायभूमीत जावे. पण, नेमके उलटे घडत आहे. आता हे मुसलमान निर्वासित जर्मनीसाठी सर्वात मोठी डोकेदुखी ठरले आहेत.

### कशी बदलते आहे डेमोग्राफी?

गेल्या काही वर्षांत जर्मनीतील मुसलमानांची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. यासाठी कोणाला जबाबदार धरायचे असेल तर ते माजी चॅन्सलर अँजेला मर्केल यांनाच धरावे लागेल. पण याला त्याच पूर्णपणे जबाबदार आहेत असे म्हणता येणार नाही. कारण जर्मनीतील मुस्लिम समाजाचा पाया १९६० च्या दशकात तुर्की येथून आलेल्या कामगारांनी घातला होता. पण, २०१५ च्या निर्वासितांच्या संकटाने त्याला वेग दिला. जर्मन सरकारच्या आकडेवारीनुसार, २००९ पर्यंत जर्मनीमध्ये मुस्लिम लोकसंख्या जवळपास ३० लाख होती, जी एकूण लोकसंख्येच्या ४ टक्के होती.

> आज परिस्थिती अशी आहे की जर्मनीत अशी अनेक क्षेत्रे आहेत जिथे जर्मन नागरिक तर सोडाच पण पोलिसांनाही तेथे जाण्याची परवानगी नाही.

> बीबीसीच्या मते, २०२१ ते २०२३ दरम्यान १४३,००० सीरियन लोकांना जर्मन नागरिकत्व प्राप्त झाले, जे इतर कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे. परंतु अद्यापही ७ लाखांहून अधिक सीरियन नागरिक निर्वासित आहेत.

**गुन्हेगारीत प्रचंड प्रमाणात वाढ**

२०१५ नंतर, ही संख्या ५० लाखांहून अधिक झाली, जी आता एकूण लोकसंख्येच्या ६-७ टक्के आहे. यातील बहुतांश मुस्लिम निर्वासित सीरिया (७ लाखांहून अधिक), अफगाणिस्तान आणि आफ्रिकन देशांतून आले आहेत. हा बदल विशेषत: बर्लिन, हॅम्बर्ग, कोलोन आणि म्युनिक या शहरी भागात स्पष्टपणे दिसून येतो. उदाहरणार्थ, बर्लिनमधील काही शाळांमध्ये मुसलमान विद्यार्थ्यांची संख्या ८० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. हा लोकसंख्याशास्त्रीय बदल (डेमोग्राफी) जर्मन समाजाच्या सांस्कृतिक आणि धार्मिक संरचनेवर परिणाम करीत आहे.

मुस्लिम निर्वासितांनी आश्रय घेतल्यानंतर युरोपीय देशांच्या लोकसंख्येचा समतोल ज्या प्रकारे बदलला ते पाहता ही केवळ जर्मनीसाठीच नव्हे तर त्या देशांसाठी देखील धोक्याची घंटा आहे जे आताही जर सावध झाले नाहीत तर खूप उशीर झालेला असेल. या लोकसंख्येच्या असंतुलनामुळे जर्मनी तसेच युरोपातील विविध देशातील अनेक भाग वाईट रीत्या प्रभावित झाले आहेत.

### जर्मनीतील अनेक शहरांना फटका

जर आपण जर्मनीतील शहरांनुसार लोकसंख्येचा असमतोल पाहिल्यास असे स्पष्टपणे लक्षात येईल की तेथील लोकसंख्येचे असंतुलन सारखे नाही. म्हणजे केवळ एका क्षेत्राला याचा फटका बसलेला नाही, तर वेगवेगळ्या शहरांमध्ये ते पसरले आहे. उदाहरणादाखल पाहिले असता बर्लिनच्या न्युकोलन आणि क्रॉएत्जबर्ग सारख्या भागात मुस्लिम लोकसंख्येची घनता वाढली आहे, त्यासोबतच सामाजिक तणावही वाढला आहे. हॅम्बर्ग, जिथे २०२४ ची वादग्रस्त रॅली झाली, हे आणखी एक उदाहरण आहे. बव्हेरिया राज्य, विशेषत: म्युनिक देखील निर्वासितांच्या आगमनामुळे प्रभावित झाले आहे, जेथे स्थानिक लोक आणि मुस्लिम निर्वासित समुदायांमध्ये सांस्कृतिक मतभेद उफाळून आले आहेत. याव्यतिरिक्त, नॉर्थ राईन-वेस्टफेलिया सारख्या औद्योगिक क्षेत्रात निर्वासितांच्या मोठ्या संख्येने रोजगार आणि घरांसाठी स्पर्धा वाढवली आहे, ज्यामुळे तणाव आणि हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत.

### डेमोग्राफी बदलल्याने वाढला हिंसाचार

जर्मनीतील मुस्लिमांची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने तेथील डेमोग्राफी (लोकसंख्येची रचना) बदलत आहे. या बदलाचा परिणाम असा होतो की, एकेकाळी शांततापूर्ण आणि मुक्त वातावरणात राहणारा जर्मनीतील नागरिक आज भयग्रस्त आहे. कोणीतरी कृष्णवर्णीय माणूस आपल्यावर हल्ला करू शकतो या भीतीने सामान्य जर्मन नागरिक आपल्याच देशात भीतीच्या छायेखाली राहतो. ही भीती या मुस्लिम निर्वासितांच्या हिंसाचारातून निर्माण झाली आहे.

उदाहरणार्थ, २०१६ ची कोलन गँगरेपची घटना घ्या. या घटनेने संपूर्ण जर्मनीला हादरवून सोडले होते. त्या काळात, उत्तर आफ्रिकन वंशाच्या निर्वासितांच्या या क्रौर्याचा जगभरात निषेध झाला होता. त्याचप्रमाणे याच वर्षी वुर्जबर्ग ट्रेन हल्ला आणि बर्लिन ख्रिसमस मार्केट हल्ला यांसारख्या दहशतवादी कारवायाही याच मुस्लिम निर्वासितांनी घडवून आणल्या होत्या. आता गत २०२४ साली घडलेल्या एका घटनेबद्दल बोलूया. हॅम्बुर्ग येथे मुस्लिम इंटरॲक्टिव्ह नावाच्या गटाने आयोजित केलेल्या एका रॅलीमध्ये शरिया कायद्याची मागणी करण्यात आली तसेच हिंसक घोषणा देण्यात आल्या, ज्यामुळे जर्मन समाजात चिंता वाढली आहे. एका अहवालानुसार, २०२१-२०२३ दरम्यान सीरियन निर्वासितांशी संबंधित गन्ह्यांमध्ये २० टक्के वाढ झाली आहे. या हिंसाचारामुळे जर्मन नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत आहे, त्यामुळे अल्टरनेटिव्ह फॉर जर्मनी (एएफडी) सारख्या उजव्या विचारसरणीच्या गटांना पाठिंबा मिळत आहे.

(ऑर्गनायझरवरून साभार)

## संस्कृती



# १३०० वर्षे जुने कैलाशनाथर मंदिर

भारतातील प्रत्येक राज्यात अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. ज्यात त्या त्या राज्याच्या संस्कृतीचे प्रतिबिंब उमटते आणि प्रत्येक मंदिराचेही एक आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. त्याचप्रमाणे दक्षिण भारतातील बहुतांश मंदिरे त्यांच्या खास वास्तुकलेमुळे देशातच नव्हे, तर संपूर्ण जगात प्रसिद्ध आहेत. दक्षिण भारतातील कांचीपुरम, तामिळनाडू येथील कैलाशनाथर मंदिर हे अशा वास्तुकलेचे उत्तम उदाहरण आहे.

कांचीपुरम हे हिंदू धर्माच्या लोकांसाठी पवित्र स्थानांपैकी एक मानले जाते. या शहराला मंदिरांचे शहर असेही म्हणतात. कैलाशनाथर मंदिर भगवान शिवाला समर्पित आहे. हे मंदिर भगवान शिव, भगवान विष्णू, देवी, सूर्य, गणेश आणि कार्तिकेय यांच्या पूजेसाठी बांधले गेले आहे. कांचीपुरमच्या या मंदिरांमध्ये कैलाशनाथ मंदिर आहे ज्याला 'कांचीपुरमचे रत्न' म्हटले जाते. हे मंदिर सुमारे १,३०० वर्षे जुने असून येथे येणारे लोक या मंदिराच्या रचनेने मंत्रमुग्ध होतात.

कैलाशनाथ मंदिराची रचना वास्तुकलेचा उत्तम नमुना आहे. मंदिराच्या या वैशिष्ट्यामुळे ते इतर मंदिरांपेक्षा वेगळे ठरते. दगडांचे तुकडे एकत्र करून हे मंदिर बांधण्यात आल्याचे पुरातत्त्वशास्त्रज्ञांचे मत आहे. या मंदिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे मुख्य मंदिर परिसरात ५८ छोटी मंदिरे बांधण्यात आली आहेत. एवढेच नव्हे तर मंदिराच्या प्रवेशद्वारावर, भिंतीवर आठ तीर्थक्षेत्रे आहेत, ज्यामध्ये दोन प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला आहेत तर सहा उजव्या बाजूला आहेत. या मंदिराच्या गर्भगृहावर द्रविड स्थापत्यशास्त्रात विमान बांधण्यात आले आहे. गर्भगृहात ग्रॅनाईटचे अप्रतिम आणि विशाल शिवलिंग स्थापित केले आहे. गर्भगृहाच्या सभोवतालच्या भिंतींवर भगवान शंकराची लिंगोद्भव, उर्ध्व तांडव मूर्ती, त्रिपुरांतक आणि हरिहर अशी रूपे कोरलेली आहेत.

कांचीपुरमचे कैलाशनाथ मंदिर हे भगवान शिवाला समर्पित आहे, त्यामुळे दर सोमवारी येथे शिवाचे दर्शन घेण्यासाठी भाविक येतात. यासोबतच श्रावण आणि महाशिवरात्री महिन्यात हिंदूंची मोठी गर्दी उसळते. याशिवाय इतर अनेक उत्सवांच्या वेळी येथे भाविकांची जत्रा भरते. परंतु आध्यात्मिक दृष्टी व्यतिरिक्त कला आणि पुरातत्त्व शास्त्राची आवड असणारे लोकही या मंदिरात येतात.

# यमुना नदी

भगवान श्रीकृष्ण आणि यमुना नदी यांचे अतूट नाते आहे, हे आपण भारतीय जाणतोच. यमुना ही भारताच्या उत्तर प्रदेश राज्यातून वाहणारी गंगेची प्रमुख उपनदी असून याची लांबी सु. १,३७६ किमी. जलवाहन क्षेत्र ३,०५,६१८ चौ. किमी आहे. उत्तर प्रदेश राज्याच्या उत्तर काशी जिल्ह्यात हिमालयाच्या पश्चिम कुमाऊँ विभागात, सस.पासून १,३०७ मी. उंचीवरील जम्नोत्री या पवित्र क्षेत्राच्या उत्तरेस आठ किमी. वरील जम्नोत्री



हिमनदीतून यमुना नदीचा प्रवाह सुरू होतो. तथापि जम्नोत्री हेच यमुना नदीचे उगमस्थान समजले जात असून ते ठिकाण बंदरपूंछ पर्वतशिखराच्या (६,३१५ मी.) पश्चिमेस १० किमी. वर आहे. गंगोत्री हे गंगा नदीचे उगमस्थान जम्नोत्रीच्या पूर्वेस थोड्याच अंतरावर असून बंदरपूंछ पर्वत हा गंगा-यमुना नद्यांचा प्रमुख जलविभाजक आहे. जम्नोत्रीच्या मार्गावर व जम्नोत्री येथे उष्ण पाण्याचे झरे असून त्यांपैकी जम्नोत्री मंदिराजवळच्या एका मोठ्या झऱ्यातील पाण्यावर यात्रेकरू भात, बटाटे, डाळी इ. शिजवू शकतात. अतिप्राचीन काळी यमुना नदी पश्चिमेस सिंधू खाऱ्याकडे वाहत जाई परंतु भूहालचालींमुळे तिचे पात्र बदलून ती गंगेची उपनदी बनली. यमुना नदीला जमुना, चिनी भाषेत ये-न-मौ-ना, तर टॉलेमी, प्लिनी, एरियन यांच्या साहित्यांत अनुक्रमे दिआमौना, जॉमनीझ आणि जोबारेस असेही संबोधले जाते.

कालिंदी या नावानेही ओळखल्या जाणाऱ्या यमुनेचे भारताच्या राजकीय आणि सांस्कृतिक इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. गंगेच्या बरोबरीने तिचे नाव घेतले जाते. महाभारतकाळापासून हिच्या खोऱ्यात अनेक साम्राज्ये उदयास आली व नष्ट झाली. त्यांच्यामुळे या खाऱ्यातील दिल्ली (इंद्रप्रस्थ), मथुरा, कौशाम्बी (कोसाभ), आग्रा इ. शहरांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. जम्नोत्री, मथुरा, वृंदावन, गोकुळ, प्रयाग इ. हिंदूंची प्रवित्र तीर्थक्षेत्रे यमुनेकाठीच आहेत. बौद्ध ग्रंथांतही यमुनेला पाच पवित्र नद्यांपैकी एक मानले आहे. सांस्कृतिक उत्कर्षाबरोबरच मोक्याच्या स्थानामुळे यमुनेचे खोरे अनेक रणक्षेत्रांसाठीही प्रसिद्ध झाले. कुरुक्षेत्र, ठाणेश्वर, पानिपत, दिल्ली इ. महत्त्वाची लढाईची मैदाने याच खोऱ्यात आहेत.

यमुना नदीचे अनेक शीर्षप्रवाह असले, तरी जम्नोत्री हिमनदीतून निघणारा प्रवाह हा सर्वांत महत्त्वाचा व वेगवान आहे. या प्रवाहाच्या वायव्येस ३ किमी. वरून निघणारा ऋषिगंगा प्रवाह जम्नोत्री प्रवाहाला उजवीकडून वनास येथे मिळतो. बंदरपूंछच्या दक्षिणेस जाखल व छैअन बामक या हिमनद्यांमधून निघणारे अंता व हनुमानगंगा हे दोन शीर्षप्रवाह खरसाळीच्या खालच्या बाजूस डावीकडून जम्नोत्रीला मिळतात. नैर्ऋत्येस लेसर हिमालय रांगांमधूनही अनेक प्रवाह यमुनेला येऊन मिळतात. तोन्स ही यमुनेची हिमालयातील सर्वांत मोठी उपनदी बंदरपूंछच्या ईशान्य उतारावर उगम पावून वायव्येकडून यमुनेला समांतर दिशेत वाहत येऊन कळशी येथे तिला मिळते. तोन्स नदी यमुनेच्या दुप्पट पाणी वाहून आणते. गिरी ही हिमाचल प्रदेशाच्या आग्नेय भागाचे जलवाहन करणारी दुसरी महत्त्वाची उपनदी तोन्सच्या वायव्येकडून वाहत येऊन उजव्या तीरावर यमुनेला मिळते. यमुना नदी हिमालय पर्वतश्रेण्या व शिवालिक टेकड्यांमधून उत्तर भारतीय मैदानी प्रदेशाकडे वाहत येताना खोल दऱ्यांमधून प्रथम नैर्ऋत्येस व नंतर उत्तर प्रदेश-हिमाचल प्रदेश आणि उत्तर प्रदेश-हरयाणा राज्यांच्या सरहद्दींवरून दक्षिणेस वाहत जाते.

हिमालयातील १५२ किमी. लांबीच्या प्रवाहानंतर कालेसार येथे यमुना मैदानी प्रदेशात प्रवेश करते. येथे तिने १६० किमी. रुंदीचे पंखाकृती किंवा शंक्वाकृती मैदान तयार केले आहे. याच भागात बांधलेल्या बंधाऱ्यामुळे तिच्या पाण्याची पातळी वाढली आहे. पुढे फैजाबादजवळील ताजेवाला (सहारनपूर जिल्हा) येथून पूर्व यमुना (लांबी २०६ किमी.) व पश्चिम यमुना (६४६ किमी.) असे दोन कालवे काढण्यात आले आहेत. त्यांपासून स्थूलमानाने अनुक्रमे २,००,००० हेक्टर व ५,३२,६०० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले आहे. पश्चिम यमुना कालव्याचे काम १३५६ मध्ये दुसरा फिरोझशाह तुघलक याच्या कारकीर्दीत सुरू झाले होते. त्यानंतर आजपर्यंत अनेकदा या कालव्याची दुरुस्ती वा पुनर्बांधणी करण्यात आली. पूर्व यमुना कालव्याचे काम मुहंमदशाह (१७१८-१७४८) याच्या कारकीर्दीत सुरू झाले होते. परंतु ब्रिटिशांनी ते काम पूर्ण केले (१८३०-१८५४). भारताच्या पंचवार्षिक योजनांतर्गतही या दोन्ही कालव्यांमध्ये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

## अर्थचित्र


# श्रीराम मंदिरामुळे अयोध्येची भरभराट

**रोजगाराच्या संधीतही भरीव वाढ**

कुलदीपसिंह

अयोध्येतील श्रीराम मंदिराचे भूमिपूजन ५ ऑगस्ट २०२० रोजी झाले. तेव्हापासूनच अयोध्येला दर्शनासाठी येणाऱ्या रामभक्तांची संख्या सातत्याने वाढत आहे. गेल्या एका वर्षात चार कोटी भक्तांनी श्री क्षेत्र अयोध्येला भेट देऊन श्रीरामललाचे दर्शन घेतले. राम मंदिर ट्रस्टने ५ फेब्रुवारी २०२० ते ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सरकारच्या तिजोरीत सुमारे ४०० कोटी कर भरला. विशेष म्हणजे यातील २७० कोटी केवळ जीएसटीचे होते, अशी माहिती अयोध्या श्रीराम जन्मभूमी ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी पांचजन्य तर्फे महाकुंभ-२०२५ निमित्त आयोजित मंथन कार्यक्रमात दिली. मंदिर बांधल्याने काय लाभ होणार आहे? यातून रोजगार आणि व्यवसायनिर्मिती कशी होणार? असे प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना अयोध्या श्रीराम जन्मभूमी ट्रस्टतर्फे देण्यात आलेली माहिती म्हणजे सणसणीत चपराकच होय.

चंपत राय पुढे म्हणाले, २०२० मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अयोध्येत श्रीराममंदिर बांधकामाचा मार्ग मोकळा झाला तेव्हापासूनच अयोध्येत येणाऱ्या भक्तांच्या संख्येत वाढ होऊ लागली. प्रथम ही संख्या ७,००० पर्यंत वाढली. आता अभ्यागतांची संख्या २५,००० पर्यंत वाढल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, २२ जानेवारी २०२४ रोजी श्रीरामललाच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या दिवशी रामभक्तांच्या संख्येत अभूतपूर्व वाढ झाली. त्या दिवसापासून भक्तांच्या संख्येत



वाढच होत असून आता दररोज सुमारे ७५,००० भक्त अयोध्येत दाखल होत आहेत. शनिवारी आणि मंगळवारी हीच संख्या एक लाखापर्यंत पोहोचते, असेही चंपत राय यांनी सांगितले. गेल्या एका वर्षात जवळपास चार ते साडेचार कोटी नागरिकांनी श्री क्षेत्र अयोध्येला भेट दिली. जर आपण २०११ च्या जनगणनेचा विचार केला तर अयोध्येची लोकसंख्या ६० हजार एवढी आहे. २०११ पर्यंत अयोध्येत नगरपालिका नव्हती. परंतु आज नगरपालिका आहे. अयोध्या हे एक लहानसे 'टेंपल टाऊन' आहे. पण अयोध्या महानगरपालिका बनल्यामुळे सर्वच स्तरावर त्याचे परिणाम झाले. उत्तर प्रदेश सरकारने अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आणि दूरगामी योजना व प्रकल्प राबविले. आज या सरकारच्या कार्यकाळात स्वच्छतेला सर्वाधिक महत्त्व देण्यात येत आहे. एवढेच नव्हे तर स्वच्छतेचा विषय सर्वोच्च स्थानी आहे. आधी कुंभमेळा झाल्यानंतर लोक कचरा, घाण करून तसेच निघून जायचे. पण आता हे चित्र पूर्णपणे बदलले आहे. शासन स्तरावर स्वच्छता व आरोग्य यांना प्राथमिक स्थान देण्यात येत आहे. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे शरयू नदीच्या शेजारी एक छोटा कालवा खोदण्यात आला आहे आणि पंपिंग करून त्यात शरयूचे पाणी टाकण्यात येते. पूर्वी हे असेच पडून राहायचे. मात्र, आता त्यात सुधारणा झाली आहे.

### दररोज साडेचार लाख भक्तांनी गाठली अयोध्या

चंपत राय म्हणाले की, महाकुंभ २०२५ दरम्यान, जर आपण १५ जानेवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीतील आकडेवारीकडे पाहिले तर या दरम्यान दररोज चार ते साडे चार लाख लोक अयोध्येत दर्शनासाठी दाखल झाले. या काळात सुमारे १.५ कोटी लोक अयोध्येत आले. दररोज १० रेल्वेगाड्या कुंभमेळ्याहून अयोध्या येथे येत होत्या. रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, दररोज ४ ते साडेचार हजार लोक ट्रेनने अयोध्येत येत होते.

### गणतंत्रदिनी अलोट गर्दी

महाकुंभ दरम्यान अयोध्येत भक्तांची मोठी गर्दी उसळली. २६ जानेवारी रोजी म्हणजे गणतंत्रदिनाच्या दिवशी अयोध्येचे दृश्य पाहून चेंगराचेंगरी होण्याची भीती वाटत होती. २४ तासांच्या आत प्रशासनासमवेत बैठक घेतली आणि संपूर्ण अयोध्येला 'वन वे' करून टाकले. याचा परिणाम असा झाला की लोकांना थोडे चालावे लागले. पण चेंगराचेंगरीपासून वाचलो. दर्शनाचा कालावधी सकाळी ५ ते रात्री १२ पर्यंत करण्यात आला. भगवान श्रीरामांच्या दुपारच्या विश्रांतीचा कालावधीही स्थगित करण्यात आला. रात्री कुणालाही येथे राहण्याची परवानगी द्यायची नाही, असा निर्णय घेण्यात आला. आमचा हा प्रयोग पूर्णपणे यशस्वी झाला.

### ४०० कोटींचा कर भरला

सीएजीचे अधिकारी आमची बँक खाती पाहण्यास बऱ्याचदा येथे येतात. जवळपास ६ महिन्यांपूर्वी जेव्हा कॅगचे अधिकारी येथे आले होते, तेव्हा मी त्यांना अयोध्येचे आर्थिक विश्लेषण करण्यास सांगितले. ५ फेब्रुवारी २०२० ते २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत ३९६.२६ कोटी रुपयांचा कर सरकारच्या तिजोरीत जमा करण्यात आला आहे. ही रांऊड फिगर ४०० कोटी रुपये आहे. यामध्ये केवळ जीएसटीचे २७० कोटी सरकारला देण्यात आले, असेही चंपत राय यांनी सागंगितले.

*(पांचजन्यवरून साभार)*

## आरोग्य

# सर्वांगीण आरोग्यासाठी जवस फायदेशीर

धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याची काळजी घेणे मोठे आव्हानात्मक झाले आहे. अशा परिस्थितीत सुदृढ आरोग्यासाठी दररोज जवसाच्या बिया खाणे अत्यंत फायदेशीर मानले जाते. जवसाच्या बियांमध्ये भरपूर प्रमाणात ओमेगा-३ फॅटी ॲसिड, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि प्रथिने यासारखे महत्त्वाचे घटक असतात. यामुळे हृदयाचे आरोग्य, मेंदूचे कार्य, पचन आणि रोगप्रतिकारक शक्ती सुदृढ होण्यास मदत होते. जवसाच्या बियांमध्ये लोह, जस्त, फॉस्फरस, कॅल्शियम आणि पोटॅशियम यासारख्या पोषक घटकांचा देखील भरपूर प्रमाणात समावेश असतो. जाणून घेऊया जवसाचे सेवन करण्याचे फायदे.


### निरोगी पचनसंस्थेला प्रोत्साहन देते

जवसाच्या बियांमध्ये मोठ्या प्रमाणात फायबर आढळते, ज्यामुळे पचनसंस्था सुधारते. दररोज जवसाच्या बिया खाल्ल्याने बद्धकोष्ठता, गॅस आणि पोटफुगी यासारख्या पोटाच्या समस्या कमी होण्यास मदत होऊ शकते. दररोज जवसाच्या बियांचे सेवन केल्याने आतडे निरोगी राहते आणि पचनसंस्थेचे कार्य योग्य रीत्या होण्यास मदत होते.

### वजन कमी करण्यास मदत

जवसाच्या बियांमध्ये फायबर आणि प्रथिने दोन्ही असतात, जे पोट बराच काळ भरलेले ठेवण्यास मदत करतात. यामुळे खाण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवण्यास आणि कॅलरीजचे प्रमाण





कमी करण्यास मदत होते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. याशिवाय, ते चयापचय गतिमान करते.

### त्वचा आणि केसांसाठी फायदेशीर

जवसाच्या बियांमध्ये भरपूर प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन ई असते, जे त्वचा आणि केसांचे आरोग्य सुधारण्यास मदत करते. हे त्वचेची वृद्धत्व प्रक्रिया मंदावण्यास आणि केसांना बळकट करण्यास देखील मदत करते.

### मधुमेह नियंत्रित करण्यास उपयुक्त

जवसाच्या बियांमध्ये आढळणारे फायबर आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. याचा फायदा टाईप-२ मधुमेह असलेल्या रुग्णांना होऊ शकतो. हे शरीरातील इन्सुलिनचा प्रभाव सुधारते आणि साखर नियंत्रणात ठेवते.

**धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याची काळजी घेणे मोठे आव्हानात्मक झाले आहे. अशा परिस्थितीत सुदृढ आरोग्यासाठी दररोज जवसाच्या बिया खाणे अत्यंत फायदेशीर मानले जाते. जवसाच्या बियांमध्ये भरपूर प्रमाणात ओमेगा-३ फॅटी ॲसिड, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि प्रथिने यासारखे महत्त्वाचे घटक असतात. यामुळे हृदयाचे आरोग्य, मेंदूचे कार्य, पचन आणि रोगप्रतिकारक शक्ती सुदृढ होण्यास मदत होते. जवसाच्या बियांमध्ये लोह, जस्त, फॉस्फरस, कॅल्शियम आणि पोटॅशियम सारख्या पोषक घटकांचा देखील भरपूर प्रमाणात समावेश असतो.**

### डोळ्यांच्या आरोग्यासाठी फायदेशीर

जवसाच्या बियांमधील अँटिऑक्सिडंट्स आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड डोळ्यांचे आरोग्य जोपासत दृष्टी सुधारण्यास मदत करते. तसेच वयोमानानुसार होणाऱ्या डोळ्यांसंबंधित आजारांचा धोकाही कमी करण्यास जवसाच्या बिया उपयुक्त ठरू शकतात.

### जवस बिया कशा सेवन कराव्या

जवस हे मुळात उष्ण असते. त्यामुळे मर्यादित प्रमाणातच याचे सेवन करावे. जवसाच्या बिया थेट खाऊ शकता किंवा स्मूदी, दही किंवा सॅलडमध्ये घालू शकता. जवसाच्या बिया रात्रभर पाण्यात भिजवून देखील खाऊ शकता. सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाण्यासोबत जवसाचे बियाणे घेणे देखील फायदेशीर आहे.

*(पांचजन्यवरून साभार)*

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## इतिहास

# भारतीय इतिहासातील ‘विक्रमादित्य’



चीन भारतीय राजांनी धारण केलेले एक सन्मान्य बिरुद म्हणजे ‘विक्रमादित्य.’ विक्रमादित्य या नावाने प्राचीन भारताच्या इतिहासातील अनेक महापराक्रमी राजे ओळखले जातात. विक्रमादित्य म्हणजे पराक्रमाचा सूर्य. हे गौरवदर्शक बिरुदही आहे. प्रत्यक्षात मात्र काही महापराक्रमी राजांची मूळ नावे मागे पडली व ‘विक्रमादित्य’ या बिरुदानेच त्यांचा नामनिर्देश होऊ लागला, असे दिसते.

भारतीय परंपरेनुसार उज्जैन येथे इ. स. पू. पहिल्या शतकात विक्रमादित्य नावाचा एक प्रसिद्ध राजा होऊन गेला. त्याच्या दरबारात नऊ विद्वान होते व त्यांपैकीच कालिदास हा एक होता. ह्याच राजाने इ. स. पू. ५८ मध्ये शकांचा उच्छेद करून विक्रम संवतब सुरू केला, असे काही विद्वानांचे मत आहे. परंतु वरील घटनेस इतिहासात निश्चित पुरावा मिळत नाही. त्याच्या नावाने सध्या प्रचलित असलेल्या संवताचा उल्लेख कृत संवत् म्हणून केला जाई.

मात्र गुप्त वंशातील दुसरा चंद्रगुप्त (कार. इ. स. सु. ३७६-४१३) याला विक्रमादित्याचे परंपरागत वर्णन बरोबर लागू पडते. त्याचे साम्राज्य जवळजवळ उत्तर भारतभर पसरले होते. त्याने माळवा?काठेवाड प्रदेशांतील शक-क्षत्रपांचा उच्छेद करून उज्जैन येथे आपली राजधानी नेली व ‘विक्रमादित्य’ ही पदवी धारण केली. तो उत्तम कवी, रसिक आणि संस्कृत विद्येचा ज्ञाता व अभिमानी होता. त्याच्या दरबारात विद्वानांस आश्रय होता. त्याने तयार करवून घेतलेल्या नाण्यांवरही विक्रमादित्य या बिरुदाचा निर्देश आढळतो. कालिदासाच्या काव्यनाटकादींत तत्कालीन घटनांचे प्रतिबिंब दिसते. अशा रीतीने कालांतराने या विक्रमादित्याचे नाव पूर्वीच्या ‘कृत’ संवत्सरात पडले असावे, असे बहुतेक भारतीय व पाश्चात्त्य विद्वानांचे मत आहे.

यानंतर अनेक भारतीय राजांनी ‘विक्रमादित्य’ ही पदवी धारण केली. दुसऱ्या चंद्रगुप्ताचा नातू स्कंदगुप्त (कार. इ. स. ४५५-६७) याच्याही नाण्यांवर विक्रमादित्य असा उल्लेख आढळतो. हा मोठा बलाढ्य राजा होता. त्याने मोठ्या शौर्याने उत्तरेकडून आक्रमण करणाऱ्या रानटी हूणांचा पराभव करून भारताला त्यांच्या टोळधाडीपासून वाचविले. स्कंदगुप्ताचे साम्राज्य बंगालपासून काठेवाडपर्यंत पसरले होते. प्रजा मुखी व समृद्ध होती, असे तत्कालीन कोरीव लेखांवरून दिसते.

दक्षिण हिंदुस्थानातील चालुक्य घराण्यात विक्रमादित्य या नावाचे काही राजे होऊन गेले. त्यांपैकी पूर्वकालीन चालुक्य राजे (बादामीचे) पहिला व दुसरा विक्रमादित्य हे विशेष प्रसिद्ध आहेत.

पहिला विक्रमादित्य (कार. ६५५-८५). हा बदानीच्या चालुक्य घराण्यातील द्वितीय पुलकेशीचा मुलगा. पल्लवांनी पुसकोशीचा पराभव केला आणि सु. १२-१३ वर्षे चालुक्यांच्या प्रदेशात त्यांनी आपला अंमल प्रस्थापित केला. याच काळात विक्रमादित्याने दीर्घ परिश्रमाने सैन्याची जमवाजमव करून पल्लव नृपती परमेश्वरवर्म्याचा (कार. ६७०-७००) पराभव केला. या युद्धात त्याचा पुत्र विनयादित्य (कार. ६८१-९६) याचे त्यास साहाय्य झाले. त्याने पल्लवांचे मांडलिक चोल, पाड्य व चेर ह्या राजांचा पाडाव केला. विनयादित्याचा पुत्र विजयादित्य (कार. ६९६-७३३) याने याच सुमारास राज्यातील इतर अंतर्गत शत्रूंचा बीमोड करून शांतता प्रस्थापित केली. अशा प्रकारे विक्रमादित्याने चालुक्यांची गमावलेली प्रतिष्ठा व सत्ता त्यांना पुन्हा प्राप्त करून दिली.

दुसरा विक्रमादित्य (कार. ७३३-४५). हा विजयादित्याचा पुत्र असून तो ७३३ मध्ये बादामीच्या चालुक्यांच्या गादीवर आला. त्याच्या कारकार्दीतही चालुक्यांचे पल्लवांशी युद्ध चालूच होते. त्याने पल्लव नृपती नंदिवर्म्याचा पराभव करून सुवर्णरत्नांच्या राशी, हत्ती वगैरे त्याची संपत्ती लुटली. कांचीत (कांचीपुरम्) प्रवेश करून त्याने तेथील देवस्थानांना दाने दिली आणि नंतर पांड्य, चोल, चेर, व कळभ्र राजांचा पराभव करून दक्षिण समुद्रतीरी आपला जयस्तंभ उभारला.

त्याच्या कारकीर्दीतच अरबांनी उत्तर भारतातून दक्षिणेकडे आक्रमण केले; पण गुजरातमधील त्याचा मांडलिक नातलग अवनिजनाश्रय पुलकेशी याने मोठ्या शौर्याने नवसारीजवळच्या युद्धात अरबांचा पराभव केला. म्हणून दुसऱ्या विक्रमादित्याने अवनिजनाश्रय पुलकेशीला ‘अनिवर्तनिवर्तयिता’ (दुर्जय शत्रूचा पाडाव करणारा) ही पदवी बहाल केली. विक्रमादित्याने बांधलेले पट्टदकल येथील विरूपाक्ष मंदिर प्रसिद्ध आहे. पुढे त्याचा पुत्र द्वितीय कीर्तिवर्मा (कार, ७४४-५७) हा गादीवर आला.

वादामीच्या चालुक्य घराण्यातील तो शेवटचा राजा असल्याचे शिलालेखांतून उल्लेख आढळतात. राष्ट?कूट नृपती दंतिदुर्ग आणि त्याचे पुढील नातलग यांच्याशी झालेल्या संघर्षात द्वितीय कीर्तिनर्म्याचा सु. ७४५-५७ दरम्यान पराभव होऊन त्याची सत्ता संपुष्टात आली असावी, असा तर्क आहे.

उत्तरकालीन चालुक्य घराण्यातील (कल्याणीचे) विक्रमादित्य तिसरा, चौथा व पाचवा या राजांची फारशी माहिती उपलब्ध नाही; तथापि या घराण्यातील सहाव्या विक्रमादित्याची कारकीर्द विशेष उल्लेखनीय ठरली.


सहावा विक्रमादित्य(कार. १०७६-११२६). ही पहिल्या सोमेश्वराचा द्वितीय पुत्र होय. कल्याणीच्या चालुक्य वंशातील एक पराक्रमी व कलाप्रमी राजा म्हणून विशेष प्रसिद्ध होता. पहिल्या सोमेश्वरानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र दुसरा सोमेश्वर (कार. १०६८-७६) हा सत्तेवर असताना विक्रमादित्य आपल्या वडील भावाच्यावतीने दक्षिणेच्या प्रदेशावर राज्य करीत होता. पुढे त्या दोघांमध्ये वैमनस्य निर्माण होऊन त्याचे पर्यवसान युद्धात झाले.

१०७६ मध्ये विक्रमादित्याने दुसऱ्या सोमेश्वराचा पराभव करून चालुक्यांची गादी बळकाविली. त्याने ‘त्रिभुवनमल्ल’ ही पदवी धारण करून आपल्या नावे तालुक्य विक्रमसंवत सुरू केला. तो पुढे शंभर वर्षे दक्षिणेत टिकून होता. या विक्रमादित्यासंबंधी तत्कालीन कोरीव लेखांतून तसेच त्याच्या दरबारातील काश्मीरी राजकवी बिल्हण याने रचलेल्या विक्रमांकदेवचरित या महाकाव्यातून बरीचशी माहिती मिळते. बिल्हणाने या महाकाव्यात विक्रमादित्याच्या विविध स्वाऱ्यांबद्दल सविस्तर वर्णन केले आहे. त्यांत नेपाळ, काश्मीर वगैरे दूरदूरच्या प्रदेशांतील तसेच बिहार, बंगाल या प्रदेशांतील विजयांचा उल्लेख आहे. काही यात्रेकरूंच्या प्रवासवर्णनांतही विक्रमादित्याविषयी माहिती आढळते.

राज्यारोहणानंतर सुरुवातीस काही काळ विक्रमादित्याचे आपल्या जयसिंहनामक धाकट्या भावाशी सख्य होते. त्याने त्याला दक्षिणेच्या बऱ्याच मोठ्या प्रदेशाचा अधिपती म्हणून नेमले होते; पण १०८३ मध्ये जयसिंहाने आपल्या भावाविरुद्ध बंड केले आणि कृष्णा नदीपर्यंत मोठ्या सैन्यासह चाल केली. काही मांडलिकही त्यास येऊन मिळाले. तेव्हा विक्रमादित्याने जयसिंहाचा पाडाव करून त्याला कैद केले. त्यानंतर विक्रमादित्याने द्वारसमुद्राचे होयसळ, गोव्याचे कदंब, कोकणचे शिलाहार, सेऊणदेशचे यादव यांच्यावर विजय मिळविले. यांदरम्यान चोलांशीही त्याचे युद्ध चालूच होते.

चोलनृपती पहिला कुलोत्तुंग याच्याबरोबर वेंगीच्या चालुक्यांच्या गादीसाठी विक्रमादित्याचे अनेक संघर्ष झाले; पण त्यांत त्याला फ्फारसे यश प्राप्त झाले नाही. मात्र त्या राज्याचा काही भाग विक्रमादित्याच्या ताब्यात आला असावा; कारण त्याच्या संवताचे (इ. स. १११८-२४ पर्यंतचे) काही लेख त्या राज्यात सापडले आहेत. यांशिवाय अनेक लहान राजांना त्याने आपले आधिपत्य स्वीकारण्यास भाग पाडले होते. त्याचे साम्राज्य दक्षिणकडे हसन, तुमकूर, कडप्पा या जिल्ह्यांपासून पूर्वेस गोदावरी व खम्मामेट (खम्मम) ह्या हैदराबादजवळील जिल्ह्यांपर्यंत आणि उत्तरेकडे नर्मदेपर्यंत पसरलेले होते. होयसळ, पांड्य, काकतीय, यादव, कदंब, शिलाहार इ. वंशातील राजे त्याचे मांडलिक होते.

(संकलित)



## विविध

# अजिंक्य हिमालय

हिमालय हा जगातील सर्वाधिक उंचीचा आणि विशाल पर्वत होय. हा सर्वांत तरुण आणि पश्चिम-पूर्व पसरलेला सर्वाधिक लांबीचा घडीचा पर्वत आहे. याची लांबी सुमारे २,५०० किमी. रुंदी सु. १५०-४०० किमी. आणि क्षेत्रफळ सुमारे ५,००,००० चौ. किमी आहे. या पर्वताची रुंदी पश्चिमेस जास्त असून पूर्वेस त्यामानाने कमी आहे. भारताच्या उत्तर सरहद्दीवर पश्चिम-पूर्व दिशेत पसरलेली ही सलग पर्वतश्रेणी असून तिच्या उत्तरेस विस्तीर्ण असे तिबेटचे पठार, तर दक्षिणेस उत्तर भारतीय मैदानी प्रदेश आहे. पश्चिमेस भारताच्या जम्मू व काश्मीर राज्यातील पाकव्याप्त भागात जेथे सिंधू नदी एक मोठे वळण घेते, तेथपासून किंवा तेथील नंगा पर्वतशिखरापासून ते पूर्वेस ब्रह्मपुत्रा नदीएक मोठे वळण घेऊन पुढे भारतात प्रवेश करते, तेथपर्यंत किंवा तेथील नामचा बारवा शिखरापर्यंतच्या पर्वतश्रेण्यांचा समावेश हिमालयपर्वतात केला जातो. भारताची उत्तर सरहद्द हिमालय पर्वतश्रेणीने सीमितझालेली आहे. हिमालयाचा आकार कमानीसारखा असून त्या कमानीची बहिर्वक्र बाजू दक्षिणेस भारताच्या बाजूला आहे. हिमालयाचा विस्तार पाकिस्तान, चीन (तिबेट), नेपाळ, भूतान या देशांत आणि भारतातीलजम्मू व काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, सिक्कीम, अरुणाचल प्रदेश या राज्यांत आहे.

जगातील इतर प्रमुख पर्वतांप्रमाणेच हा पर्वतही प्राचीन सागरीतळावर वलीकरण प्रक्रियेतून उंचावला गेलेला भूसांरचनिक पर्वत आहे. हिमालयाचे वलीकरण दोन पठार शृंगांभोवती झालेले असून त्यांपैकीएक शृंग पाकिस्तानच्या सरगोधा जिल्ह्यातील किराणा हिल येथे, तर दुसरे मेघालयातील शिलाँग पठार येथे आढळते. शृंगाभोवती पर्वतालातीव्र वळण प्राप्त झालेले असते, त्याला अक्षकेंद्र असे म्हणतात. अशादोन अक्षकेंद्रांपैकी एक केंद्र जम्मू व काश्मीर राज्यातील नंगा पर्वत, तर दुसरे नामचा बारवा हे आहे. हिमालयासह आशियातील पर्वत-श्रेणींचा आकृतिबंध खंडाच्या मध्यवर्ती भागात असलेल्या पामीरच्यापठाराच्या संदर्भाने स्पष्ट करता येतो. ‘पामीर नॉट’ (जगाचे छप्पर) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या पर्वतांतर्गत पठाराचा विस्तार ताजिकिस्तान, चीन (तिबेट), भारत आणि अफगाणिस्तान यांच्या सीमाभागांत आहे. चोहोबाजूंनी पर्वतांनी वेढल्यामुळे पामीरसह हा संपूर्ण प्रदेश एक पर्वतसमुच्चय बनला आहे. पामीरपासून अनेक लहानमोठ्या पर्वतरांगा निरनिराळ्या दिशांनी विस्तारलेल्या आहेत. त्यांमध्ये पूर्वेस जाणाऱ्या अल्ताई, कुनलुन व काराकोरम या रांगा, ईशान्येकडे जाणारी तिएनशानरांग, नैर्ऋत्येकडे जाणारी हिंदुकुश पर्वतश्रेणी, तर आग्नेयीस जाणारी हिमालय पर्वतश्रेणी यांचा समावेश होतो. हिमालयाव्यतिरिक्त इतर श्रेण्या हिमालयात समाविष्ट केल्या जात नसल्या, तरी त्या हिमालयाशीच निगडित आहेत. हिमालयाच्या उत्तरेस सिंधू नदीच्या पलीकडील जटिलपर्वतप्रणालीत काराकोरम श्रेणी असून तिचा विस्तार पामीर पठारापासूनकैलास रांगेपर्यंत आढळतो. काराकोरम श्रेणीत के -२ किंवा मौंट गॉडविन ऑस्टिन (८,६११ मी.) हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर आहे. काराकोरम श्रेणीत ध्रुवीय प्रदेशाच्या बाहेरील सर्वांत लांब हिमनद्या आहेत. सिंधू नदीने काराकोरमबरोबरच लडाख व कैलास पर्वतश्रेण्याही हिमालयापासून अलग केल्या आहेत. ब्रह्मपुत्रेच्या वरच्या खोऱ्यामुळे हिमालयाच्या मुख्य श्रेणीपासून कैलास व निएन चेन टांगला या श्रेण्या अलग केल्या आहेत. हिमालयाच्या उत्तरेस असलेले तिबेटचे पठार हे जगातील सर्वाधिक उंचीवरील विस्तृत पठार असून तेही ‘जगाचे छप्पर’ म्हणून ओळखले जाते. सदैव बर्फाच्छादित असलेले माऊंट कैलास (६,७१४ मी.) हे प्रसिद्ध शिखर तिबेटमध्ये आहे. ते हिंदू व बौद्ध धर्मीयांचे पवित्र ठिकाण आहे. भाविक लोक त्यांच्या देव-देवता आणि साधु-संतांचे वास्तव्य येथे असल्याचे मानतात. कैलास शिखरापासून जवळच पवित्र मानसरोवर आहे.

### प्राचीन वाङ्मयातील हिमालय

‘हिमालय’ हा संस्कृत शब्द असून हिम म्हणजे बर्फ आणि आलय म्हणजे घर. यावरून बर्फाचे घर असलेला प्रदेश म्हणजे हिमालय अशी व्युत्पत्ती केली जाते. पूर्वीचे भूगोल तज्ज्ञ या श्रेणीचा इमाउस किंवा हिमाउस व हेमोदास असा उल्लेख करीत असत. यांपैकी इमाउस किंवा हिमाउस हे नाव गंगेच्या उगमाच्या पश्चिमेकडील हिमालयाच्या पश्चिमेकडील भागास, तर हेमोदास हे पूर्वेकडील भागासाठी वापरलेले असावे. संस्कृत हिमवत किंवा प्राकृत हेमोटा म्हणजे बफर्फाळ, यावरून हेमोटस हा शब्द वापरलेला असावा.

संस्कृत ग्रंथांत या पर्वताला हिमवत, हिमवान, हिमाचल, हिमाद्री, हैमवत अशी नावे आहेत. ऋग्वेद, अथर्ववेद, यजुर्वेद, ऐतरेय ब्राह्मण या ग्रंथांत त्याचा उल्लेख हिमवत व हिमवंत असा केलेला आहे. महाभारतात नेपाळच्या पश्चिमेकडील प्रदेशाला हिमवत प्रदेश असे नाव दिले असून त्यातून गंगा, यमुना व सतलज या नद्या वाहतात, असे म्हटले आहे. अर्जुन व बलरामाची यात्रा, भीम व दुर्योधन यांचे गदायुद्ध, पांडवांचे निर्याण या घटना हिमालयातच घडल्याचे मानले जाते. गीतेत श्रीकृष्णाने स्वत:ला ‘स्थावराणां हिमालयः’ असे म्हटले आहे. पुराणांत हिमालय हा वर्षपर्वत किंवा मर्यादापर्वत असल्याचे सांगितले आहे. मार्कंडेय व कूर्म पुराणांत हिमालयाचे वर्णन आहे. कालिका पुराणात त्याला पर्वतांचा राजा म्हटले असून मत्स्य पुराणात हिमालयातील फल-पुष्प संपदेचे वर्णन आहे. महाकवी कालिदासाला हिमालयाने विशेष मोहिनी घातली होती. त्याच्या काव्यात हिमालयातील अनेक स्थळांचा निर्देश आढळतो.

वसिष्ठ, वाल्मीकि, कण्व, व्यास इ. अनेक तपस्वी ऋषींचे आश्रम हिमालयात होते. पुराण काळातील ऋषींप्रमाणेच आधुनिक काळातील स्वामी रामतीर्थ व स्वामी विवेकानंद यांनाही तपश्चर्येसाठी हिमालयाचा परिसर योग्य वाटला कारण या पवित्र भूमीवरील वातावरणाचा मनावर मंगलमय प्रभाव पडतो. ते वातावरण मनःशांतीसाठी अनुकूल ठरते. म्हणूनच आजही अनेक साधुसंत, बैरागी परमेश्वराच्या प्राप्तीसाठी किंवा आत्मसाक्षात्कारासाठी हिमालयात जाऊन तप करीत असतात. धर्म, संस्कृती, देवता, साहित्य, कला इत्यादी जीवनाच्या सर्व अंगांवर हिमालयाचा प्रभाव गेली हजारो वर्षे पडलेला आहे. तो केवळ दगडमातीचा डोंगर नसून हिंदूंना ते पूज्य देवालयच आहे. महाभारतात द्विगर्त, त्रिगर्त, मद्र इ. पर्वतीय राज्यांचा निर्देश आढळतो. कामरूप, नेपाळ, काश्मीर या प्रदेशांतही हिंदू राज्ये त्या काळी होती व ती समृद्ध आणि सुस्थित होती. शबराने हिमालयात अनेक गिरिदुर्ग उभारले होते. तो हिमालयातील पहिला वसाहतकार असावा, असे मानले जाते.

(संदर्भ : विश्वकोश)

हिमालयाव्यतिरिक्त इतर श्रेण्या हिमालयात समाविष्ट केल्या जात नसल्या, तरी त्या हिमालयाशीच निगडित आहेत. हिमालयाच्या उत्तरेस सिंधू नदीच्या पलीकडील जटिलपर्वतप्रणालीत काराकोरम श्रेणी असून तिचा विस्तार पामीर पठारापासून कैलास रांगेपर्यंत आढळतो. काराकोरम श्रेणीत के -२ किंवा मौंट गॉडविन ऑस्टिन (८,६११ मी.) हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे उंच शिखर आहे. काराकोरम श्रेणीत ध्रुवीय प्रदेशाच्या बाहेरील सर्वांत लांब हिमनद्या आहेत. सिंधू नदीने काराकोरमबरोबरच लडाख व कैलास पर्वतश्रेण्याही हिमालयापासून वेगळ्या केल्या आहेत.

## चौफेर

सुनीता मिश्रा/सुधीरकुमार पांडे

# बांगलादेशातील हिंसाचार आणि आयएसआय

बांगलादेशात ५ ऑगस्ट २०२४ मध्ये झालेल्या सत्तापालटाला आज सात महिन्यांचा कालावधी लोटला आहे. मात्र, तेथील हिंदूंवरील अत्याचार अद्यापही थांबलेले नाहीत. आजही तेथे हिंदूंविरुद्ध मोठ्या प्रमाणात हिंसाचार सुरू आहे. बांगलादेशातील शेख हसीना यांचे सरकार उलथवून टाकण्यात पाकिस्तानची गुप्तचर संघटना आयएसआयचा हात असल्याचे मत अनेक अभ्यासकांनी व्यक्त केले आहे.

बांगलादेशात ‘छात्रशिबिर’ नावाच्या विद्यार्थी संघटनेने या हिंसाचाराला मोठ्या प्रमाणात खतपाणी घातले होते. लक्षात घ्या या संघटनेला पाकिस्तान आणि आयएसआय आजही सक्रिय पाठिंबा देत आहे. बांगलादेशातील या सत्तापालटामागे जमात-ए-इस्लामी ही जिहादी कट्टरवादी संघटना असून पाकिस्तानची गुप्तचर संघटना आयएसआयचे या संघटनेला पूर्ण सहकार्य मिळत असल्याचे सांगण्यात येते.

बांगलादेशातील निदर्शने म्हणजे केवळ निमित्त होते. भारतमित्र असलेल्या पंतप्रधान शेख हसीना यांना सत्तेवरून हटवणे हाच आंदोलकांचा खरा उद्देश होता, असे स्पष्ट झाले आहे. या आंदोलनाची रूपरेषा सहा महिने आधीच तयार करण्यात आली होती आणि तेव्हापासूनच सरकार अलथविण्याचा कट रचला जात होता, अशी नवीन माहिती पुढे आली आहे. यात जमात-ए-इस्लामीचा सहभाग असून लष्कराने या आंदोलकांना पाठिंबा दिला असल्याचे स्पष्टपणे दिसून आले. लक्षात घ्या, जमात-ए-इस्लामी ही कट्टरतावादी संघटना आहे आणि शेख हसीना यांच्या सरकारने या संघटनेवर बंदी घातली होती. याच जमात-ए-इस्लामीने पाकिस्तानी लष्कर आणि रझाकारांसोबत १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानात (बांगलादेश) भयंकर अत्याचार केले होते आणि नवीन सरकार स्थापनेसाठी झालेल्या बैठकीत ही संघटना सहभागी झाली होती. खालिदा झिया यांचा कल जमात-ए-इस्लामीकडे असून भारताच्या दृष्टीने चिंताजनक बाब म्हणजे खालिदा झिया या चीन आणि पाकिस्तानला सर्वाधिक अनुकूल आहेत.

कट्टरपंथी आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, सध्याच्या आरक्षण नियमांचा लाभ शेख हसीना यांच्या पक्ष अवामी लीगशी संबंधित लोकांना मिळत आहे. याचमुळे हे कट्टरवादी शेख हसीना सरकारबद्दल असंतोष व्यक्त करीत होते. याशिवाय हिंसक आंदोलन करणारे हे कट्टरपंथी आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर देखील नाराज आहेत. स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांना सरकारी नोकऱ्यांमध्ये दिलेले आरक्षण पूर्णपणे रद्द करावे, अशी त्यांची मागणी आहे. बांगलादेशचे माजी लष्करप्रमुख इक्बाल करीम यांनी आंदोलकांविरोधात उचललेल्या पावलांवर शेख हसीना सरकारवर जोरदार टीका केली होती. तर दुसरीकडे, विद्यमान लष्करप्रमुखांनी या कट्टरपंथी आंदोलकांचे समर्थन केले. त्यामुळे देशात दंगलीची आग अधिकच भडकली.

बांगलादेशाची कट्टरतावादाकडे वाटचाल

बांगलादेशातील वाढता कट्टरतावाद आणि अल्पसंख्यक हिंदूंवरील हिंसाचाराच्या घटना नवीन नाहीत. आतापर्यंत या हिंसाचाराच्या



घटना मर्यादित भागातच घडत होत्या. मात्र सत्तापालटाच्या वेळी झालेल्या आंदोलनात बांगलादेशात अभूतपूर्व हिंसाचार उसळला. आज सात महिन्यानंतरही युनूस सरकारचे दंगलखोरांवर नियंत्रण नाही, ही बाब स्पष्ट झाली आहे. गेल्या एक दशकापासून बांगलादेशमध्ये जमात-ए-इस्लामी, हिफाजत-ए-इस्लाम यासारख्या कट्टरवादी संघटनांचा प्रभाव झपाट्याने वाढला असून, दबावाचे धोरण राबवून अनेक महत्त्वाचे निर्णय बदलण्यात या जिहादी संघटनांना यश आले आहे. बांगलादेशातील विविध भागात त्यांचा प्रभाव सतत वाढत आहे, त्यामुळे अल्पसंख्यक हिंदूंच्या जिवाला असलेला धोकाही वाढत आहे. २०२१ च्या अहवालानुसार, गेल्या दशकात येथील अल्पसंख्यक हिंदूंवर ३६७९ वेळा हल्ले झाले. या कालावधीत धार्मिक स्थळांची तोडफोड आणि सशस्त्र हल्ल्याच्या १६७८ घटनांची नोंद झाली आहे. याशिवाय हिंदू समाजाला लक्ष्य करून घरांची तोडफोड, जाळपोळ यासह सातत्याने हल्ले करण्यात आले. विशेषत: २०१४ च्या निवडणुकीत अवामी लीगच्या विजयानंतर हिंसाचाराच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडल्या, ज्यात हिंदू समाजाला लक्ष्य करण्यात आले. हिंदूंविरुद्धचा हा हिंसाचार आजही सुरूच आहे.

कट्टरपंथी आंदोलकांचे समर्थन करणारे बांगलादेशचे लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान यांनी शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर या संदर्भात देशातील प्रमुख पक्षांसोबत बैठक घेतली होती. १८ सदस्यांचे अंतरिम सरकार आज बांगलादेशात आहे. सर्व पीडितांना न्याय मिळेल. आंदोलकांच्या मागण्या पूर्ण करून देशात शांतता प्रस्थापित करू, असेही वकार-उझ-जमान यांनी सांगितले होते. पण आज सात महिन्यानंतरही हे आश्वासन पूर्ण करण्यात आलेले नाही.

गेल्यावर्षी ५ ऑगस्टला उन्मादी व हिंसक आंदोलक पंतप्रधानांच्या निवासस्थानी घुसले आणि शेख हसीना यांना देश सोडावा लागला हे साऱ्या जगाने पाहिले. यानंतर, राष्ट्रपतींच्या माध्यम चमूने रात्री निवेदन जारी केले. शहाबुद्दीन यांच्या नेतृत्वाखाली बैठक झाली होती. यामध्ये बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टीच्या (बीएनपी) अध्यक्षा बेगम खालिदा झिया यांची तात्काळ सुटका करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. या बैठकीला लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-जमान, नौदल व हवाई दल प्रमुख आणि बीएनपी, जमात-ए-इस्लामी या पक्षासह विरोधी पक्षांचे वरिष्ठ नेते उपस्थित होते. लक्षात घ्या, जमात-ए-इस्लामी ही कट्टरतावादी संघटना आहे आणि शेख हसीना यांच्या सरकारने या संघटनेवर बंदी घातली होती. याच जमात-ए-इस्लामीने पाकिस्तानी लष्कर आणि रझाकारांसोबत १९७१ मध्ये पूर्व पाकिस्तानात (बांगलादेश) भयंकर अत्याचार केले होते आणि आता नवीन सरकार स्थापनेसाठी झालेल्या बैठकीत ही संघटना सहभागी झाली होती. खालिदा झिया यांचा कल जमात-ए-इस्लामीकडे आहे, हे वारंवार स्पष्ट झाले आहे.

शेख हसीना या उदारमतवादी नेत्या मानल्या जातात. बांगलादेशचे पहिले राष्ट्रपती शेख मुजीबुर रहमान यांच्या त्या कन्या आहेत. मुजीबूर रहमान हे बांगलादेशचे संस्थापक देखील होते. १९७५ मध्ये त्यांची कुटुंबीयांसह हत्या झाली होती. ऑगस्ट १९७५ मध्ये लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांच्या घरावर गोळीबार केला. या गोळीबारात शेख मुजीबूर रहमान, त्यांची पत्नी, मुलगा आणि सून आणि १० वर्षांचा मुलगा ठार झाले. शेख हसीना आणि त्यांची बहीण रेहाना त्यावेळी जर्मनीत होत्या. त्यामुळे सुदैवाने त्यांचे प्राण वाचले. यानंतर भारताने त्याला आश्रय दिला. त्यावेळी इंदिरा गांधी भारताच्या पंतप्रधान होत्या. शेख हसीना यांची १५ वर्षांची राजवट अवघ्या ४५ मिनिटात संपुष्टात आली. यामागे जमात-ए-इस्लामी आणि आयएसआयचे कारस्थान आहे, हे स्पष्ट होत आहे. बांगलादेशला पाकिस्तानचा विळखा बसणे ही मात्र, भारताच्या दृष्टीने ही गंभीर बाब असून भारताच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. यादृष्टीने भारताने आपली पुढील धोरणे आखण्याची आवश्यकता आहे.

*(पांचजन्यवरून साभार)*

## जीवनशैली

# चित्त शांत करणारे पद्मासन



**एकाग्रचित्त**

राहण्यासाठी केल्या जाणाऱ्या आसनांमध्ये ‘पद्मासन’ हे महत्त्वाचे आसन आहे. ‘पद्म’ म्हणजे कमळ. हे आसन करणाऱ्या व्यक्तीच्या शरीराचा आकार कमळासारखा भासतो म्हणून या आसनाला पद्मासन किंवा कमलासन हे नाव दिले आहे. शिवाय ज्याप्रमाणे कमळ चिखल व पाणी यातून वर येऊन उमलते आणि तरीही त्यापासून अलिप्त राहते त्याप्रमाणे साधक या आसनात स्थिर, शांत, अविचल, तटस्थ व स्थितप्रज्ञ राहू शकतो. बहुसंख्य आसने ही पद्मासनावर आधारित असल्यामुळे योगामध्ये पद्मासनाला अतिशय महत्त्व आहे. प्राणायाम, कपालभाती, ओंकार-जप, ध्यान-धारणा आणि समाधी यासाठी पद्मासन आवश्यक आहे. हठप्रदीपिका या ग्रंथातून बद्धपद्मासन आणि उत्थित पद्मासनाचा बोध होतो (१.४४); तर घेरण्डसंहितेत बद्धपद्मासनाचे वर्णन आले आहे (२.८). पद्मासन हे ध्यानात्मक आसन आहे. ‘इंद पद्मासन प्रोक्तंसर्वव्याधी विनाशनम्’ -म्हणजेच पद्मासन सर्व व्याधींचा नाश करते. सर्व व्याधी म्हणजेच शारीरिक, भौतिक व आध्यात्मिक. पद्मासन केल्याने साधक किंवा रोग्याचे चित्त शांत होण्यास मदत होते. साधना आणि ध्यान करण्यासाठी हे आसन उत्कृष्ट आहे.

कृती : जमिनीवरील मऊ किंवा जाड अंथरुणावर पाय सरळ समोर ठेवून ताठ बसावे. या स्थितीस दंडासन म्हणतात. उजवा पाय जवळ घेऊन त्याचे पाऊल पकडून ते किंचित वर उचलावे व डाव्या मांडीवर पोटाजवळ ठेवावे. डावा पाय वाकवून त्याचे पाऊल थोडे वर उचलून, उजव्या पायावरून ओढून उजव्या मांडीवर पोटाजवळ ठेवावे. तळहात गुडघ्यांवर पालथे किंवा ज्ञानमुद्रेत ठेवावेत. पाठीचा कणा ताठ ठेवून दृष्टी नासाग्री (नाकाच्या शेंड्याकडे) ठेवावी किंवा डोळे मिटावेत. श्वसन नैसर्गिक रीत्या चालू असावे. पोटाची हालचाल होऊ देऊ नये. या आसनात १ ते ३० मिनिटे किंवा त्यापेक्षा जास्त काळ आपली क्षमता, उद्देश व वेळ यानुसार बसता येते. आसन सोडताना एकेक पाय सोडवून दंडासनात बसावे.

पद्मासनाचाच दुसरा प्रकार म्हणजे बद्धपद्मासन. यात पद्मासनाप्रमाणे बसून दोन्ही हात मागे नेऊन विरुद्ध बाजूचे पायाचे अंगठे पकडावेत. हनुवटी हृदयावर ठेवून दृष्टी नासाग्री स्थिर करावी. रोगांचा नाश करणारे हे आसन आहे. आसन सोडताना एकेक पाय सोडवून दंडासनात बसावे. लाभ : पद्मासन नियमितपणे केल्यास गुडघेदुखी, कंबरदुखीचा त्रास होत नाही. पायातील अशुद्ध रक्तवाहिन्या मोठ्या होणे ( तरीळ्लीश तशळपी) हा विकार होत नाही. पायांच्या विशिष्ट रचनेमुळे या आसनात बराच वेळ शांत बसता येते. त्यामुळे शरीर व मनाला स्थिरता व शांतता मिळते. या आसनात श्वसनगती, हृदयगती कमीत कमी राहते. उड्डीयान बंध व मूलबंध चांगले साधतात. त्यामुळे पायाकडे अधिक रक्तपुरवठा होतो. डोळे मिटल्यामुळे साधक अंतर्मुख होतो. पद्मासनात प्राणायाम, ओंकारजप, ध्यान इत्यादींचा अभ्यास करता येतो. धैर्य व आत्मविश्वास वाढतो. आध्यात्मिक शक्तीचा विकास होतो.

विधिनिषेध : पद्मासनामध्ये पाठीचा कणा ताठ ठेवावा. समोर वाकू नये. ज्यांना जमिनीवर मांडी घालून बसता येत नाही त्यांनी प्रयत्नपूर्वक हे आसन करू नये. अन्यथा गुडघ्यास कायमस्वरूपी दुखापत होऊ शकते. आधी दंडासन, वीरासन अशी आसने केल्यावर पद्मासनासाठी हळूहळू प्रयत्न करावा. हे आसन योग्य रीतीने साधण्यासाठी एक ते तीन महिन्यांचा कालावधी लागू शकतो.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अनुसूचित जमातीचे प्रश्न लवकरच निकाली काढणार : उपायुक्त धर्मपाल मेश्राम

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ मार्च**

अनुसूचित जाती-जमातीचे आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी नांदेड येथे शुक्रवारला रात्री उशिरा शासकीय विश्रामगृहात शिष्टमंडळाची भेट घेवून त्यांच्याशी चर्चा केली. अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे युवा जिल्हाध्यक्ष संतोष तायवाडे व त्यांचे सहकारी यांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली व त्यांच्या समस्या समक्ष जाणून घेतल्या.



यामध्ये प्रामुख्याने अनुसूचित जमातीच्या सरळ सेवेतील रखडलेली १२ हजार ५०० पदांची आदिवासी बांधवाची भरती तात्काळ सुरु करावी. हा महत्वाचा प्रश्न शिष्टमंडळाने त्यांच्यापुढे मांडला.

या प्रश्नावर लवकरच मुंबईच्या अनुसूचित जाती-जमातीच्या आयोगाच्या कार्यालयात आदिवासी विभागाचे सचिव, आयुक्त, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे प्रतिनिधीसोबत संयुक्त बैठक घेण्यात येणार असल्याची माहिती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले. तसेच टीआरटीआयचा आढावा काढला आहे. त्यांची सुध्दा बैठक घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. आदिवासी बांधवाना योग्य न्याय मिळेल यासाठी आयोगाच्यावतीने प्रामाणिक प्रयत्न करण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

तसेच नांदेड शहर व जिल्ह्यात आदिवासी बांधवाची संख्या मोठया प्रमाणात आहे. परंतु याठिकाणी क्रांतीनायक बिरसामुंडा यांचा पुतळा उभारण्याबाबत लवकरच जिल्हाधिकारी नांदेड यांच्यासोबत बैठक घेण्यात येईल. या बैठकीत नांदेड शहर व जिल्ह्यात मोक्याच्या ठिकाणी क्रांतीनायक बिरसामुंडा यांचा पुतळा उभारण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत त्याना निर्देश देण्यात येतील असे त्यांनी स्पष्ट केले.

# गोदावरी अर्बनचे स्थानिक सल्लागार समिती सदस्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ मार्च**

गोदावरी अर्बनच्या आखाडा बाळापूर येथील शाखेच्या स्थानिक सल्लागार समितीची स्थापना करून संस्थेच्या अध्यक्ष राजश्री हेमंत पाटील यांच्या हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र देऊन सत्कार सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी गोदावरी अर्बनच्या अध्यक्ष राजश्री पाटील यांनी उपस्थिताशी संवाद साधताना म्हणाल्या की, संस्था गेल्या एक दशकापासून अत्यंत पारदर्शक पद्धतीने काम करीत आहे. संस्थेचा पाच राज्यात हा कार्यविस्तार व ४५०० कोटींचा व्यवसाय असून संस्था रिझर्व्ह बँकेच्या सर्व आदर्श निकषांचे पालन करून कामकाज करीत आहे. स्थानिक सल्लागार समितीची येथून पुढे मोठी जबाबदारी असेल कारण त्यांना ग्राहक व संस्थेचा मधला दुवा म्हणून काम करायचे आहे. त्या कार्यासाठी त्यांनी सर्व समितीच्या सदस्यांना शुभेच्छा दिल्या.

आखाडा बाळापूर येथील गोदावरी अर्बनची शाखा गेली एक वर्षापासून कार्यरत असून योग्यरीत्या ग्राहकसेवा देत जास्तीत जास्त लोकांपर्यंत उत्तम पद्धतीने संस्थेचे कामकाज सुरू आहे. संस्था सर्व जात धर्म पंथ पक्ष यापलीकडे जाऊन माणूस म्हणून आपण समाजाच्या प्रत्येक योग्य गरजवंताच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे या भावनेने कार्य करीत आहे, आणि तोच निकष हा स्थानिक सल्लागार समिती निवडीमागे लावला जातो. संस्थेच्या सध्या पाच राज्यात शंभरहून अधिक शाखा आहेत. या प्रत्येक शाखेत त्या भागातील स्थानिक नागरिकांचा सहभाग असावा आणि शाखेला स्थानिक नागरिकांची मदत व मार्गदर्शन व्हावे या करिता स्थानिक सल्लागार समितीची स्थापना करण्यात येते.

बाळापूर येथील स्थानिक सल्लागार समितीमध्ये राजेंद्रप्रसाद (राजूसेठ) अग्रवाल, विलास अमिलकंठवार, शहाजी सूर्यवंशी, डॉ. संतोष बोंढारे, विनोद बोंढारे, मोहमद्द जिया उस्मान कुरेशी, डॉ.उमेश दुर्गे, रोहित गोयंका, चंद्रकिशोर घोडगे, प्रवीण दमकोंडवार, सचिन पेंढारकर, सुनील अमिलकंठवार, बापूराव हेंद्रे या सर्व सदस्यांना नियुक्ती पत्र देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. या समितीमध्ये समाजातील सर्व स्तरातील नागरिकांचे समावेश करण्यात आला आहे.

## संक्षिप्त वृत्त

### कुंडलवाडी शहर वासियाच्या वतीने राज्य स्तरीय मॅराथान स्पर्धा

**कुंडलवाडी**-येथे श्री कुंडलेश्वर मॉर्निंग वॉक ग्रुप व कुंडलवाडी शहर वासियाच्या वतीने राज्य स्तरीय मॅराथान स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि.२३ मार्च २०२५ रोजी कुंडलवाडी येथे सकाळीं ६ वा. म.बसवेश्वर चौक (चुंगी नाका) शहीद भगतसिंग रोड येथून स्पर्धे ला सुरुवात होणार आहे. पुरुषासाठी राज्य स्तरीय पाहिले पारीतोषीक स्मृती चिन्ह पदक व ५००१ रूपये, दूसरे बक्षीस स्मृती चिन्ह पदक व ३००१ रूपये, तिसरे बक्षीस स्मृती चिन्ह पदक व २००१ रूपये रोख तसेच तिन विशेष पदक देण्यात येतील. महिला साठी राज्य स्तरीय प्रथम - स्मृती चिन्ह व पदक ५००१ रुपये, दुसरे पारीतोषीक स्मृती चिन्ह पदक व ३००१ रुपये, तिसरे पारीतोषीक स्मृती चिन्ह पदक २००१ रूपये रोख या शिवाय विशेष तिन पारितोषिके पदक देऊन सन्मान करण्यात येईल. पुरुषासाठी २.५ कि.मी.जाणे व येणे अशी ५ की.मी.अंतर धावणे तर महिला साठी एक कि. मी. जाणे व येणे बंधनकारक राहील असे आयोजकांच्या वतीने कळविण्यात आले आहे.स्पर्धे साठी पंच म्हणुन नांदेड जिल्हा हौशी अथेंलाटीक्स संघटना पंच प्रलोभ कुलकर्णी, वैभव दोमकोंडावार, ज्ञानेश्वर सोनसेठ, गोविंद पांचाळ, साईनाथ दंतलवाड, केरबा जाधव, ज्ञानेश्वर कोंडलवाडे हे उपस्थित राहणार आहेत.

### .डॉ.अमोल ढगेंनी घेतली बापूराव करकाळेकर यांच्या कुठूबीयांची सांत्वनपर भेट

**उमरी-** तालूक्यातील जेष्ट नेते तथा माजी भोकर पंचायत समीतीचे सभापती तथा उमरी कृषी उत्पन्न बाजार समीती संचालक तसेच डॉ.ढगे यांच्या राजकीय जीवनात ज्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आसे बापूराव पाटील कदम करकाळेकर यांचे दि १३ मार्च २०२५



रोज़ गुरुवारी हृदयवीकाराच्या झटक्याने दुःखत निधन झाले अस्ता करकाळा येथे जावून डॉ अमोल पाटील ढगे व त्यांच्या सहकार्यानी स्व.बापुराव पा करकाळेकर (कदम ) यांच्या कुंटुबाना सांत्वना पर भेट देवून दुःखातून सावरण्यासाठी धिर दिला आहे त्यांच्या सोबत भाजप कार्यकर्ते उपस्थित होते.

### राष्ट्रीय स्तरावरील ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षेत के. रामलू शाळेचे यश

**कुंडलवाडी**-राष्ट्रीय स्तरावरील ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप परीक्षा दिनांक १२ जानेवारी २०२५ रोजी घेण्यात आली. या स्पर्धा परीक्षेत के. रामलू शाळेतील एकूण ५९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी ९ विद्यार्थी गोल्ड मेडल २८ विद्यार्थी सिल्वर मेडल तर १० विद्यार्थी ब्राँझ मेडल घेऊन घवघवीत यश संपादन केले आहे. सौम्या कमठाने, साक्षी शिंदे, संस्कार तांडूरवार, शिवण्या गट्टूवार ,वेदिका बोलचेटवार, श्रेया कमठाने, विश्वजीत पाशावार, उदय पुप्पलवार ,श्रेया गट्टूवार, या विद्यार्थ्यांनी गोल्ड मेडल मिळाले. आर्यन गंधकवाड, सृजनकुमार दाचावार, प्रांजल गायकवाड, आराध्या खरबाळे, बिंदू मदनुरे, एस.डी. सिद्दिक ,मनस्वी श्रीगिरे ,श्रुतिका यन्नावार, मधुरा खेडे गार्गी पाटील ,प्रणती नरावाड, अथर्व द्यावरवार ,शशांक शिंदे,गणेश शिंदे, अभिमन्यू नांगरे, श्रेजल पेंडकर, दुर्गेश्वरी म्याकलवार, अनुष्का मिर्झापुरे, सोनाली जायेवार, श्रद्धा पवार, सिद्धेश गुल्लेवार, वैभव शिरगिरे, भाग्यश्री हमंद, आयुष बुड्डावार, शेख मैशा तनुजा, शक्करकोट शर्वरी ,शिंदे शेख शाजेब, या विद्यार्थ्यांना सिल्वर मेडल तर मयुरी देवाले, रणवीर गायकवाड, अनुष्का कदम, सौजन्या दर्शनवाड, वेदांत अंकुशकर, श्रुती मंदावार, गुंजन जायेवार ,युवान चौधरी ,श्रेया लिमशेट्टे, शेख उमर या विद्यार्थ्यांनी ब्राँझ मेडल मिळवले. तर स्वराज पत्के, शौर्य पत्के, साकेत वाघमारे, प्रियल शिंदे , पद्माक्षी रामदासी, साईकिरण ठाकूर, श्रेयस परसुरे, स्वरा तुंगेनवार, गिरीधर डुबुकवार, प्रणव वाघमारे, तनिष्का शिंदे ,श्वेता होरके ,या विद्यार्थ्यांनी सहभाग प्रमाणपत्र मिळवले.

# तामसा पोलीस स्थानकात नियमित लिलाव होत नसल्याने भंगार वाहनांचा विळखा

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. २२ मार्च**

तामसा पोलीस ठाण्याच्या आवारात अवतीभोवती जुन्या, भंगार, चोरीची वाहने, अपघातात जप्त केलेली वाहने, बेवारस सापडलेली वाहने, अनेक गुन्ह्यात जप्त केलेल्या वाहनांचा नुसता विळखा पडला आहे. वाहनांची संख्या प्रमाणात वाढली आहे. परंतु, गेल्या अनेक वर्षांपासून वाहनांचा लिलावच झाला नसल्याने भंगार वाहनांचा खच वाढून पोलीस ठाण्याला डम्पिंग ग्राउंडचे स्वरुप प्राप्त झाले आहे. आरटीओ कार्यालयाने त्या वाहनांचा तात्काळ लिलाव काढावा अशी मागणी वाढली आहे.

मागील अनेक वर्षांपासून तामसा पोलीस ठाण्यात चोरी, अपघातग्रस्त, बेवारस आणि जप्त केलेल्या वाहनाचा खच पडला आहे. काही गाड्या तर पावसात भिजून गंजून, सडून गेल्या आहेत. ते भंगार ठेवण्यास जागा सुध्दा शिल्लक नाही. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्याकडून तामसा पोलीस ठाण्याची वार्षिक तपासणी



होण्याच्या निमित्ताने ठाण्याला नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांनी पोलीस ठाणे आवारात कित्येक वर्षांपासून जमलेला काडीकचरा, घाणीचे साम्राज्य, झाडे झुडपे तोडून, काटेकुटे काढून परिसर स्वच्छ केला आहे. अस्ताव्यस्त पडलेल्या चोरीची किंवा अन्य प्रकरणातून जप्त केलेली भंगार वाहने पोलीस ठाणे इमारतीचे पाठीमागे व्यवस्थित लावली. त्यामुळे पोलीस ठाण्याने मागची सगळी मरगळ झटकून टाकल्याचा भास होत आहे. यातील अनेक वाहने भंगार झाली आहेत. यात दुचाकींची संख्या सर्वाअधिक आहे. काही मोटारसायकली तर शोरूममधून नव्या कोऱ्या करकरीत चोरीत जप्त केल्या आहेत. त्या दुचाकींना नंबर आला नसल्यामुळे ही वाहने वर्षोनुवर्षे पोलीस ठाण्याच्या आवारात पडून आहेत. त्या गाड्या गुन्ह्यातून सोडून घेण्यासाठी गाडीमालकच येत नसल्याने पोलिसांचाही नाईलाज असल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. त्यामुळे पोलीस ठाण्यांमध्ये अशा वाहनांची संख्या वाढली आहे. पोलीस प्रशासनाने संबंधित आरटीओना गाड्यांची माहिती देऊन लिलाव करण्याचे पत्र दिल्याचे समजते. परंतु आरटीओकडून लिलाव होत नसल्याने भंगार वाहनांचा तामसा पोलीस ठाण्यात खच पडला आहे.

चौकट

अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या शेकडो भंगार गाड्या बिनधास्त रस्त्यावर चालतात. त्याही भंगार गाड्यावर आरटीओकडून कारवाई का केली जात नाही. असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

# वेळापत्रक निश्चित नसल्याने प्रवाशांचे हाल

**तभा वृतसेवा**
**निवघा बा, दि. २२ मार्च**

नांदेड आगारातून हदगाव तालुक्यातील शिऊर, आमगाव्हाण, उंचेगाव, तळणी, कोळी, पिंपरखेड, बामणी फाटा मार्गे नांदेड येथे प्रवास करण्यासाठी येथिल प्रवाशांच्या सोयीसाठी महाराष्ट्र परिवहन महामंडळाने गाजावाजा करीत बस सेवा सुरु केली.बस थांबेही निश्चित केले परंतु या मार्गाने धावणाऱ्या बसला ये-जा करण्याचे वेळापत्रक निश्चित नसल्याने या मार्गावर धावणाऱ्या बसची परिस्थिती 'असून अडचण, नसून खोळंब्या'सारखी झाली आहे. परीवहन मंडळाने ठरवून दिलेल्या वेळेवर ही बस धावत नसल्याने कामानिमित्त जिल्ह्यावर जाणाऱ्या प्रवाशांना प्रचंड त्रास होत आहे. सदर बस वेळेवर बस थांब्यावर येत नसल्याने बसला प्रवाशी मिळत नाहीत आणि प्रवाशी असल्यास बस वेळेवर येत नसल्याने परिवहन मंडळासह प्रवाशांचे नुकसान होत आहे.

या मार्गांवर असलेल्या बस थांब्यावर बसण्यासाठी ना बाकडे आहेत, ना वेळापत्रक. कोणती बस किती वाजता येते, कुठून येते वा कुठे जाते याची कुठलीही माहिती उपलब्ध नाही. या परिवहन महामंडळाच्या गलथाण कारभारामुळे प्रवासी गोंधळात पडतायत . वयोवृद्ध प्रवासी तर तासन्तास बसची वाट पाहत थांबतात बस वेळेवर येत नसल्यमुळे खाजगी जिप,रिक्षा वा ॲपे इच्छित स्थळी पोहोचणे हाच पर्याय शेवटी प्रवासी निवडतात त्यामुळेच अधिकचे भाडे घेण्यासाठी खासगी वाहनधारकांची मनमानी वाढली आहे.

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चाची तयारी अंतिम टप्प्यात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ मार्च**

बुद्धगया महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीच्या आंदोलनाने देशभर जोर धरला आहे. नांदेड येथे २५ मार्च रोजी भव्य मुक्ती आंदोलन महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील बौद्ध अनुयायी लाखोंच्या संख्येने या महामोर्चात सहभागी होणार आहेत. शुभ्र वस्त्र परिधान केलेले मोर्चेकरी शिस्त आणि शांततेने महामोर्चात सामील होऊन मोर्चा यशस्वी करतील, अशी माहिती महामोर्चाचे संयोजक बौद्ध भिक्खू समितीने आज पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला महामोर्चा आयोजक बौद्ध भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच विविध राजकीय पक्षांचे नेते, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भारतीयच नव्हे तर जगाच्या पाठीवर असणाऱ्या समस्त बौद्ध अनुयायींसाठी महाबोधी महाविहार हे श्रद्धेचे स्थळ आहे. भारतातच नाही तर इतर सर्वच देशांमध्ये कोणत्याही धर्माचे श्रद्धा स्थळ असो तेथे त्या त्या धर्मीयांचा ताबा असल्याचे आढळून येतो. त्या त्या धर्माच्या अनुसार तेथे पूजाअर्चा, साधना, ध्यानधारणा केली जाते. परंतु महाबोधी महाविहार येथे हिंदू धर्मीयांचा ताबा असल्याने तेथे कर्मकांड केले जात आहेत. त्यामुळे भगवान बुद्धांच्या विचारांना हरताळ फासण्यात येत आहे. या संदर्भातील टेम्पल क्ट १९४९ तात्काळ रद्द करून महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी नांदेड येथील महामोर्चाचे आयोजन करण्यात आल्याचे यावेळी पत्रकार परिषदेत स्पष्ट करण्यात आले.

नांदेड येथे २५ मार्च रोजी दुपारी १२ वाजता नवा मोठा मैदान येथे बौद्ध अनुयायी महामोर्चासाठी जमा होणार आहेत. महात्मा फुले पुतळा मार्गे शिवाजीनगर, वजीराबाद चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा या मार्गाने महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. शुभ्र वस्त्र परिधान केलेले अनुयायी शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चात सहभागी होतील. मोर्चाची व्यापकता लक्षात घेता उपासक उपासिकांनी शांततेने मोर्चामध्ये सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून संयोजकांनी केले आहे.

# हातभट्टीसह अवैध देशी-विदेशी दारू विक्रीवर कारवाई

## अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. २२ मार्च**

तामसा पोलीस ठाण्याला नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांनी अवैध धंद्याविरुद्ध सक्तीची मोहीम सुरू केली असून त्यांनी होळी आणि धुलीवंदन सनादरम्यान हातभट्टी च्या दारूसह अवैध देशी विदेशी दारू विक्रीवर कारवाई करत २० हजार ९२० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. नूतन ठाणेदारांच्या कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

तामसा पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या जवळपास सर्वच गावात बीट जमादारांच्या आणि तत्कालीन



ठाणेदारांच्या आशीर्वादाने अवैध दारू विक्रीला विक्रीने धुमाकूळ घातला आहे. मागील काळात अनेक गावच्या ग्रामपंचायत तिने गावातील अवैध दारू बंद करण्यासाठी ठराव घेऊन महिलांनी देखील तामसा पोलीस ठाण्यावर मोर्चे काढले होते परंतु पोलिसांनी त्या मागणीकडे अक्षरशः पाठ फिरवली होती. अवैध धंद्याचा सुकाळ झाल्याने त्यावर नियंत्रण मिळवण्यात अपयशी ठरलेल्या ठाणेदारांच्या विरोधात तक्रारीची बॉम्ब उठली होती. त्यामुळे वरिष्ठाकडून त्यांच्या तात्काळ बदल्या देखील करण्यात आल्या. मात्र २५ फेब्रुवारीला तामसा पोलीस ठाण्याला नव्याने रुजू झालेले सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांनी मागची पुनरावृत्ती होऊ नये. याची काळजी घेत तामसा शहरासह परिसरातील राजरोस चालणाऱ्या अवैध हातभट्टीसह देशी, विदेशी दारू विक्रीविरुद्ध हातोडा उचलला आहे. होळी सणाच्या दरम्यान तामसा पोलिसांनी टाकराळा येथील मोहफुलांची दारू काढणाऱ्या हातभट्टीवर छापा टाकून ५ हजार ६०० रुपयाची हातभट्टीच्या दारूसह रसायन जप्त. तर वारकवाडी, उमरी जहागीर येथील अवैध देशी/विदेशी दारू विक्रीवर छापा टाकून दारूचे ४ बॉक्स दारू व देशी दारूच्या १२ बॉटल अशी अंदाजे १६ हजार ३२० रुपयाची दारू पकडून कारवाई केली. एकंदर तमसा पोलिसांनी २० हजार ९२० रुपयाची दारू पकडून कारवाई केली. केलेल्या कारवाईमुळे तामसा भागातील अवैध दारू विक्रेत्यांचे चांगलेच धाबे दणाणले असले तरी तामसा परिसरात वर्षभरातील एकही 'ड्राय डे' पाळला जात नसल्याची कुजबुज चालू आहे.

# वनीकरण विभागाकडून जनजागृती मोहीम



**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २२ मार्च**

मुदखेड तालुक्यातील बारड येथे जागतिक वन दिनानिमित्त मानवी जीवनातील वनांचे महत्त्व जनजागृतीसाठी सामाजिक वनीकरण विभागांचे विभागीय अधिकारी संदीप चव्हाण,सह्यक वनरक्षक शुभांगी लोणकर, वनपरिक्षेत्र अधिकारी श्रीकांत जाधव, यांच्या मार्गदर्शनाखाली वनांचे संरक्षण मानवी जीवनातील वनाचे महत्त्व ही संकल्पना रुजण्या साठी बारड,निवघा जिल्हा परिषद शाळांमध्ये निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी विद्यार्थ्यांना वनाचे मानवी जीवनातील महत्त्व या विषयावर निबंध सादरीकरण करायचा होता यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होवून या विषयावर निबंध सादरीकरण केला त्यामध्ये उत्कृष्ट निबंध सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक सन्मानपत्र वनीकरण विभागाकडून यावेळी देण्यात आले आहे. वनाचे महत्त्व व संरक्षण होण्यासाठी विद्यार्थ्यांना जनजागृतीसाठी सामाजिक वनीकरण विभागाकडून मोहीम हाती घेण्यात आली असून तालुक्यातील शाळेमध्ये मानवी जीवनातील वनांचे महत्त्व या विषयावर निबंध स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांमध्ये वनांबद्दलचा आदर व संवर्धन संरक्षण जनजागृतीसाठी उत्कृष्ट रित्या प्रयत्न केला आहे. यावेळी निबंध स्पर्धेत क्रमांक जि. प.हा. शाळेतील प्रथम -मयुरी कंधारे , द्वितीय अनुष्का बेतनाळे, तृतीय - गौरी बिच्चेवार उत्तेजनार्थ -सिद्धी पवार - या विद्यार्थिनीने क्रमांक पटकावून सन्मानपत्र पारितोषिक मिळविले तर निवघा येथील यशवंतराव चव्हाण विद्यालयातील प्रथम-कु.श्रुती कमलाकर सूर्यतळे, द्वितीय-कु.राशी सूर्यकांत भाकरे, तृतीय-कु. द्रोपदा श्रावण एडके उत्तेजनार्थ-कु.शेजल गणपत पांचाळ या विद्यार्थिनीने क्रमांक मिळवून पारितोषिक सन्मानपत्र मिळवले आहे. यावेळी जनजागृती कार्यक्रम यशस्वीतेसाठी वनीकरण विभागाचे संदीप चव्हाण, शुभांगी लोणकर, श्रीकांत जाधव, वनपाल पांडुरंग धोंडगे, धम्मपाल सोनसळे, जयवर्धन वाघमारे, रंगराव राठोड, आदींनी परिश्रम घेतले.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा नांदेड दौरा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २२ मार्च**


राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित पवार हे रविवार २३ मार्च २०२५ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील. रविवार २३ मार्च २०२५ रोजी बारामती विमानतळ येथून विमानाने सकाळी १०.१५ वा. श्री गुरू गोविंदसिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी ११ वा. मोटारीने नायगाव तालुक्यातील नरसी येथे आगमन व राखीव. दुपारी २.४० वा. नायगाव येथे शिवराज पाटील होटाळकर यांच्या निवासस्थानी आगमन व राखीव. सायंकाळी ४ वा. मोटारीने स्वागत लॉन्स सांगवी विमानतळ रोड नांदेड येथे आगमन. नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष ग्रामीण, शहर जिल्हाध्यक्ष, आमदार, माजी आमदार यांची बैठक होणार आहेत.

# श्रीनिवासा कारखान्याचे रासायनयुक्त पाण्याची वाट लोकवस्तीकडे

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात; प्रदूषण अधिकाऱ्याचे दुर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २२ मार्च**

औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) सिडको नवीन नांदेड परिसरात असलेल्या श्रीनिवासा कॅटल फूडस प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यातील वापरलेले रसायनयुक्त पाणी वसरणी परिसरातील लोकवस्तीमध्ये खुलेआम सोडले जात असल्याने ज्येष्ठ नागरिकांसह लहान मुलांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. सदरील कारखानदार स्वतः ची पोळी भाजण्यासाठी जनतेचा बळी घेतील यासाठी प्रदुषण नियंत्रक मंडळाच्या उपप्रादेशिक अधिकाऱ्यांनी तातडीने निर्णय घेऊन कारखानदार योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करत स्थानिक ग्रामस्थांकडून तीव्र



संताप व्यक्त केला जात आहे.

सिडको भागातील एमआयडीसी परिसरात असलेल्या श्रीनिवासा कॅटल फूडस प्रायव्हेट लिमिटेड या कारखान्यातील वापरलेले रसायनयुक्त पाणी ढवळे कॉर्नर ते दुध डेअरीकडे जाणाऱ्या रस्त्याला क्रॉस करून परिसरातील नागरी वस्तीमध्ये मागील काही वर्षांपासून अगदी खुलेआम सोडले जात आहे. त्यामुळे वसरणी शिवारातील गोदावरी हातमाग सोसायटी गट २६.४७ ४८. २५/१ व्यंकटी नगर, माता रमाई नगर सर्वे नबंर २७ आणि आंबेडकरी मिशन या भागातील नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. ज्येष्ठ नागरिकांसह लहान बालकांना विविध आजारांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे त्रासून गेलेल्या या भागातील रहिवासी नागरिकांनी प्रदुषण नियंत्रक मडंळ आणि महापालिका प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत. परंतु संबधित प्रशासनाचे या गंभीर समस्येकडे सोयीस्कर दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.प्रदुषण नियंत्रक मंडळाचे उपप्रादेशिक अधिकाऱ्यांकडून संबंधित कंपनीच्या व्यवस्थापनाला केवळ एक लेखी पत्र देण्याशिवाय कुठलीच कारवाई केलेली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या या भागातील रहिवासी तथा सेवानिवृत कर्मचारी बापुराव गोटमवाड यांच्या नेतृत्वाखालील नागरिकांच्या शिष्टमंडळाने संबंधित प्रशासनाला या प्रदूषणयुक्त पाण्याचा तत्काळ बंदोबस्त करावा, अन्यथा सामुहिक आमरण उपोषणाला सुरुवात करण्यात येईल, असा इशारा एका लेखी निवेदनाद्वारे दिला आहे. या निवेदनावर बापुराव गोटमवाड यांच्यासह एच.के.कदम, सावित्रीबाई बालाजी पुरावाड,सहदेव दोसलवार मनोहर दुधगावकर, संजय धुमाळ,शंकर तेलंग,भुमिला जंजाळ, माधुरंजनी श्रीमंगले, सविता मनोहर दुधगावकर ,रावसाहेब कदम, बालाजीराव घडे, सुधाकर ओतलवाड,प्रदिपराव पुरी, प्रशांत तेलंग, दत्ता तंगलवाड, रुपाली पातेवार, अनिलकुमार मुपडे, गणेश बोन्लावार, सतिशराव लारे,प्रमोद दोमलवाड,विकास जळकोटे,जनाबाई बापुराव गोटमवाड,आदित्य पुरी, दिलीप तेलंग, राजेश्वर आलेगावकर, नागेश पुरी, अशोक श्रीमवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# बचतीचे महत्व पुरूषापेक्षा महिलांनाच जास्त समजते– आ. तान्हाजी मुटकुळे

## जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनात बचत गटांना १७ कोटी ३६ लाख धनादेशाचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**

गाव, वस्ती, तांड्यावरील महिला बचत गटात सहभागी होत आहेत. उत्तमप्रकारे बचत गट चालवित आहेत. महिला अधिक सक्षम होत आहेत. बँकेने घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करीत आहेत. याचा अर्थ बचतीचे महत्व पुरूषापेक्षा महिलांना जास्त समजते असे मत भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी व्यक्त केले. जिल्ह्यातील बचत गटांना १७ कोटींचे कर्जाचे धनादेश वितरीत करण्यात आले. याबद्दल जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेही कौतुक आ. मुटकुळे यांनी यावेळी केले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोंन्नती अभियान जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व नामदेव केंद्रे प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांच्या मार्गदर्शनाखाली कयाधू जिल्हास्तरीय सरस विक्री प्रदर्शनीचे दि २२ मार्च रोजी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्याहस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हाअभियान व्यवस्थापक विक्रम सारस्वत, लेखाधिकारी मनोज पिनगाळे यांची उपस्थिती होती. जिल्हा परिषद कन्या शाळा मैदान या ठिकाणी विक्री प्रदर्शनी भरविण्यात आली आहे. याप्रसंगी उमेद मार्फत तयार करण्यात आलेल्या कॅटलॉगचे अनावरण करण्यात आले. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते समुदाय गुंतवणूक निधी १४१५ गटांना ८ कोटी ४९ लक्ष रु, समूहाना बँक कर्ज २९९ गटांना ८ कोटी ५९ लक्ष रु, वयक्तिक कर्ज १२ सदस्यांना १५ लक्ष ३० हजार रु, हिंगोली तालुक्यातील स्वयं आधार महिला शेतकरी उत्पादक कंपनी कोथळज यांना १२ लक्ष ८७ हजार रु एकूण १७ कोटी ३६ लक्ष १७ हजार रु चे चेक वितरण करण्यात आले. याप्रसंगी जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी केले. यामध्ये उमेद अभियाना अंतर्गत झालेल्या सर्व कामांचा लेखाजोखा या ठिकाणी मांडणी करून पुढील नियोजन सुद्धा सांगितले. जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी हिंगोली जिल्ह्यांमध्ये उमेदचे काम उत्कृष्ट पद्धतीने चालू असून त्याबद्दल समाधान व्यक्त केले व महिलांनी जास्तीत जास्त पॅकेजिंग, लेबलिंगवर भर देऊन आपले प्रॉडक्ट ऑनलाइनच्या माध्यमातून जास्तीत जास्त विक्री कशी होईल या पद्धतीने विचार करावा तसेच नियमित आपल्या उभारणीसाठी प्रशासन सहकार्य करेल. सर्व विभागाचे अधिकारी, कर्मचारी व गावातील सर्व नागरिक यांनी प्रदर्शनाला भेट देऊन ग्रामीण भागातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तू खरेदी करून ग्रामीण उन्नतीसाठी हातभार लावावा असे आव्हान केले.

आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी हिंगोली उमेद अंतर्गत गटाची चळवळ एवढी मोठी उभी झाल्याबद्दल उमेद टीमचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. महिला फक्त चूल आणि मुल एवढ्या पुरती नसून आज ती एक उद्योजक झाली याचा खूप आनंद झाल्याचे व्यक्त केले. यानंतर आमदार तानाजी मुटकुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रम सारस्वत, लेखाधिकारी मनोज पिंनगाळे यांनी सर्व गटांना भेटी देऊन गटांनी तयार केलेली उत्पादने याची पाहणी करून खरेदी केली व समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विक्रम सारस्वत यांनी केले व आभार प्रदर्शन राम मेकाले यांनी केले. या कार्यक्रमासाठी जिल्हा व्यवस्थापक ओमप्रकाश गलांडे, जिल्हा व्यवस्थापक काळे, तालुका अभियान व्यवस्थापक राजू दांडगे, मिलिंद कुकडे, विष्णू खाडे, संतोष भोसकर, सर्व तालुका टीम जिल्हा टीम प्रभाग स्तरावरील कर्मचारी सर्व सीआरपी यांनी परिश्रम घेतले. या प्रदर्शनामध्ये एकूण ६० समूहाने आपले स्टॉल लावलेले आहे.

# लोक अदालतीमध्ये मयत शेतकऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**

येथील राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जिल्ह्यातील दारेफळ येथील मयत शेतकऱ्याच्या कुटुंबाला अवघ्या आठ महिन्यात विम्याचा लाभ मिळाला असून शनिवार दि २२ मार्च रोजी जिल्हा न्यायधीश तुफानसिंग अकाली आणि न्यायधीश पी जी देशमुख यांचेहस्ते शेतकऱ्याच्या कुटुंबियांना ४४ लाखांचा धनादेश वितरीत करण्यात आला आहे.

राष्ट्रीय लोक अदालतीमुळे या प्रकरणांमध्ये तडजोड होऊन पक्षकारांना विमा व इतर प्रकरणाचा वेळेत लाभ मिळू लागला आहे. त्यामुळे पक्षकारांच्या वेळेची बचत होऊ लागली आहे. तसेच वेळीच मदत मिळू लागल्याने पक्षकारांतूनही समाधान व्यक्त होत आहे. या न्यायालयात सुमारे ५५ प्रकरणे निकाली निघाली आहेत. त्यामध्ये दारेफळ येथील शिवाजी भालेराव हे त्यांच्या आईच्या डोळ्यांच्या तपासणीसाठी दि ३ एप्रिल २०२४ रोज दुचाकी वाहनावर परभणी येथे जात होते. त्यांचे दुचाकी वाहन आरळ शिवारात आले असतांना एका वाहनाने त्यांच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. या अपघातात शेतकरी शिवाजी भालेराव व त्यांच्या आईचा जागीच मृत्यू झाला होता.

दरम्यान, शिवाजी यांची पत्नी ज्योती भालेराव यांनी ॲड सुरेश गडदे यांच्यामार्फत ऑगस्ट महिन्यात हिंगोलीच्या न्यायालयात विमा मिळण्यासाठी दावा दाखल केला होता.

त्यानंतर दि २२ मार्च रोजी राष्ट्रीय लोकअदातीमध्ये सदर प्रकरण तडजोडीसाठी ठेवण्यात आले होते. यावेळी रॉयल विमा कंपनीतर्फे अजय व्या, सुनील उपाध्ये हजर झाले होते. या प्रकरणात दोन्ही बाजूकडून तडजोड होऊन शिवाजी भालेराव या शेतकऱ्याच्या कुटुंबाला अवघ्या आठ महिन्यात ४४ लाख रूपयांचा विमा मंजूर करण्यात आला. या रकमेचा धनादेश जिल्हा न्यायधीश तुफानसिंग अकाली, न्यायधीश पी जी देशमुख यांचेहस्ते ज्योती भालेराव यांना देण्यात आला.

या प्रकरणात ज्योती भालेराव यांच्यावतीने ॲड सुरेश गडदे यांनी काम पाहीले. त्यांना ॲड मनिषा गडदे, ॲड बिपीन अर्धापूरकर, ॲड कानबाराव मस्के, ॲड दिपक लेकुळे, ॲड भगवान लोंढे, ॲड भगवान गडदे, ॲड गुणाराव पोले, ॲड कानीफनाथ दिंडे यांनी सहकार्य केले.

# बासंबा शिवारात तरूणाचा दगडाने ठेचून खून

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**

तालुक्यातील बासंबा शिवारात एका तरूणाचा दगडाने ठेचून खून केल्याची घटना शनिवारी दि २२ मार्च रोजी उघडकीस आली आहे. बासंबा पोलिसांचे पथक घटनास्थळी रवाना झाले असून याप्रकरणी दोघांना ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार बासंबा फाटा ते सावरखेडा मार्गावर बासंबा शिवारात एका तरूणाचा मृतदेह असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उप विभागीय पोलिस अधिकारी आंबादास भुसारे, बासंबा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विकास आडे, उपनिरीक्षक मदन गव्हाणे, गजानन कऱ्हाळे, चंद्रशेखर काशिदे, शेख उमर, कैलास गुंजकर, प्रवीण राठोड यांच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली.

पोलिसांनी परिसरात शोधघेतला असता रस्त्यालगत शेतात एका तरूणाचा मृतदेह दिसून आला. मृतदेहाचा चेहरा दगडाने ठेचलेला दिसून आला तर बाजुला मोठे दगड व एक लाकडी दांडा पडलेला दिसून आला. त्यामुळे तरूणाचा खूनच झाल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी मयत तरूणाची ओळख पटविण्यासाठी परिसरातील बेपत्ता तरूणाची माहीती घेण्यात सुरूवात केली. यामध्ये येळी येथील फेरोज खान पठाण हा शुक्रवारपासून बेपत्ता असल्याची माहीती पोलिसांना मिळाली. त्यावरून पोलिसांनी पठाण कुटुंबाला घटनास्थळी आणल्यानंतर त्यांच्या आईने सदर मृतदेह फेरोज खान याचाच असल्याचे सांगितले. दि २१ मार्च पासून घरातून मित्रासोबत गेल्याचेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर पोलिसांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी शासकीय रूग्णालयात दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोधांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. मयत फेरोज खान पठाण याच्या पश्चात आई, तीन बहिणी असा परिवार आहे. त्याच्या वडीलांचा सहा महिन्यापूर्वीच मृत्यू झाला आहे. त्यामुळे फेरोज रोजमजूरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवायचा.



**हिंगोली– महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अंतर्गत ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मालाचे जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनातील स्टॉलला आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांनी भेट दिली. यावेळी बचत गटातील महिलांशी आ. मुटकुळे, जिल्हाधिकारी गोयल यांनी संवाद साधला. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### अथर्व घन यांची लेफ्टनंटपदी नियुक्तीबद्दल सत्कार



हिंगोली– येथील यशवंत नगर मधील रहिवाशी मुकुंद घन यांचे चिरंजीव व राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी अथर्व घन यांची भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदी नियुक्ती झाली. ऑफिसर ट्रेनिंग अकॅडमी येथे त्यांचा प्रशिक्षण ०१ एप्रिल पासून ११ महिने होणार आहे. या निवडीबद्दल आदर्श महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ विलास आघाव यांनी अथर्वचे अभिनंदन केले. महाविद्यालयाच्या वतीने शहरातील तरुण भारतीय सैन्यातील कमिशन प्राप्ती याकरिता शुभेच्छा देवून यथोचित सन्मान देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी मेजर पंढरीनाथ घुगे, प्रा.गजानन चव्हाण, अधीक्षक दिलीप दुबे व प्रा. डॉ .आकाश बांगर हे उपस्थित होते. सत्कारमूर्ती अथर्व याने भारतीय सैन्यात निवड होण्यामागे राष्ट्रीय छात्र सेनेचे प्रशिक्षण, सतत आई–वडील व गुरू यांचे मार्गदर्शनाचे पाठबळ मिळाले तसेच कठोर परिश्रमाची पोचपावती म्हणजेच ही निवड आहे. भारतीय सैन्यात मातृभूमीची सेवा करण्याची संधी मिळाली त्याबद्दल सदैव मातृभूमीच्या सेवेत कार्यरत राहून आपले कार्य पूर्ण करेल असे भावना व्यक्त केली. अथर्व, गुणवंताचे आई सौ. राधिका, वडील मुकुंद, संपूर्ण घन परिवाराचे या निवडीबद्दल महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या सर्वांनी अभिनंदन केले व भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### वसतीगृहात चाईल्ड हेल्पलाईनकडून जनजागृती

हिंगोली– येथील जवाहरलाल नेहरु मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहामध्ये चाईल्ड हेल्पलाईन १०९८ मार्फत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमांत बालकांना त्यांचे हक्क, अधिकार, चांगला स्पर्श, वाईट स्पर्श मार्गदर्शन केले. तसेच चाईल्ड हेल्पलाईन १०९८ या टोल फ्री क्रमांकाची माहिती देण्यात आली. चाईल्ड हेल्पलाईन ही बालकांना तात्काळ मदत करणारी हेल्पलाईन आहे. या हेल्पलाईनवर मिळालेली माहिती गोपनीय ठेवण्यात येते, असे सांगून बालकाला मदतीची गरज भासल्यास १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी चाईल्ड हेल्पलाईनचे प्रकल्प समन्वयक संदीप कोल्हे, समुपदेशक अंकुर पाटोडे, पर्यवेक्षक विकास लोणकर, वसतिगृहाचे सचिव राहूल कांबळे, शिक्षक विशाल कांबळे, मधुकर उबाळे तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

### ५८ वाहन चालकांवर कार्यवाही

हिंगोली–अवैध वाहतुक करणारे व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५८ वाहन चालकांवर पोलिसांनी कार्यवाही करीत त्यांचेकडून ४६ हजारांचा दंड वसूल केला आहे.

# गोरेगाव येथील आंदोलन कर्त्यांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**

सेनगाव तालुक्यातील कापडसिंगी येथील गणेश तनपुरे यांना एका टिप्परने उडवले. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या घटनेच्याविरोधात गोरेगाव पोलिस ठाण्यासमोर रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. या प्रकरणी आंदोलनकर्त्यांवर गोरेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

दि २१ मार्च रोजी पहाटे गणेश तनपुरे हे त्यांच्या दुचाकीवर वाघजाळी येथे जात असतांना एका भरधाव टिप्परने त्यांना धडक दिली. त्यात त्यांचा जागीच मृत्यु झाला. संबंधित टिप्पर चालक व मालक यांना अटक करण्याची मागणी करीत गोरेगाव पोलिस ठाण्यांसमोर टायर जाळून आंदोलन करण्यात आले होते. पोलिसांनी आश्वासन देऊनही आंदोलक आक्रमक होते. कायदा व सुव्यवस्था बिघडेल तसेच जिल्हाधिकारी यांना जमावबंदीचे आदेश दिले आहेत. वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशी समज देऊनही आंदोलकांनी ऐकले नाही. या रसत्यावर एक तास रास्ता रोको आंदालन करीत टायर जाळले तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण करणयात आला होता. अखेर सपोनि विनोद झळके यांच्या तक्रारीवरून आंदोलक संदेश देशमुख, निखील पानपट्टे, प्रमोद महाजन, गजानन कावरखे, नामदेव पतंगे, प्रवीण मते, संतोष गुडदे, आनंदा बोडखे व ईतर पाचजणांवर गोरेगाव पोलिस ठाण्यात कलम १२६, २२३, १८९ भारतीय न्याय संहिता व सह कलम १३५ महाराष्ट्र पोलिस अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी सज्ज रहा– बी.डी.बांगर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**



आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका सह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी सज्ज राहून राष्ट्रवादी पक्षाची सदस्य नोंदणी करण्यासाठी गाव तेथे शाखा उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष बी डी बांगर यांनी केले.


राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाची तालुका आढावा बैठक शहरातील कै. शिवाजीराव देशमुख सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे हिंगोली जिल्हाध्यक्ष बि.डी बांगर, हिंगोली विधानसभेचे नेते प्रकाशराव थोरात, दिव्यांगसेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर, नगरपरिषद/नगरपंचायत कर्मचारी संघटना सेलचे राज्य प्रमुख विश्वनाथ घुगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या बैठकीत कार्यकर्त्यांना आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती तसेच नगरपालिका निवडणुकी संदर्भात, तसेच सदस्य नोंदणी जिल्हाभरात कशी जास्तीत जास्त करता येईल व गाव तिथे शाखा घर तिथे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता तयार करण्यासाठी सूचना दिल्या.

यावेळी हिंगोली तालुक्यातील सर्व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आल्या. या बैठकीला राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व आघाडीचे राज्य पदाधिकारी व फ्रंटल सेलचे जिल्हाध्यक्ष पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये हिंगोली तालुकाध्यक्ष रवी डोरले, शहराध्यक्ष केशव दुबे, राष्ट्रवादीचे युवक प्रदेश सचिव सुजय देशमुख, दुलेखॅ पठाण, युवक शहराध्यक्ष हिंगोली स्वप्निल इंगळे, सुरज वडकुते, महेश थोरात, तेजस पवार, शेख हनीफ, जुनेद पठाण, विशाल काळे, आजमत सय्यद, सुभाष जावळे, रमेश जावळे, दिनकर लोणकर, अतिक शेख, अफरोज शेख, इमरान सय्यद, सुभाष झाडे, समाधान थोरात, बंडू गायवळ, दासराव थोरात, अमोल तारे ,सदाशिव थोरात, बालाजी टोम्पे, सचिन मस्के यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक व तालुका अध्यक्ष रवी डोरले यांनी केले

# यावर्षी आंबेडकर जयंतीचे सुत्र महिलांच्या हाती, डीजेमुक्त जयंती

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**



यावर्षीची आंबेडकर जयंती डीजे व दारू मुक्त करण्याचा संकल्प शहरातील सिद्धार्थ(मिलिंद) कॉलनी भागातील नागरिकांनी घेतला आहे .आंबेडकर जयंती चे सूत्रे या वर्षी महिला मंडळांनी स्वीकारले असून नुतन जयंती कार्यकारणी व उपस्थितांनी यंदा आंबेडकर जयंती डीजे व दारू मुक्त आणि विविध कार्यक्रमाने हर्षोल्लासात साजरी करण्याचा संकल्प केला आहे.

सिद्धार्थ सहकारी मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेअंतर्गत च्या रहिवाशांची बैठक तक्षशिला बुद्ध विहारांमध्ये पार पडली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी गृहनिर्माण संस्थेच्या चेअरमन लक्ष्मीबाई त्र्यंबक इंगोले ह्या होत्या तर सचिव प्रयागबाई श्रीरंग हनवते, रुक्मिणीबाई पुंडगे, एन. जी.बगाटे,श्रीरंग वानखेडे, भाऊराव पंडित,अनुप हनवते, प्रकाश इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत चर्चेअंती यावर्षी आंबेडकर जयंती ची सूत्र महिला मंडळांनी स्वीकारावे असे ठरले त्यानंतर पुढील कार्यकारणीची निवड करण्यात आली. अध्यक्ष :उषा प्रकाश इंगोले, उपाध्यक्ष:विमल भाऊराव पंडित, सचिव : सुषमा अनुप हनवते, कोषाध्यक्ष:दैवशाला शिवाजी साबळे, कार्यकारणी सदस्य: छाया राजू पुंडगे, उज्वला आनंद कांबळे, सुनिता दीपक सरकटे, संगिता द्वारकादास सरकटे, महानंदा धनराज लेंमले, संगिता मूळे, आम्रपाली सचिन इंगोले,मेघा शिवाजी दिपके, मार्गदर्शक: लक्ष्मीबाई त्र्यंबक इंगोले, प्रयागबाई श्रीरंग हानवते, रुक्मिणीबाई तुकाराम पुंडगे, लताबाई ब्रह्मानंद भुक्तर, वच्छलाबाई प्रभाकर पुंडगे, गिताबाई किसन दिपके, चंद्रकला सुभाष जाधव, कविता भाऊराव मोरे, मुक्ताबाई नामदेव बगाटे, आशाबाई मारुती खिलारे. सदस्य:रेखा राजेंद्र पुंडगे, वर्षा सुभाष वाघमारे, सुजाता विजय नरवाडे, ललिता मिलिंद वानखेडे, आम्रपाली भाऊराव इंगोले, ज्योती संजय बलखंडे, प्रतिभा राजेश बलखंडे, माया भगत, गंगासागर सुधाकर आढागळे, शितल विकास पाईकराव, अलका सिद्धार्थ कांबळे, वर्षा शरद मस्के, ललिता संजय सुगंधे, ताराबाई आनंद खंदारे, ज्योती प्रदीप इंगोले, छाया विशाल जाधव, शालू माधव जाधव, मिनाक्षी पंडित भुकतर, लताबाई विश्वास लाटे, अश्विनी आनंद खिल्लारे, सुकेशनी सदानंद सरकटे, रोहिणी बंडू वाकळे, अर्चना उमाकांत वाकळे, आम्रपाली प्रशांत भुक्तर, मनीषा रवी इंगोले, संगीता मुळे, मंदाकिनी कंठाळे, वंदना सुनील बलखंडे, मिनाबाई रमेश राऊत, कल्पना किरण भुक्तर, वैशाली अविनाश हनवते, कुसुम सुधाकर गिरबीडे, उषाबाई मारुती इंगोले आदींचा समावेश आहे.

# आ. मुटकुळेंकडून पूलाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २२ मार्च**

शहरातील अंबीका टॉकीज जवळ चालू असलेल्या पूलाची पाहणी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दि २१ मार्च रोजी केली. तत्पूर्वी जलेश्वर तलावाभोवती बांधण्यात येत असलेल्या संरक्षण भिंतीची, चौपदरी रस्त्याची तसेच लिंचींगची पाहणी आ. मुटकुळे यांनी केली. पूलाचे काम पूर्णत्वाकडे असून लवकरच या पूलावरून नागरिकांना येजा करण्यासाठी सुविधा होणार आहे. यावेळी माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, कैलास काबरा, अभियंता प्रतीक नाईक हे उपस्थित होते.